# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक ११ मार्च, २०१६ / फाल्गुन २१, १९३७ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| (१) | शालेय शिक्षण, क्रीडा आणि युवक कल्याण, उच्च व तंत्रशिक्षण, वैद्यकीय शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य मंत्री | यांचे प्रभारी विभाग |
| (२) | अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण, अन्न आणि औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री | |
| (३) | पर्यावरण मंत्री | |
| (४) | पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - १२६**

---

### राज्यातील शाळांमधील नर्सरी प्रवेशासाठी शासनाने धोरण आखण्याबाबत

**(१) * ४२६११ ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.सुनिल**

**राऊत (विक्रोळी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संदीप नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने शाळा प्रवेशासाठी वयाची ३ वर्षे पूर्ण झालेल्या बालकाला नर्सरीमध्ये प्रवेश मिळेल यासंदर्भात आदेश जारी केला असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईसह राज्यातील अनेक शाळांमध्ये नर्सरी प्रवेशासाठी शासनाने धोरण ठरविले नसल्यामुळे व नियम नसल्याने इंग्रजी शाळा प्रवेश मिळविणे कठीण व आर्थिक खर्चाचे झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) मुंबई शहर व उपनगरातील मुलांच्या वयाची ३ वर्षे पूर्ण झाल्यानंतर नर्सरीमध्ये प्रवेश मिळण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रवेश अर्जाच्या नावाखाली शाळा ५०० ते १००० रुपयापर्यंत फी आकारतात, यासाठी प्रत्येक शाळांचे नियम वेगवेगळे आहेत, तसेच पाल्याला प्रवेश मिळावा म्हणून पालकांची घेण्यात येणारी प्रवेश परीक्षा यात सुसूत्रता नसणे व शासकीय नियम नसल्याने पालकांची आर्थिक पिळवणूक होत असल्याच्या तक्रारी विद्यार्थी संघटनांनी मुंबईच्या उपसंचालकांकडे दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यापूर्वी अनेक वेळा केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तक्रारीच्या अनुषंगाने नर्सरी प्रवेशाबाबत शिक्षण उपसंचालकांनी शाळा व्यवस्थापनावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) मुंबईसह राज्यातील अनेक शाळांमध्ये पालकांनाच नर्सरी प्रवेशाची परीक्षा द्यावी लागणे, नर्सरी शाळा प्रवेश प्रकियेत होत असलेली आर्थिक पिळवणूक रोखणे व प्रवेश प्रक्रिया सुलभ करण्याच्या दृष्टीने राज्य शासनातर्फे धोरण आखून ते त्वरीत अंमलात आणण्याच्या दृष्टीने तसेच खाजगी शिक्षण संस्थांनी या आदेशाची काटेकोर अंमलबजावणी करावी यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) शाळा प्रवेशाचे किमान वय दिनांक २१ जानेवारी, २०१५ च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आले असून दिनांक २३ जानेवारी, २०१५ च्या शुध्दीपत्रकान्वये सदर निर्णयाची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष सन २०१६-१७ पासून करण्यात येत आहे.

(२), (३), (४) व (५) इ. १ ली पासूनचे शिक्षण शासनाच्या नियंत्रणाखाली आहे. नर्सरी प्रवेश शासनाच्या नियंत्रणाखाली नाहीत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शहापूर (जि.ठाणे) तालुक्यात निर्माण झालेली तीव्र पाणीटंचाई

**(२) * ४७८२७ श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) या आदिवासी तालुक्यातील २०६ वाड्यापाड्यांमध्ये तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक १४ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तालुक्यातील पाणीटंचाई दूर करण्याबाबत भावली धरण (ता.इगतपूरी) प्रादेशिक पाणीपुरवठा योजना सुरु करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही. सन २०१४-१५ मध्ये शहापूर तालुक्यातील १०३ गावपाड्यांना टंचाई भासल्यामुळे पाणी पुरवठा करण्यात आला होता. मात्र सद्य:स्थितीत अद्याप टँकरची मागणी झालेली नाही.

(२) व (३) होय. हे खरे आहे.

(४) शहापूर तालुक्यातील टंचाईग्रस्त गावपाड्यांसाठी कायमस्वरुपी उपाययोजना करण्याच्या दृष्टीने, तालुक्यातील जास्तीत जास्त पाडे समाविष्ट करुन योजना तयार करणे, प्रस्तावित होते. त्या अनुषंगाने नाशिक जिल्हयातील भावली धरण उद्‌भव निश्चित करुन ९७ गावे २५९ पाड्यांसाठी गुरुत्वाकर्षणाद्‌वारे योजनेचे नियोजन जिल्हा परिषदेमार्फत तांत्रिक सल्लागाराची नेमणूक करण्यात आली आहे. सदर सल्लागारामार्फत योजनेचे सर्वेक्षण करण्यात आले असुन योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला आहे. सदर योजनेस प्रथमत: आवश्यक त्या परवानग्या व पाणी आरक्षण प्राप्त करुन घेण्याबाबत जिल्हा परिषदेस निर्देश देण्यात आले आहेत. सदर परवानग्या व पाणी आरक्षण प्राप्त झाल्यानंतर योजनेस मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात 'लेक शिकवा' अभियानाकडे होत असलेले दुर्लक्ष

**(३) * ४२४३२ श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गोरगरीब, उपेक्षित घटकातील मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी शासनाने सुरु केलेल्या 'लेक शिकवा' अभियानाकडे दुर्लक्ष होत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, उपेक्षित घटकातील मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी व त्यांची शिक्षणातील गळती रोखण्यासाठी दिनांक ३ जानेवारी ते २६ जानेवारी दरम्यान राज्यातील शहरांपासून ते ग्रामीण, आदिवासी, भटके विमुक्तांचे पाडे, स्थलांतरीत कुटूंबाच्या वस्त्या, विटभटट्या या ठिकाणी उक्त अभियान प्रभावीपणे राबविले होते. परंतु सध्या अभियांनाकडे दुर्लक्ष करण्यात येत असल्याने मुलींच्या शिक्षणावर विपरीत परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) हे खरे नाही.

राज्यातील सर्व जिल्ह्यातील शहरापासून ते ग्रामीण, आदिवासी, भटके विमुक्तांचे पाडे, स्थलांतरीत कुटुंबाच्या वस्त्या, विटभट्ट्या या ठिकाणी ३ जानेवारी ते २६ जानेवारी या कालावधीत लेक शिकवा अभियान प्रभावीपणे राबविण्यात आले. यामध्ये आढळून आलेल्या मुलामुलींना शाळेमध्ये दाखल करण्यात आले असून त्यांच्या शिक्षणासाठी भर देण्यात येत आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खारेपाट (ता.पेण,जि.रायगड) विभागातील गावे व वाडीवस्त्यांवरील पाणीटंचाईबाबत

**(४) * ४०३४६ श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण (जि.रायगड) तालुक्यातील खारेपाट विभागातील कोलवे, बेणेघाट, शिंगणवाट, बोरी, शिर्की, बोर्वे, मसद बु., मसद खु., मसद बेडी, शिर्केचाळ, सरेभा उफाडा, सागरवाडी, दरबारवाडी व इतर परिसरातील गावांना मोठ्या प्रमाणात पाणी टंचाईला सामोरे जावे लागत असल्याचे व उक्त विभागातील विहिरी कोरड्या पडल्या असून नागरिकांना खाजगी टँकरने जास्त पैसे देऊन पाणी विकत घ्यावे लागत असल्याचे माहे जानेवारी २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जिल्हयातील पेण शिर्की मसद खारेपाटातील २४ गावे व वाडीवस्त्यांवर पाण्याची टंचाई गत १५ ते २० वर्षे सुरु असून यावर उपाययोजना करावी या मागणीसाठी तेथील ग्रामस्थांनी दिनांक ५ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास पेण प्रांत कार्यालयावर धडक मोर्चा नेला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खारेपाट विभागातील उक्त गावांना हेटवणे धरणाचे पाणी मिळण्यासाठी छत्तीस कोटी रुपयांची योजना तयार करण्यात आली आहे तसेच रायगड जिल्हा परिषद व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी पिण्याच्या पाण्याच्या अनेक योजना राबवूनसुद्धा व शासनाचे लाखो रुपये खर्च करूनसुद्धा उक्त विभागात गेली अनेक वर्षे पिण्याच्या पाण्याची समस्या अद्यापही प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने सदर भागातील पाणी टंचाई दूर करण्यासंदर्भात व ग्रामस्थांच्या मागणीसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) खारेपाट विभागातील गावांसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत शहापाडा (उत्तर) व शहापाडा (दक्षिण) अशा दोन योजना राबविण्यात आल्या आहेत. शहापाडा (उत्तर) भागातील शहापाडा धरणाचे पाणी आटल्यामुळे फेब्रुवारी नंतर पाणी टंचाई निर्माण होते.

खारेपाट भागातील पाणी टंचाई दूर करण्याच्या दृष्टीने येथील गावांना पाणी पुरवठा करण्याकरिता हेटवणे धरण उद्‌भव घेऊन पूरक पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत तयार करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात ऑनलाईन औषधे खरेदी न करण्यासंदर्भात जनजागृती करणारी विशेष मोहिम राबविण्याबाबत

**(५) * ४४२६५ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.जयकुमार गोरे (माण), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्रीमती संगीता ठोंबरे (केज), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.सदा सरवणकर (माहिम), ॲड.आशिष**

**शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात डॉक्टरांच्या चिठ्ठी (प्रिस्क्रीप्शन) शिवाय ऑनलाईन औषधे खरेदी करण्यात येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऑनलाईन औषध विक्रीसंबंधी अभ्यास करुन अहवाल देण्याकरीता केंद्र शासनाने आयुक्त, अन्न व औषध प्रशासन यांच्या अध्यक्षतेखाली एक उपसमिती स्थापन केलेली आहे. सदर उपसमितीने जनता, व्यावसायिक, व्यापारी व स्वयंसेवी संघटना यांचेकडून ऑनलाईन औषध विक्रीबाबत मागविलेल्या सूचना व हरकती प्राप्त झाल्या आहेत काय,

(३) असल्यास, या विषयासंदर्भात नवीन कायदा मंजूर करेपर्यंत ऑनलाईन औषधे खरेदी करु नये यासाठी जनजागृती करणारी विशेष मोहिम राबविण्याचे आदेश दिनांक १३ जानेवारी, २०१६ रोजी मा. उच्च न्यायालयाने दिले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार तसेच प्राप्त झालेल्या सूचना व हरकतीनूसार राज्य शासनातर्फे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

काही प्रकरणी ऑनलाईन औषधांची विक्री होत असल्याचे अन्न व औषध प्रशासनास आढळून आले आहे.

(२) होय.

(३) होय, हे खरे आहे.

मा. उच्च न्यायालयाने औषध नियंत्रक, भारत सरकार यांचे परिपत्रक दिनांक ३०/१/२०१५ च्या अनुषंगाने जनजागृती करण्याचे आदेश दिनांक १३/१/२०१६ च्या सुनावणी दरम्यान दिले आहेत.

(४) मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार अन्न व औषध प्रशासनातील सर्व सह आयुक्तांनी ज्ञापन क्र. इंफा/२७६-२०१६/११, दि. १९/१/२०१६ अन्वये पुढीलप्रमाणे सूचना दिलेल्या आहेत.

१. औषध नियंत्रक, भारत सरकार यांचे परिपत्रक दिनांक ३०/१/२०१५ स अनुसरुन ऑनलाईन औषध विक्रीस प्रतिबंध घालण्यासाठी सर्वसामान्य जनता, औषध विक्रेते/उत्पादक इ.मध्ये जागरुकता निर्माण करण्यात यावी व याबाबत प्रसारमाध्यमातून प्रसिध्दी द्यावी.

२. इंटरनेटद्वारे औषधांची विक्री करणा-यास पुरवठा करण्यात येवू नये याबाबत परिपत्रक काढून औषध विक्रेत्यांना सूचना देण्यात याव्यात.

३. कार्यक्षेत्रात होणा-या औषध विक्रीवर पाळत ठेवण्यात यावी.

४. ऑनलाईन औषध विक्रीच्या घटनांविरुध्द कायद्यातील तरतुदीनुसार उचित कारवाई करण्यात यावी.

मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार तसेच प्रशासनास प्राप्त माहिती व तक्रारीच्या अनुषंगे कायद्याचे उल्लंघन करुन औषध विक्री करणा-यांविरुध्द ५१ प्रकरणी प्रशासनाकडून कारवाई केली आहे. तसेच ऑनलाईन औषध खरेदी/विक्री करु नये अशी प्रशासनाद्वारे प्रसिध्दी दिली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील विद्यार्थ्यांच्या दप्तरांचे ओझे कमी करण्याबाबत

**(६) * ४३१४२ श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.सुनिल शिंदे (वरळी), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शाळांमध्ये जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पाठीवरील दप्तरांचे ओझे विद्यार्थ्यांच्या वजनाच्या १० टक्क्यांहून अधिक असू नये असा निर्णय राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयाची अंमलबजावणी होते किंवा नाही याचे परिक्षण करण्यासाठी शिक्षण विभागाकडे कोणतीच यंत्रणा उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,
(३) याबाबत शाळा व्यवस्थापन व पालक यांना कळविण्यात आले आहे काय, तसेच सदर निर्णयाची अंमलबजावणी न करणाऱ्या शाळा व्यवस्थापकांवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) दि.५ नोव्हेंबर, २०१५ च्या शासन परिपत्रकान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत व अंमलबजावणी न करणाऱ्या संबंधित कर्मचारी व शाळेच्या व्यवस्थापकांना जबाबदार धरण्यात येईल अशी तरतूद परिपत्रकात करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यातील चंद्रभागा नदीचे शुध्दीकरण करण्याबाबत**

**(७) * ४२२९६ श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यातील चंद्रभागा नदीचे पात्र मोठ्या प्रमाणात प्रदुषित झाल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रदुषित चंद्रभागा नदीचे शुध्दीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे अंशत: खरे आहे. माहे नोव्हेंबर २०१५, मध्ये पंढरपुर येथील भिमा नदीतील पाणी दुषित झाले होते. चंद्रभागा नदीचे पाणी प्रवाहीत नसल्याने व पाणी साठून राहील्याने त्यास पिवळसर रंग दिसत होता.

(२) अ) पंढरपूर शहरास करण्यात येणारा पाणी पुरवठा हा पाण्यावर योग्य ती प्रक्रिया करुनच देण्यात यावा असे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दि. ०८/१२/२०१५ रोजी पंढरपूर नगरपालिकेस निर्देश दिले आहेत.

ब) भिमा नदी काठावरील संभाव्य प्रदूषण करणाऱ्या साखर कारखाने व आसवण्या यांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दि. ०८/१२/२०१५ रोजीच्या पत्रान्वये योग्य त्या सूचना करण्यात आलेल्या असून कारखान्याकडील जल प्रदूषण नियंत्रण यंत्रणा योग्य प्रकारे व नियमित चालविण्यात यावी व प्रक्रिया केलेले सांडपाणी हे संमतीपत्रातील अटी व शर्तीनूसार शेतीसाठी वापरण्यात यावे. तसेच कोणत्याही परिस्थितीत कारखान्याचे सांडपाणी तसेच आसवण्याचे स्पेंट वॉशमुळे नदीचे पाणी दूषित होणार नाही याबाबतची खबरदारी व उपाययोजना करण्याबाबत सूचित करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुण्यातील सिंहगड तंत्रशिक्षण संस्थामधील प्राध्यापकांना वेतन मिळाले नसल्याबाबत**

**(८) * ४४३५४ श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील सिंहगड तंत्रशिक्षण संस्थेसह राज्यातील सर्वच अभियांत्रिकी महाविद्यालयात प्राध्यापकांचे वेतन नियमित होते की नाही याची कसून चौकशी करण्याची मागणी श्री. संजय केळकर, सिटीझन फोरम संस्था यांनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान केल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुण्यातील सिंहगड तंत्रशिक्षण संस्थेच्या माध्यमातून चालविण्यात येणाऱ्या अनेक अभियांत्रिकी, व्यवस्थापक, तंत्रशिक्षण तसेच अन्य अभ्यासक्रमांच्या संस्थांमध्ये कार्यरत असलेल्या प्राचार्यांपासून प्राध्यापक-कर्मचाऱ्यांचे माहे ऑगस्ट, २०१५ पासून वेतन दिलेले नसतानाही संस्थापक,

अध्यक्षांनी सर्व प्राध्यापकांना दिनांक १४ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास एक पत्र पाठवून ठराविक गृहनिर्माण संस्थेत सदनिका आरक्षित केल्यास त्यापोटी कर्मचाऱ्यांना काही रक्कम दिली जाईल असे परिपत्रक काढले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, समाजकल्याण विभागाकडून सदर संस्थेला १२१ कोटी ८० लाख रुपये येणे बाकी असल्याने कर्मचारी व प्राध्यापकांचे पगार देण्यात आले नसल्याबाबतचा जाहीर खुलासा संस्थापक, अध्यक्ष यांनी वृत्तपत्राकडे केला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त परिपत्रकाच्या अनुषंगाने शासनाने सिंहगड तंत्रशिक्षण संस्थेच्या व्यवस्थापनाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने संबंधित संस्थाचालक, अध्यक्षांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) सदरचे महाविद्यालय हे खाजगी कायम विनाअनुदानित तत्वावरील असून या संस्थेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करण्याची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधित संस्थेची आहे. तथापि, सिंहगड तंत्रशिक्षण संस्थेच तक्रारी संदर्भात चौकशी करण्याचे निर्देश संचालक, तंत्रशिक्षण यांना दिले आहेत. तसेच प्रलंबित वेतनासंदर्भात सर्व संबंधिता समवेत विचार विनिमय करुन स्थानिक पातळीवर आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर आणि नागपूर जिल्हयातील अनेक प्राथमिक, माध्यमिक शाळेतील वीज पुरवठा निधी अभावी खंडीत करण्यात आल्याबाबत

**(९) * ४५६६३ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जिल्हा परिषदेच्या शाळांना वीजदेयके भरण्यासाठी सादिल अनुदान मिळत नसल्यामुळे चंद्रपूर आणि नागपूर जिल्हयातील अनेक प्राथमिक,

माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळेतील वीज देयके गत चार ते पाच महिन्यांपासून थकीत झाल्यामुळे ऐन परिक्षेच्या वेळेस वीज वितरण कंपनीने अनेक शाळांचा वीज पुरवठा खंडीत केला असल्याची माहिती दिनांक २९ जानेवारी २०१६ रोजी वा त्या सुमारास निर्दशनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऐन परिक्षेच्या वेळेस वीज पुरवठा खंडीत झाल्यामुळे शिक्षकांसह विद्यार्थ्यांची गैरसोय होऊन त्यांना मानसिक त्रास होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व यासंदर्भात संबंधितांशी विचारविनिमय करून स्वतंत्रपणे कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) निधी अप्राप्त असल्यामुळे विलंब होत आहे.

-----------------

## खानापूर, आटपाडी, तासगांव (जि.सांगली) तालुक्यातील पाणी पुरवठ्याची कामे बंद असल्याबाबत

**(१०) * ४५३५७ श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खानापूर, आटपाडी, तासगांव (जि.सांगली) तालुक्यातील पाणी पुरवठ्याची कामे गत दोन वर्षापासून बंद आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बंद पडलेली कामे पूर्ववत सुरु करुन त्याला गती देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान मा.ग्रामीण पाणीपुरवठा मंत्री महोदयांना पत्रव्यवहार करुनही अदयापी कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने उक्त कामे सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) नाही.

(२) व (३) खानापूर, आटपाडी, तासगाव तालुक्यातील प्रगतीपथावरील नळ पाणी पुरवठा योजनांची कामे प्राधान्याने पुर्ण करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच शासनाच्या दि.१४.०८.२०१५ रोजीच्या पत्रान्वये देखील प्रगती पथावरील योजनांची कामे प्राधान्याने पुर्ण करणेबाबत सुचना दिल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील इलेक्ट्रो होमिओपॅथी डॉक्टरांनी त्यांच्या मागण्यांबाबत केलेले धरणे आंदोलन

**(११) * ४०२६७ श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.अजित पवार (बारामती), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील इलेक्ट्रो होमिओपॅथी डॉक्टरांनी त्यांच्या मागण्यांसाठी दिनाक १४ जानेवारी २०१६ रोजी वा त्यादरम्यान मुंबईतील आझाद मैदान येथे धरणे आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डॉक्टरांच्या प्रश्नावर चर्चा करण्यासाठी मा. आरोग्य मंत्र्यांनी त्यांना भेटण्यास नकार दिल्याने डॉक्टर वर्गात तीव्र संताप पसरला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, डॉक्टरांच्या मागण्यांचे स्वरुप काय आहे व सदर मागण्या मान्य करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) दिनांक ११.०१.२०१६ रोजी सकाळी १०:०० ते सायंकाळी ०५:०० या कालावधीत "इंडियन इलेक्ट्रो-होमिओपॅथी संघर्ष समिती" यांनी संघटीत केलेल्या सुमारे २०० व्यक्तींनी आझाद मैदान, महापालिका मार्ग, मुंबई, येथे धरणे आंदोलन केले.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) हे प्रश्न उद्भवत नाहीत.

-----------------

## मुंबई व ठाण्यातील वीस अभियांत्रिकी महाविद्यालयाविरोधात कारवाई करण्यास एआयसीटीईकडून होत असलेली दिरंगाई

**(१२) * ४०७६० श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या (एआयसीटीई) सर्व पात्रता निकषाचा खोटा दावा करणाऱ्या मुंबई व ठाण्यातील वीस अभियांत्रिकी महाविद्यालयांविरोधात मागील ९ महिन्यांपासून कारवाई करण्यास एआयसीटीईकडून दिरंगाई होत असल्यामुळे या महाविद्यालयांवर कारवाई न करण्याचा तसेच संगनमताने त्यांना प्रवेश क्षमता व अभ्यासक्रम वाढविण्यास मान्यता देणा-या संबंधित अधिकाऱ्यांवर फौजदारी कारवाई करण्याची मागणी सिटीझन फोरम फॉर सॅंटिटी इन एज्युकेशन सिस्टीमने मा.मुख्यमंत्र्यांकडे एका निवेदनाद्वारे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मागणीबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) याबाबत तंत्रशिक्षण संस्थांचे नियमन करणाऱ्या अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली या शिखर संस्थेस दिनांक २८ ऑक्टोबर, २०१५ व दिनांक ११ फेब्रुवारी, २०१६ रोजीच्या पत्रान्वये पुढील कार्यवाहीच्या अनुषंगाने कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नांदेड जिल्हयात निर्माण झालेली पाणी टंचाई**

**(१३) * ४१२३५ श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयात मागील तीन वर्षापासून पाऊस कमी झाल्याने पावसाअभावी पाणीपुरवठा योजना असलेल्या ३० गांवात पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाणीटंचाई निवारण्यासाठी पाणीपुरवठा विभागाकडून पाणीटंचाई आराखडा तयार करण्यास विलंब होत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काही ठिकाणी नवीन पाणीपुरवठा योजना सुरु करुन येथील पाण्याचे स्त्रोत बळकट करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

नांदेड जिल्हयाचे टंचाई कृती आराखडे तयार करण्यात आले आहेत.

(३) पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत बळकटीकरणासाठी जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत रिचार्ज शाफ्ट/ट्रेंच ची नांदेड जिल्हयात १५१ कामे मंजूर असून त्यापैकी

३७ कामे पूर्ण करण्यात आलेली असून ११ कामे प्रगतीपथावर आहेत व ९० कामे ई-निविदा स्तरावर आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## यवतमाळ जिल्हयातील सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत शौचालय बांधकाम योजनेमध्ये झालेला अपहार

**(१४) * ४७४९३ श्री.मदन येरावार (यवतमाळ) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे महागांव (ता.महागांव, जि.यवतमाळ) येथे जिल्हा परिषदेच्या सर्व शिक्षा अभियांनातर्गत शौचालयाच्या बांधकामात ३० लाख रूपयांपेक्षा जास्त रकमेचा अपहार झाला, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, सदर महागांव येथील सर्व शिक्षा अभियांनातर्गत शौचालयाच्या बांधकामात अपहार झाल्याबाबत स्थानिक नागरीक प्रमोद भरवाडे यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ यांच्याकडे केलेल्या तक्रारीनुसार शिक्षणाधिकारी व उपशिक्षणाधिकारी यांची समिती नेमून अपहाराबाबतच्या चौकशीकरीता पाठविण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षणाधिकारी व उपशिक्षणाधिकारी यांनी तालुक्यातील ५६ शाळांना भेटी न देता स्थानिक कार्यालयामधूनच मुख्याध्यापकांच्या सांगण्यावरुन अहवाल तयार केला असून सदरहू अहवालात ५ ते ६ शाळांचे काम पुर्ण व उर्वरीत शाळांना निधी न मिळाल्याने पाईपलाईन फिटींग,पाण्याची टाकी व किरकोळ त्रुटी आढळून आल्याचे नमुद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

शौचालय बांधकामात अपहार झाला नसून काही शाळांनी शौचालय बांधकामे पूर्ण करण्यास विलंब केला आहे.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या चौकशीमध्ये, ९ शाळांमधील ११ शौचालय बांधकामे पूर्ण करण्यात आली होती, उर्वरित ४७ शाळांमध्ये ५९

शौचालयाचे पाईप फिटींग न करणे, पाण्याची टाकी न लावणे, टाईल्स न बसविणे, युरिनल पॅन न बसविणे या सारखी किरकोळ कामे अपूर्ण होती असे निष्पन्न झाले.
(४) किरकोळ अपूर्ण असलेली कामे तात्काळ पूर्ण करण्याचे निदेश देण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत  नाही.

-----------------

**राज्यातील २० पेक्षा कमी पटसंख्येच्या शाळा बंद करण्याच्या शासनाच्या प्रस्तावाबाबत**

**(१५) * ४३२९८ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील २० पेक्षा कमी पटसंख्येच्या शाळा बंद करण्याचा शासनाचा प्रस्ताव असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अहमदनगर जिल्हयात २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या जिल्हा परिषद व्यवस्थापनाकडे ४६३ शाळा आहेत, या शाळा किमान व्दिशिक्षकी असल्यामुळे सुमारे ९२५ शिक्षकांच्या व किमान ५ हजाराहून अधिक विद्यार्थ्यांच्या समायोजनाचा प्रश्न निर्माण होणार आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रस्तावावर निर्णय घेतल्यास येथील शिक्षक व विद्यार्थ्यांना इतर शाळांत सामावून घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२), (३) व (४) दिनांक १३.१२.२०१३ चा शासन निर्णय व दिनांक २७.१.२०१४ च्या शासन निर्णयानुसार असा निर्णय घेण्यात आला होता. मात्र त्याची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही.

-----------------

## नागपुर येथील महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेच्या कुस्तीगारांना उत्तेजक इंजेक्शन घेताना पकडल्याबाबत

**(१६) * ४२५५२ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर), श्री.सिध्दराम म्हेत्रे (अक्कलकोट), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपुर येथे मानाच्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेच्या पहिल्याच दिवशी दोन कुस्तीगारांना उत्तेजक इंजेक्शन घेताना पकडण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन सदर कुस्तीगारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) महाराष्ट्र राज्य कुस्तीगिर परिषद यांच्या वतीने ५९ वी राज्यस्तरीय वरिष्ठ गट गादी व माती अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा व महाराष्ट्र केसरी किताब लढत २०१५-१६ दिनांक ६ ते १० जानेवारी, २०१६ या कालावधीमध्ये नागपूर येथे पार पडली. सदर स्पर्धेमध्ये कुस्तीगिरांनी उत्तेजक इंजेक्शन घेण्याबाबत कोणताही प्रकार घडला नसल्याचे परिषदेच्या दिनांक ०१.०३.२०१६ रोजीच्या अहवालावरुन आढळून येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जिंतूर (जि. परभणी) येथील भारत निर्माण योजनेत अपहार झाल्याबाबत

**(१७) * ४८४०७ श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिंतूर (जि. परभणी) येथील भारत निर्माण योजनेत अपहार झाल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अपहाराची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर अपहार करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

(३) जिंतूर (जि.परभणी) तालुक्यातील नळ पाणी पुरवठा समितीच्या अध्यक्ष व सचिवाने अपहार केल्याचे निदर्शनास आल्यानंतर त्यांच्या स्थावर मालमत्तेवर बोजा टाकणेबाबतची कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे. त्यांचे मालमत्तेवरील बोजा टाकणेसाठी जिल्हाधिकारी, परभणी यांना जिल्हा परिषदेमार्फत माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिंगोली (जि.हिंगोली) शहरात स्वस्त धान्य दुकानामध्ये तहसीलदार कार्यालयातून धान्याचा पुरवठा केला जात नसल्याबाबत

**(१८) * ४१३४७ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली (जि.हिंगोली) शहरात स्वस्त धान्य दुकानदारांनी वेळोवेळी मागणी करुन सुध्दा तहसीलदार कार्यालयातून धान्याचा पुरवठा केला जात नसल्याने दुष्काळात सापडलेल्या नागरिकांवर उपासमारीची वेळ आली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हिंगोली शहर व जिल्हयातील गोरगरीबांना स्वस्त धान्य त्वरीत मिळावे यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.

(२) राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत प्राधान्य कुटुंब लाभार्थी संख्या ७१३६७४, अंत्योदय योजनेतील शिधापत्रिका धारकांची संख्या ३२२४८ व

एपीएल (केशरी) शेतकरी लाभार्थी संख्या २१३६९१ आहे. त्यानुसार माहे जानेवारी, २०१६ करीता प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांना गहू २०१४ मे.टन व तांदूळ १३४० मे.टन, अंत्योदय योजनेतील शिधापत्रिका धारकांना गहू ६४९ मे.टन व तांदुळ ४४१ मे.टन व एपीएल (केशरी) शेतकरी लाभार्थ्यांना गहू ६२२ मे.टन व तांदुळ ४१५ मे.टन इतक्या अन्नधान्याचे जिल्ह्यातील एकूण ७९५ रास्तभाव दुकानदारांमार्फत योजनानिहाय वाटप करण्यात आलेले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापुर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या वसतिगृहात रॅगिंगला नकार दिल्याने विद्यार्थ्याला केलेली मारहाण

**(१९) * ४३५२० श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापुर येथील राजर्षी शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या वसतिगृहात मेडिकलच्या दुसऱ्या वर्षात शिकणाऱ्या जयंत रमेश तोंडे या विद्यार्थ्यांने रॅगिंगला नकार दिल्याने परप्रांतीय विद्यार्थ्यांनी माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान त्याला बेदम मारहाण करुन गंभीर जखमी केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी जखमी विद्यार्थ्यांने महाविद्यालयाचे अधिष्ठाता जयप्रकाश रामा बंद यांच्याकडे रॅगिंग व मारहाणीप्रकरणी लेखी तक्रार करुनही संबंधित परप्रांतीय विद्यार्थ्यांवर कोणतीच कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, तद्नुसार चौकशीअंती संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे अंशत: खरे आहे. सदर प्रकरण रॅगिंगचा नसून वैयक्तिक मारहाणीचा आहे.
(२) नाही, हे खरे नाही.

(३) सदर प्रकरणी संस्थास्तरावर चौकशी होऊन दोषीविरोधात एफआयआर दाखल करण्यात आलेला आहे. तसेच, मारहाण करणाऱ्या संबंधित विद्यार्थ्यांना वसतीगृहातून काढून टाकण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्य शालेय शिक्षण विभागाकडून राबविण्यात येणा-या प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमांची अंमलबजावणी योग्यरित्या करण्याबाबत**

**(२०) * ३९६८४ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शालेय शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी राज्य शालेय शिक्षण विभागाकडून प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमाची अंमलबजावणी दिनांक २२ जून २०१५ पासून करण्यात आली असून राज्य शिक्षण विभागाकडून सध्या राबविण्यात येत असलेल्या प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र, कलचाचणी, समुपदेशन इ. कार्यक्रमांमध्ये विविध प्रकारच्या खाजगी व शिक्षण क्षेत्राशी संबंध नसलेल्या अनेक संस्थांना कामे दिली जात असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कार्यक्रमात विविध प्रकारच्या खाजगी व ज्यांचा शिक्षण क्षेत्राशी दुरान्वयाने काहीही संबंध नाही, अशा संस्थाना कामे दिल्यामुळे या संस्थांच्या प्रतिनिधीकडून शालेय शिक्षण विभागातील अनेक मंडळे व कार्यालयांच्या कामकाजांमध्ये थेट हस्तक्षेप वाढला असल्यामुळे शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांमध्ये नाराजी पसरल्याने प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम वादात सापडला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमासाठी शिक्षण विभागातर्फे जारी करण्यात आलेल्या परिपत्रकानुसार, खाजगी संस्था शिक्षक, पर्यवेक्षीय यंत्रणा, डायट व राज्य स्तरीय संस्थामधील प्रतिनिधी आणि त्यांच्या शाखा प्रमुखांना कोणत्याही परवानगी शिवाय विविध प्रकारचे प्रशिक्षण देणे बंधनकारक केल्यामुळे अधिकारी वर्गामध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा यांनी मा. शिक्षण मंत्री यांना दिनांक १२ जानेवारी, २०१६ रोजी पत्र पाठवून सदर बाब निदर्शनास आणून दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने या कार्यक्रमात ज्या खाजगी संस्थाचा शैक्षणिक क्षेत्राशी संबंध आहे, त्यांनाच कामे देण्याबाबत व शिक्षण विभागातील खाजगी लोकांचा हस्तक्षेप बंद करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) नाही.

(४) पत्र आढळून आले नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वाशिम जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण अधिकारी कार्यालयाच्या संगनमताने करण्यात आलेला गैरव्यवहार**

**(२१) * ४४३९७ श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयाने पुणे येथील शिक्षण आयुक्तालयात ६ ते ७ महिन्यांपूर्वी वाशिम जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण अधिकारी कार्यालयाच्या संगनमताने करण्यात आलेल्या ८ ते १० कोटी रुपयांच्या गैरव्यवहाराचा चौकशी अहवाल पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २८ जानेवारी, २०१५ ते ३१ जानेवारी, २०१५ या कालावधीत अमरावती विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी केलेल्या तपासानुसार दिनांक ७ फेब्रुवारी, २०१५ रोजी शिक्षण आयुक्त, पुणे यांना पहिला चौकशी अहवाल सादर केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अमरावती विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयाने तत्कालीन शिक्षणाधिकारी श्री.विश्वास लबडे, संजय तेलगोटे यांच्यासह अनेक संस्थाचालक व कर्मचाऱ्यांवर ५ विविध पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल केले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गुन्हे दाखल करताना कोणत्या तक्रारींची प्रामुख्याने नोंद करण्यात आली होती,

(५) असल्यास, उक्त प्राप्त झालेल्या पहिल्या चौकशी अहवालामध्ये नमूद करण्यात आलेल्या प्रमुख बाबी कोणत्या आहेत व शिक्षण आयुक्तांनी सदर अहवालावर कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे तसेच सदर अहवालात दोषी आढळलेल्या व्यक्तींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) नियमबाह्य वैयक्तिक मान्यता देवून शासनाची आर्थिक फसवणूक करणे, खोटे अभिलेख तयार करणे इत्यादी बाबत नोंद घेण्यात आली आहे.

(५) दिनांक ७ फेब्रुवारी, २०१५ चा चौकशी अहवालात चौकशी समितीस आवश्यक कागदपत्रे उपलब्ध न झाल्याने सखोल चौकशी करता आली नाही, सबब त्यांनी शासन स्तरावर समिती गठित करण्याबाबत आयुक्त, शिक्षण यांना कळविले होते, आयुक्त शिक्षण यांनी त्यांच्या विभागातील अधिकऱ्यांची समिती गठित करुन चौकशी करण्याचे निर्देश दिले होते. या समितीच्या प्राप्त अहवालानुसार आयुक्त शिक्षण व विभागीय शिक्षण उपसंचालक, अमरावती यांच्याकडे याप्रकरणी कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत  नाही.

-----------------

## अकोला येथील सर्वोपचार रुग्णालय /शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील बेजबाबदार कारभाराबाबत

**(२२) * ४४७६४ श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला येथील सर्वोपचार रुग्णालय /शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात

माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान रिसोड तालुक्यातील एका महिलेने मुलाला जन्म दिला व सदर बाळाचा प्रि मॅच्युअर्ड बेबी युनिटमध्ये मृत्यु झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मृत मुलाऐवजी दुसऱ्याच महिलेच्या जिवंत मुलीला मृत समजून नातेवाईकांच्या ताब्यात दिले, सदर बाळाला अंत्यसंस्काराकरिता नातेवाईक घेऊन गेले असता सदर बाळ जिवंत असल्याचे व मुलगा नसून मुलगी असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच उक्त रुग्णालयामध्ये दिनांक १८ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास दाखल झालेल्या ७ वर्षीय मुलाच्या अंडकोशावर सूज आली असता फ्रॅक्चर असल्याचे निदान वैद्यकीय अधिकाऱ्यांनी केल्याचे दिनांक २१ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात गलथान कारभार चालत असून केवळ समयसूचकतेमुळे मुलाची शस्त्रक्रिया टळली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त सर्व प्रकरणांबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने चुकीच्या पध्दतीने निदान करणाऱ्या वैद्यकीय अधिकारी व प्रशासकीय अधिकाऱ्यावर तसेच संबंधित कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, अकोला येथे दिनांक १० जानेवारी, २०१६ रोजी उपचाराकरिता दाखल करण्यात आलेल्या एका नवजात बालकाचा दिनांक १३ जानेवारी, २०१६ रोजी उपचारादरम्यान मृत्यू झाला, हे खरे आहे.

(२) मृत मुलाऐवजी अन्य जिवंत मुलीला नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले, हे खरे आहे,

(३) हे खरे आहे.

(४) व (५) प्रस्तुत प्रकरणी चौकशीअंती दोषी आढळून येणाऱ्यांविरोधात कारवाई करण्याबाबत संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन यांना कळविण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राळेगांव (जि.यवतमाळ) तालुक्यातील ग्रामिण भागामध्ये राष्ट्रीय पेयजल योजनेमध्ये झालेला अपहार

**(२३) * ४५९८६ प्रा.अशोक उईके (राळेगाव), श्री.मदन येरावार (यवतमाळ) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राळेगांव (जि.यवतमाळ) तालुक्यातील गावागावातील पाणी समस्या कायम स्वरुपी निकाली काढण्याकरिता शासनाने राष्ट्रीय पेयजल योजनेची निर्मिती केली, सदर योजनेचे काम पाणीपुरवठा व दक्षता समितीला देण्यात आले असल्याचे दिनांक २५ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कळमनेर, वाढोणा बाजार, विहीरगांव येथील व काही ठिकाणी पाणीपुरवठयाचे काम ग्रामीण पाणी पुरवठा विभागाने उक्त समितीला विचारात न घेता निधीची पुर्ण उचल करुन अर्धवट नळयोजनेचे काम करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच उक्त तालुक्यातील जिल्हा परिषद पाणी पुरवठा अंतर्गत येणाऱ्या पाणीपुरवठा उपविभाग राळेगांव यांनी ग्रामीण पाणी पुरवठा योजनेतून १३ खेडे गावामध्ये नळ जोडणी, पाईप टाकणे, टाकीचे बांधकाम अशी कामे केल्याचे दिनांक १० जानेवारी, २०१६ रोजी वा त्यादरम्यान निर्दशनास आले, हे ही खरे आहे काय ,

(४) असल्यास, ग्रामीण पाणीपुरवठा समितीवर गाव पातळीवरील सदस्य नेमण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुषंगाने उक्त ग्रामीण पाणी पुरवठा विभागातील अपहार केलेल्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) अंशत: खरे आहे.

सदरहू तालुक्यातील १३ खेडेगावांमध्ये जिल्हा परिषद पाणीपुरवठा उपविभाग, राळेगांव मार्फत ग्रामीण पाणी पुरवठा योजनेतून कामे घेण्यात

आली. तथापि, मौजे कळमनेर व वाढोणा बाजार या दोन गावातील कामे पाणी पुरवठा समितीकडून निविदा प्रक्रियेसंबंधी प्रतिसाद न मिळाल्याने रद्द करण्यात आली. उर्वरीत ११ गावांपैकी भारत निर्माण अंतर्गत ४ गावांमध्ये आर्थिक अनियमितता, समितीचा प्रतिसाद नसणे, व शौचालयाचे उद्दीष्ट साध्य होत नसल्याने व कामे पुर्ण करण्यासाठी निधी कमी पडत असल्यामुळे रखडली आहेत तर उर्वरीत ७ कामांपैकी वाटखेड येथील काम पूर्ण करुन पाणी पुरवठा सुरु करण्यात आला असून ६ कामे प्रगतीपथावर आहेत.

(४) होय, हे खरे आहे.

(५) होय.

भारत निर्माण अंतर्गत ४ गावे व राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेतील १ गाव येथील योजनांच्या कामात आर्थिक अनियमितता झाल्याने उपअभियंता जिल्हा परिषद उपविभाग राळेगाव यांचे कडून चौकशी करण्यात आली असून, नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यासाठी गट विकास अधिकारी पंचायत समिती राळेगाव यांचेकडे चौकशी अहवाल पाठविण्यात आला आहे. त्यापैकी परसोडा येथील पाणी पुरवठा समिती कड्डुन वसुलपात्र रक्कमेचा भरणा करण्यात आलेला आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील तहसिल पुरवठा विभागात होत असलेला गैरकारभार

**(२४) * ४८८४० श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार (जि.पालघर) तालुक्यात तहसिल पुरवठा विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी बोगस शिधापत्रिका, शिधापत्रिका वितरणात अनियमितता, शिधापत्रिकाधारकांना त्रास देणे, विलंब लावणे व आदिवासींच्या अशिक्षितपणाचा फायदा घेऊन वारंवार पैशाची मागणी करणे असा मनमानी कारभार करीत असल्याचे दिनांक २ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, सदर प्रकरणी संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापुर जिल्हयात शालेय पोषण आहारासाठी धान्य पुरविणे व महिला बचत गटाची थकित रक्कम अदा करण्याबाबत

**(२५) * ४००३१ श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शालेय विद्यार्थ्यांना दिले जाणारे मध्यान्ह भोजन अक्षयपात्र योजनेअंतर्गत सेंट्रल किचनयोजनेद्वारे पुरविण्याची बाब राज्य शासनाच्या विचाराधीन असून सदर योजनेमुळे मध्यान्ह भोजन पुरवठा करणाऱ्या कोल्हापुर जिल्ह्यातील ३०३३ बचत गटांचे काम बंद होवून महिला बेरोजगार होणार आहेत, हे खरे आहे काय,
(२) तसेच कोल्हापुर जिल्हयात शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत शालेय पोषण आहार पुरवठा करणाऱ्या ठेकेदारांना गत पाच महिन्यांपासून बिले न मिळाल्याने महिला बचत गटांची सुमारे ५ कोटीची रक्कम थकीत असल्याचे व शालेय पोषण आहारासाठी देण्यात येणारे धान्य उपलब्ध न झाल्याने महिला बचत गटांना स्वखर्चाने धान्य खरेदी करावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व तद्नुसारशालेय पोषण आहारासाठी धान्य उपलब्ध करुन देण्याबाबत व महिला बचत गटाची थकित देयके अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) शालेय पोषण आहार योजनेंतर्गत नागरी भागात केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणालीद्वारे विद्यार्थ्यांना आहाराचा पुरवठा करण्याचा निर्णय शासनाने दि. १८/०६/२००९ रोजी घेतलेला आहे. यानुसार मुंबई महापालिका व्यतिरिक्त इतर नागरी भागामध्ये केंद्रिय स्वयंपाकगृह प्रणालीद्वारे आहाराचा पुरवठा करण्यासाठी संस्थांची निवड करण्यात आलेली आहे. तथापि, याबाबत न्यायालयीन बाबी उद्भवल्यामुळे केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणाली अद्याप सुरु करता आलेली नाही. मा. सर्वोच्च न्यायालयाने एप्रिल, २०१५ मध्ये राज्य शासनाच्या बाजुने निर्णय दिलेला आहे. यामुळे केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणाली सुरु करण्याबाबत पुढील कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे. निवड झालेल्या संस्थांमध्ये महिला बचत गटांचा समावेश आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सुलतानपुर व भांडेगाव (ता.खुलताबाद, जि.औरंगाबाद) येथे राष्ट्रीय पेयजल ग्रामीण पाणी पुरवठा योजनेमध्ये झालेला गैरव्यवहार**

**(२६) * ४८९४० श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुलतानपुर व भांडेगाव (ता.खुलताबाद, जि.औरंगाबाद ) ग्रुप ग्रामपंचायतीतील गांवासाठी राष्ट्रीय पेयजल ग्रामीण पाणी पुरवठा योजनेतील १ कोटी ११ लाख रुपये सरपंच, ग्रामसेवक व जिल्हा परिषद पाणी पुरवठा विभागाच्या अभियंत्यांनी संगनमत करुन त्यामध्ये आर्थिक गैरव्यवहार केल्या प्रकरणी गावाच्या पाणी पुरवठा समिती सदस्यांनी व सामाजिक लेखापरिक्षण नियंत्रण समिती व महिला विकास समितीने विभागीय आयुक्त (महसूल), मा.पाणी पुरवठा राज्यमंत्री, मा.मुख्यमंत्री व महामहिम राज्यपाल यांच्याकडे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे तक्रारी करुन या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महामहिम राज्यपालांनी तक्रारीची दखल घेऊन याप्रकरणी चौकशी करुन दोषी असणाऱ्यांविरुध्द कारवाई करावी असे आदेश शासनास दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी उक्त आदेशाच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे व कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर प्राप्त झालेल्या तक्रारीनुसार दोन उपअभियंता, ग्रा.पा.पु.वि. यांचेकडून दि. २१.२.२०१६ रोजी सुलतानूपर व भांडेगाव (ता.खुलताबाद, जि. औरंगाबाद) ग्रुप ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, अध्यक्ष, ग्रा.पा.पु. स्व. समिती, स्वत: अर्जदार, ग्रामसेवक व इतर ग्रामस्थांच्या उपस्थितीत योजनेची प्रत्यक्ष पहाणी करुन संयुक्त चौकशी करण्यात आली. चौकशी अहवालानुसार योजनेच्या कामामध्ये गैरव्यवहार झाला नसल्याचे आढळून आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सांगोला तालुका व कुर्डुवाडी (जि.सोलापूर) शहराला दुषित पाणीपुरवठा होत असल्याबाबत

**(२७) * ४२५०० श्री.सिध्दराम म्हेत्रे (अक्कलकोट), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगोला (जि.सोलापूर) येथील शिरभावी प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेतून पिवळसर दूषित पाणीपुरवठा होत असल्याने तालुक्यातील ५७ गावातील सुमारे ३ लाख तर शहरातील ३६ हजार नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले असल्याचे दिनांक २० डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच कुर्डुवाडी (जि.सोलापूर) शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या जलशुध्दीकरण केंद्रातून होणारा पाणीपुरवठा अशुध्द होत असून त्याचा तेथील नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच,  सोलापूर शहराला पिवळसर पिण्याच्या पाण्याचा पुरवठा माहे डिसेंबर २०१५ पासून होत असल्याचे पालिकेच्या व शासनाच्या निदर्शनास आले आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने नागरीकांना आरोग्याच्या दृष्टीने शुध्द पाणीपुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१)  नाही.

शिरभावी व ८१ गावे (ता. सांगोला, जि. सोलापूर) प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेच्या जलशुध्दीकरण केंद्रातून क्लोरिनेशन पध्दतीने पाणी शुध्द करुन पाणीपुरवठा केला जातो. तसेच दररोज शुध्द केलेल्या पाण्याची चाचणी घेवुन पाणी शुध्द झालेची खात्री करण्यात येते.

(२) नाही.

महाराष्ट्र राज्य सार्वजनिक आरोग्य सेवा, आरोग्य प्रयोगशाळा, सोलापूर यांचे अहवालानुसार जलशुध्दीकरण केंद्रातून कुर्डुवाडी शहराला पुरवठा करण्यात येणारे पाणी पिण्यास योग्य आहे.

(३) होय

(४) सोलापूर शहराला पिवळसर पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होत असल्याबाबत जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्या कक्षात दि.३१.१२.२०१५ रोजी झालेल्या बैठकीत तुरटी ऐवजी PAC पावडर वापरण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार पाण्यास पिवळसर रंग येण्याचे बंद झाले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्हयातील पाणी टंचाई कृती आराखडा तयार करण्याबाबत

**(२८) * ४४५९६   श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :**   सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील अनेक ठिकाणी टँकरने पाणीपुरवठा होत असून भीषण पाणी टंचाईला नागरिकांना सामोरे जावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे  खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जिल्हयातील पाणीटंचाईवर मात करण्यासाठी जिल्हा परिषदेतर्फे पाणी टंचाई कृती आराखडा तयार करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, सदर कृती आराखडा शासनास सादर करण्यात आला आहे काय,

(४) असल्यास, सदर कृती आराखडयात कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या वा येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) होय.

(४) रायगड जिल्ह्याचा सन २०१५-१६ चा संभाव्य पाणी टंचाई कृती आराखडा खालीलप्रमाणे आहे:-

१) माहे ऑक्टोबर २०१५ ते डिसेंबर २०१५ हा पहिल्या टप्प्याचा कृती आराखडा निरंक असून कोणतीही उपाययोजना प्रस्तावित केलेली नाही.

२) माहे जानेवारी २०१६ ते मार्च २०१६ या दुस-या टप्प्यात खालील उपाययोजना समाविष्ट आहेतः-

अ) टँकरद्वारे पाणी पुरवठा योजना

ब) विंधण विहिर खोदणे

क) नळ पाणी पुरवठा योजना दुरुस्ती करणे

३) एप्रिल २०१६ ते जून २०१६ या तिस-या टप्प्यात ४ उपाययोजनांचा समावेश आहे:-

अ) टँकरद्वारे पाणी पुरवठा योजना

ब) विंधण विहिर खोदणे

क) नळ पाणी पुरवठा योजना दुरुस्ती करणे

ड) तात्पुरती पूरक नळ पाणी पुरवठा योजना

उपरोक्त प्रमाणे एकूण रु.७८८.८०लक्ष किंमतीच्या एकूण १८६६ उपाययोजना प्रस्तावित करण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील चेंबूर, माहूल व अंबापाडा येथील रासायनिक कंपन्यांमधून उत्सर्जित होणा-या घातक वायुमुळे होणारे प्रदूषण

**(२९) * ४०००९ श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील चेंबूर माहूल व अंबापाडा येथील रासायनिक कंपन्यांमधून उत्सर्जित होणा-या घातक वायूमुळे या परिसरातील गावक-यांना व रहिवाशांना दृष्टी कमी होणे, खोकला, श्वसनाला त्रास आदी आजारांनी ग्रासले असल्याची बाब दिनांक ८ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के.ई.एम. या रुग्णालयाच्या अहवालानूसार सदर रासायनिक कंपन्यांमधून उत्सर्जित होणा-या घातक वायूमुळे या परिसरातील रहिवाशांपैकी ६४ टक्के लोकांना खोकला, ६४ टक्के लोकांना श्वसनाचा त्रास, ९४ टक्के लोकांना डोळे चुरचुरणे तर १०० टक्के लोकांना सातत्याने उग्र वास येत असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ठिकाणी असलेल्या कंपन्यांच्या टाक्यांमध्ये ॲसिटीन, अनिलिन, टॉलीत मेथॅनॉल, बेझिंन आदी विषारी रसायनाचा प्रादुर्भाव होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दोषी आढळून आलेल्या उद्योगांवर जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम १९७४ व हवा (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९८१ अन्वये नियमानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच सदर कंपन्या इतरत्र हलविण्याकरिता शासनाद्वारे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) दिनांक ०८.०१.२०१६ रोजी व त्यासुमारास चेंबूर, माहूल व आंबापाडा येथील रासायनिक कंपन्यांतून उत्सर्जित होणाऱ्या घातक वायुमुळे त्रास होत असल्याबाबतची तक्रार प्राप्त झालेली नाही.
(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबईतील गोरेगाव चित्रनगरीतील सहायक व्यवस्थापकांविरुध्द करावयाची कारवाई**

**(३०) * ४६१३६ श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.बाळासाहेब सानप (नाशिक पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील गोरेगाव चित्रनगरीत गत अनेक वर्षे सहायक व्यवस्थापक (कलागरे) पदावर असलेले शिवाजी भोसले यांच्या नियमबाहय कामांमुळे कलानगरीचे कोटयवधीचे नुकसान झाल्याच्या अनेक तक्रारी असतानाही शिवाजी भोसले यांच्यावर कोणतीच कारवाई केली जात नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चित्रनगरीच्या भाडे वसुलीत अनियमिततेबाबत सांस्कृतिक विभागाने त्यांची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त सहायक व्यवस्थापक हे १० वी अनुत्तीर्ण असूनही त्यांना पदोन्नती दिली गेली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार दोषीविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) श्री. शिवाजी भोसले हे महामंडळाच्या आस्थापनवेर कार्यरत असून त्यांच्या विरुध्द प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने महामंडळाच्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(३) श्री.भोसले यांना १० वी उत्तीर्ण झाल्यानंतर पदोन्नती देण्यात आल्याचे त्यांच्या वैयक्तिक अभिलेख्यातून दिसून येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**लोणगांव (ता.भोकरदन, जि. जालना) येथे टँकरने**
**पाणी पुरवठा करण्यासंदर्भात**

**(३१) * ४७२७१ श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोणगांव (ता.भोकरदन, जि. जालना) येथे राष्ट्रीय पेयजल योजनेअंतर्गत गेल्या वर्षी एक कोटी रुपयांची पाणी पुरवठा योजना कार्यान्वित होऊनही हिवाळयातच येथील ग्रामस्थांना हंडाभर पाण्याकरिता भटकंती करावी लागत असल्याने तातडीने शासकीय टँकरने पाणीपुरवठा करण्याची मागणी उपसरपंच यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावाला तातडीने शासकीय टँकरने पाणी पुरवठा करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) व (२) लोणगांव नळ पाणी पुरवठा योजना जून २०१५ मध्ये कार्यान्वित करण्यात आली होती. तथापि सन २०१५ मध्ये पर्जन्यमान कमी झाल्याने लोणगाव पाणी पुरवठा योजनेचा उद्‌भव विहिर असलेल्या बानेगाव धरणात पाणी नसल्यामुळे सदर उद्‌भवाचे पाणी अत्यल्प झाले. त्यामुळे सरपंच/ ग्रामसेवक यांनी टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यासाठी दिनांक १ जानेवारी २०१६ रोजी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भोकरदन यांच्याकडे प्रस्ताव सादर केला, त्याप्रमाणे दिनांक १५ जानेवारी २०१६ पासून २ टँकरद्वारे प्रतिदिनी प्रत्येकी ३ खेपा याप्रमाणे पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**रत्नागिरी जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या मोडकळीस**
**आलेल्या शाळांच्या इमारतींच्या दुरुस्तीबाबत**

**(३२) * ४२२६८ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषदेच्या सर्वशिक्षा अभियानांतर्गत जिल्हा परिषद शाळांचे दुरुस्तीकरण व निर्लेखनाअंतर्गत धोकादायक व मोडकळीस आलेल्या शाळा पाडून नव्याने उभारण्याचे काम करते त्यासाठी अनुदान व निधी केंद्र शासनाकडून दिला जातो, परंतु, सन २०१३ पासून सदर अनुदान व निधी मिळणे बंद झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे रत्नागिरी जिल्ह्यातील १३१ व चिपळूण तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या १२ शाळा मोडकळीस आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मोडकळीस व गळक्या इमारतीच्या दुरुस्तीचा प्रस्ताव जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाकडे पाठविण्यात आला परंतु सदर प्रस्तावावर अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नसल्याचे दिनांक ७ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शिक्षणाचा दर्जा सुधारावा याकरिता शासन विविध उपक्रम राबवित आहे, मात्र ज्या इमारतींमध्ये विद्यार्थी शिकत आहेत त्या इमारतींच्या दुरुस्तीबाबत शासन उदासिन असल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणाकडे जिल्हा परिषद शिक्षण विभाग गांभीर्याने लक्ष देत नसल्याने जिल्ह्यातील शेकडो शिक्षकांचे व हजारो विद्यार्थ्यांचे जीव धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदर प्रकरणाकडे जिल्हा परिषद शिक्षण विभाग दुर्लक्ष करित असून याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार आहे तसेच सदरहू १३१ धोकादायक इमारतींमध्ये सुरु असलेल्या शाळांतील विद्यार्थी व शिक्षकांची

सुरक्षितता विचारात घेऊन सदरहू शाळांची विनाविलंब पुनर्बांधणी करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली  वा करण्यात आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही

(२) अंशत: खरे आहे.

रत्नागिरी जिल्हयात २७२ शाळा  मोडकळीस आल्या असून त्यापैकी २२७ शाळांना निर्लेखनास मंजूरी देण्यात आली आहे.

(३) हे खरे नाही.

जिल्हा परिषद शाळांच्या इमारतीच्या दुरूस्तीसाठी सर्व शिक्षा अभियान अंतर्गत तसेच जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत निधी मंजूर झाल्यावर दुरूस्तीची कार्यवाही करण्यात येते.

(४) हे खरे नाही.

सदर शाळांच्या इमारतीच्या दुरूस्तीसाठी सर्व शिक्षा अभियान अंतर्गत तसेच जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत निधी मंजूरीची वेळोवेळी मागणी करण्यात आली आहे.

(५) हे खरे नाही.

ज्या शाळांच्या इमारती मोडकळीस आल्या आहेत त्यातील विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था अन्य शासकीय इमारती, खाजगी इमारती यामध्ये केली जाते.

(६) सर्व शिक्षा अभियान, जिल्हा वार्षिक योजना या व्यतिरिक्त सदर शाळांच्या इमारतींच्या दुरूस्तीसाठी, जिल्हा परिषद सेस अनुदान, सादिल अनुदान यामधून निधी मंजूर करण्यात येत आहे.

-----------------

## दुगाडफाटा (ता.भिवंडी,जि.ठाणे) येथे असणाऱ्या गोदामातील भात खरेदी केंद्र बंद असल्याबाबत

**(३३) * ४४६६८ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दुगाडफाटा (ता.भिवंडी,जि.ठाणे) येथे असणाऱ्या पणन महामंडळाच्या गोदामातील भात खरेदी केंद्र ठेकेदारांच्या गैरकारभारामुळे गेल्या काही महिन्यापासून बंद असल्याने शेतकऱ्यांना भाताची विक्री खुल्या बाजारात व कमी

भावाने करावी लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच ठेकेदाराकडून गोदामाचे भाडे थकल्यामुळे पणन महामंडळाने सदर गोदामे वाडा येथील कोका कोला कंपनीला भाडयाने दिल्यामुळे तेथील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सर्व प्रकरणांची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.

दुगाडफाटा येथे भात खरेदी केंद्र सुरु करण्यात आले असून त्यावर ५४५८.२१ क्विंटल धानाची खरेदी झालेली आहे.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**कोल्हापूर जिल्हयातील मौजे बाचणी, निगवे दुमाला व गगनबावडा येथील क्रीडा संकुलाच्या अपूर्ण बांधकामाबाबत**

**(३४) * ४६७४९ श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील क्रीडा धोरण २००१ नुसार कोल्हापूर जिल्हयातील मौजे बाचणी, निगवे दुमाला, (ता. करवीर) व गगनबावडा (ता.गगनबावडा) येथे क्रीडा - संकुल उभारण्यास शासनाने दिनांक ३१ मार्च, २००३ रोजी मान्यता प्रदान केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यावेळी क्रीडा संकुलाची प्रचलित अनुदान मर्यादा रु. २५ लाख इतकी होती त्यानंतर शासनाने माहे मार्च, २००९ मध्ये अनुदान मर्यादा रूपये १ कोटी करुन सुधारीत अंदाजपत्रकास माहे जुलै, २०१० मध्ये परवानगी दिली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त क्रीडा संकुलाची अपूर्ण कामे पूर्ण करणेबाबत येथील ग्रामस्थांनी व लोकप्रतिनिधींनी जिल्हा क्रीडा अधिकारी यांना वारंवार सुचना देऊनही अद्याप क्रीडा संकुलाच्या अपूर्ण कामास सुरुवात करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अपूर्ण काम तात्काळ सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) तालुका क्रीडा संकुल निगवे दुमाला (ता.करवीर) यासाठी दिनांक २७.०३.२००३ अन्वये तर तालुका क्रीडा संकुल करवीर बाचणी यासाठी दिनांक २१.०६.२००४ अन्वये तत्वत: मान्यता देण्यात आली आहे. तसेच तालुका क्रीडा संकुल गगनबावडा उभारण्यासाठी दिनांक १२.०९.२००३ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

(२) तालुका क्रीडा संकुल निगवे दुमाला (ता. करवीर) याकरिता दिनांक २९.०९.२०१० अन्वये रु. ७५.६२ लक्ष, करवीर बाचणी याकरिता दिनांक ०१.०९.२०१४ अन्वये रु. १३३.०८ लक्ष व गगनबावडा याकरिता दिनांक २८.०३.२०१३ अन्वये रु. १०२.०५ लक्षच्या सुधारीत अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली आहे.

(३) व (४) तालुका क्रीडा संकुल निगवे दुमाला (ता.करवीर)/गगनबावडा या संदर्भात यापूर्वी पूर्ण झालेल्या कामांची दुरुस्ती करण्याची गरज असल्याने लोकप्रतिनिधींनी समितीच्या बैठकीत सूचना केलेल्या आहेत. त्यानुसार क्रीडा संकुलाची अपूर्ण कामे पूर्ण करण्याकरिता अंदाजपत्रक व आराखडे तयार करण्याची कार्यवाही संबंधित क्रीडा संकुल समितीमार्फत करण्यात येत आहे. तसेच तालुका क्रीडा संकुल बाचणी करिता जागेची हद्द निश्चित करण्यासाठी भुमी अभिलेख कार्यालय व संकुल समिती यांचेमार्फत कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नवी मुंबई व मुंबई महानगरपालिकेच्या शाळांतील विद्यार्थ्यांना पोषण आहार देण्याबाबत**

**(३५) * ४२८४१ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.योगेश सागर (चारकोप), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थी पोषण आहारापासून वंचित राहत असल्याची माहिती माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच मुंबई शहरातील पालिकेच्या ६४ शाळांमध्ये ४२ हजार विद्यार्थी शिक्षण घेत असून या विद्यार्थ्यांना पोषण आहार पुरविणाऱ्या कंत्राटदाराची मुदत पाच महिने अगोदरच संपुष्टात आली असल्याने पालिका अद्याप कंत्राट काढण्यास दिरंगाई करीत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू कंत्राट ५ महिने प्रलंबित ठेवण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास उक्त सर्व प्रकरणांची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार मुंबईतील पोषण आहार पुरविणाऱ्या कंत्राटदाराच्या मुदतीबाबत व नवी मुंबईतील शाळेतील विद्यार्थ्यांना पोषण आहार देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) शालेय पोषण आहार योजनेंतर्गत नागरी भागात केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणालीद्वारे विद्यार्थ्यांना आहाराचा पुरवठा करण्याचा निर्णय शासनाने दि. १८/०६/२००९ रोजी घेतलेला आहे. यानुसार मुंबई महापालिकेव्यतिरिक्त इतर नागरी भागांमध्ये केंद्रिय स्वयंपाकगृह प्रणालीद्वारे आहाराचा पुरवठा करण्यासाठी संस्थांची निवड करण्यात आलेली आहे. तथापि,

याबाबत न्यायालयीन बाबी उद्भवल्यामुळे केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणाली अद्याप सुरु करता आलेली नाही. मा. सर्वोच्च न्यायालयाने एप्रिल, २०१५ मध्ये राज्य शासनाच्या बाजुने निर्णय दिलेला आहे. यामुळे केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणाली सुरु करण्याबाबत पुढील कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे. मुंबई महापालिका क्षेत्रामध्ये संस्थांची निवड करण्यासाठी प्रक्रिया सुरु करण्याबाबतच्या प्रस्तावावर शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

सदर प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत शालेय पोषण आहारात खंड पडू नये यासाठी यापूर्वी आहार शिजवून देत असलेल्या संस्थामार्फत आहार शिजवून देण्याचे काम सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**रानसई (ता.उरण, जि.रायगड) येथील आदिवासी**
**वाड्यांना पाणी पुरवठा करण्याबाबत**

**(३६) * ४८४२७ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रानसई (ता.उरण, जि.रायगड) येथील आदिवासी वाड्यांना पाणी पुरवठा करण्यासाठी हेटवणे धरणातून लाखो रुपये खर्च करून डोंगरातील चढ-उतारावर टाकलेल्या पाईप लाईन मधून पाणीच येत नसल्यामुळे आदिवासींना पिण्याच्या पाण्यासाठी मैलोंमैल जावे लागत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त भागामध्ये मुबलक पाणी उपलब्ध करण्यासाठी भारत निर्माण योजनेतून ५४ लाख रुपये खर्च करून विहिरींमध्ये पाणी साठवण्यासाठी टाकण्यात आलेली पाईप लाईन कमी दाबाच्या वीज पुरवठ्यामुळे बंद पडली आहे, हे ही खरी आहे काय,

(३) असल्यास, उक्त ठिकाणी बांधण्यात आलेल्या विहिरींना पाणी पुरवठा करण्यासाठी सुरळीत व उच्च दाबाने वीज पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे, असल्यास, कार्यवाहीचे स्वरूप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सुरळीत व उच्च दाबाने वीज पुरवठा करणेबाबत कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, उरण यांचेकडे पाठपुरावा सुरु आहे. उच्च दाबाचे ट्रान्सफॉर्मर बसविल्यानंतर रानसई येथील आदिवासी वाड्यांना नळ योजनेतून पाणी पुरवठा सुरळीतपणे सुरु करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पनवेल ( जि.रायगड ) तालुक्यातील पनवेल एज्युकेशन सोसायटीच्या याकूब बेग हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज मधील गैरव्यवहार**

**(३७) * ४२३१४ ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील पनवेल एज्युकेशन सोसायटीच्या याकूब बेग हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज मधील पोषण आहार, विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी घेण्यात येणारी देणगी, मौलाना आझाद फंडाकडून मिळणारा निधी व शिक्षकांच्या नेमणूकीत अशाप्रकारे अनेक कामांत गैरव्यवहार झाल्याची तक्रार उक्त संस्थेतील सदस्यांनी माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री व धर्मादाय आयुक्त, रायगड, अलिबाग यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने गैरव्यवहार करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) असे निवेदन मा. मुख्यमंत्री कार्यालय व धर्मादाय आयुक्त, रायगड, अलिबाग यांच्याकडे प्राप्त झालेले नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर येथील पंचगंगा व कृष्णा नदी प्रदूषणाबाबत करावयाच्या उपाययोजना

**(३८) * ४१००९ श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यासह इचलकरंजी शहर व परिसरातून थेट पंचगंगा नदी पात्रात सोडल्या जाणाऱ्या सांडपाण्यामुळे तसेच जलपर्णीच्या बिजांचा हिरव्या तवंगामुळे नदीपात्रातील पाणी दूषित झाल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच पंचगंगा नदी प्रदूषण मुक्तीसाठी कसबा बावडा येथे ७५ कोटी रुपये खर्चून सांडपाण्यासह मैला मिश्रित पाण्यावर प्रक्रिया करणारे केंद्र (एसटीसी प्लँट) उभारण्यात आले असून सदर केंद्र अद्यापही सुरु झाले नाही तसेच दुधाळी येथे अशाच प्रकारे २९ एमएलडी सांडपाण्यावर प्रक्रिया केंद्र प्रस्तावित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोल्हापूर शहरातील १२ नाले एकत्र करून त्यातील सांडपाणी एकत्रित संकलित करून त्यावर प्रक्रिया करणेबाबत आजतागायत सुरवात झालेली नाही व जयंती नाल्यातुन सांडपाणी कोणत्याही प्रक्रियेविना नदी पात्रात सोडले जात आहे तसेच कोल्हापूर शहरातील नाले वळविण्याच्या कामाला शासनाकडून निधी मिळाला नसल्याने कामास सुरवात झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच इचलकरंजी नगरपालिकेच्या हद्दीतून बाहेर पडणारे सांडपाणी रोखले न गेल्याने कोल्हापूर पासून शिरोळ पर्यंत नदी प्रदुषित झाली आहे व नदीकाठी असणाऱ्या नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच पंचगंगा नदीतील प्रदुषण रोखण्यासाठीच्या सर्व उपाययोजना माहे मार्च, २०१६ अखेर पूर्ण करण्याच्या सूचना विभागीय आयुक्त यांनी दिनांक ६ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(६) तसेच कोल्हापूर येथील कृष्णा व पंचगंगा नदी प्रदुषित झाल्यामुळे नदीकाठच्या गावात दिनांक १ डिसेंबर ते २६ डिसेंबर, २०१५ या कालावधीत ताप, सर्दी, खोकला, डेंग्यू, हिवताप व चिकुनगुनिया आदि साथीच्या रोगाचे ६६६ रुग्ण आढळून आले, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने प्रश्न भाग (५) मधील सूचनेनुसार संबंधित विभागाने व जलपर्णीवर नियंत्रण आणण्याकरीता तसेच सदर साथीच्या रोगांवर नियंत्रण मिळविण्याकरिता व नदी प्रदूषण रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) होय, हे खरे आहे. तथापि, राष्ट्रीय नदी कृती योजनेतंर्गत कोल्हापूर शहरात सांडपाणी प्रक्रीया संयंत्रणा बसविण्याकरिता कें‍द्रीय पर्यावरण वन व वातावरण बदल मंत्रालयाने रुपये रक्कम ७६ कोटी रुपयांचा निधी वितरीत केला असून सदर प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात आहे.

(४) हे खरे नाही. पंचगंगा नदी काठच्या गावामध्ये कोणताही जलजन्य साथीचा उद्रेक झालेला नाही.

(५) होय, हे खरे आहे.

(६) होय, हे खरे आहे, माहे डिसेंबर, २०१५ मध्ये घालवाड, ता. शिरोळ येथे चिकनगुनिया या किटकजन्य आजाराचे ४ रुग्ण आढळून आले होते. तसेच ताप, सर्दी, खोकला, डेंग्यू हिवतापाचे रुग्ण तुरळक प्रमाणात आढळून आले होते.

(७) पंचगंगा नदीकाठच्या गावामध्ये साथीच्या रोगावर नियंत्रण करणेसाठी आरोग्य विभाग, कोल्हापूर या विभागामार्फत पुढीलप्रमाणे साथप्रतिबंधात्मक उपाययोजना करणेत येत आहेत.

अ) आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत दैनंदिन घरोघर सर्वेक्षणाच्या माध्यमातून रुग्ण शोधनेबाबत कार्यवाही चालू आहे.

ब) घरोघर भेट देऊन पिण्याच्या पाण्याची OT टेस्ट घेऊन शुध्दीकरणाच्या खात्रीनंतर पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

क) बुदल्याद्वारे मेडीक्लोरचा वापर करुन घरोघरी पाणी शुध्दीकरण करणेबाबत आरोग्य शिक्षण देणेत येत आहे.

ड) पाणी नमुने तपासणीकरीता प्रयोगशाळेत नियमित पाठविणेत येतात.

इ) ग्रामपंचायतीमार्फत पुरेसा ब्लिचींग पावडरचा साठा उपलब्ध राहील याबाबत दक्षता घेणेत येते.

ई) रुग्णाच्या सहवासिंतावर उपचार केले जातात.

उ) साथरोग कक्षात साथप्रतिबंधात्मक अत्यावश्यक औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध ठेवणेत आला आहे.
ऊ) गावामध्ये नियमित परिसर स्वच्छता व गटार स्वच्छता मोहिम राबविणेत येते.
ए) निश्चित निदानासाठी आवश्यक असेल तेथे रक्त व रक्तजल नमुने घेऊन निदान निश्चिती करणेची कार्यवाही केली जाते.

-----------------

**नांदिवली (ता.कल्याण, जि. ठाणे) परिसरातील आर्य गुरुकुल शाळेत हेलियम सिलेंडरचा झालेला स्फोट**

**(३९) * ४१७६० श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदिवली (ता.कल्याण, जि. ठाणे) परिसरातील आर्य गुरुकुल शाळेत हेलियम सिलेंडरचा स्फोट झाल्याने १ ठार तर १२ विद्यार्थी जखमी झाल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय निदशर्नास आले, तद्नुसार शाळा परिसरामध्ये हेलियम सिलेंडर घेऊन येण्यास परवानगी देणाऱ्या शाळा व्यवस्थापक व संबंधितावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच मृत व जखमी विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांना शाळेकडून कोणती आर्थिक मदत देण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, सदर स्फोटामध्ये फुगेवाला जागीच ठार झाला तसेच पाच विद्यार्थी व सात पालक जखमी झाले आहेत.
(२) व (३) सदर प्रकरणी करण्यात आलेल्या चौकशी मध्ये आर्य गुरुकुल शाळेच्या आवारात लिटील आर्यन शाळेचे पूर्व प्राथमिक विभागाचा क्रीडा महोत्सव दिनांक २४ डिसेंबर, २०१५ आयोजित केला होता. सदर कार्यक्रम संपल्यानंतर शालेय आवारात उपस्थित असलेल्या फुगेवाल्याच्या गॅस सिलेंडरचा स्फोट होऊन त्याचा मृत्यू झाला. तसेच फुगे खरेदी करत असलेले एकूण-५ विद्यार्थी व

७ पालक जखमी झाल्याचे चौकशीत आढळून आले आहे. जखमी विद्यार्थी व पालक यांच्या औषधोपचारासाठी शाळेच्या व्यवस्थापनामार्फत सुमारे रु. २७,३४,२५७/- इतका खर्च करण्यात आला आहे.

----------------

**वाडीवऱ्हे (जि.नाशिक) येथील रेशन धान्यामध्ये झालेला गैरव्यवहार**

**(४०) * ४७९४२ श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बहुचर्चित वाडीवऱ्हे (जि.नाशिक) येथील रेशन धान्य गैरव्यवहारामध्ये ३४ रेशन दुकानदारांचा सहभाग असल्याचे पोलिस तपासात माहे डिसेंबर २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गैरव्यवहारातील काळा पैसा दडविण्यासाठी साईबाबा ॲग्रो महालक्ष्मी कॉर्पोरेशन बालाजी एंटरप्रायझेस, तिरुपती ॲग्रो ग्रीनफील्ड कॉर्पोरेशन, सुरेश ट्रेडर्स आदि कंपन्या बनावट कागदपत्राद्वारे तयार करुन तिच्याद्वारे कोटयवधी रुपयांचा व्यवहार झाल्याचे देखील निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले तदनुसार यास जबाबदार असणा-या व्यक्तींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) , (२), (३) व (४) सदर गैरव्यवहाराबाबत वाडीव-हे पोलीस स्टेशन ता. इगतपुरी जि. नाशिक येथे गु.नं.२२ दिनांक १०/३/२०१५ अन्वये गुन्हा दाखल आहे. त्याबाबत पोलीस विभागामार्फत सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

----------------

**कोंडेगव्हाण (ता.श्रीगोंदे, जि.अहमदनगर) येथे पाणीपुरवठा योजनेत झालेला गैरव्यवहार**

**(४१) * ४०५३३ श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोंडेगव्हाण (ता.श्रीगोंदे, जि.अहमदनगर) येथे पाणीपुरवठा योजनेत लाखो रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

(२) स्थानिक तक्रार झाल्यामुळे या योजनेची चौकशी करण्यात आली. परंतु योजनेत गैरव्यवहार झाल्याचे आढळून आले नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**लातूर जिल्ह्यातील ८४ गावांत विंधन विहिरींची खोलीची मर्यादा वाढविणेबाबत**

**(४२) * ४१४३९ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यातील ८४ गावांत पाणी पुरवठ्याच्या प्रयोजनासाठी विंधन विहिरींची खोलीची मर्यादा ६० मिटर ऐवजी १२० मिटर (सुमारे ४०० फूट) करणेबाबत मागणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामध्ये लातूर तालुक्यातील ३१ व रेणापूर तालुक्यातील १५ गावांचा समावेश असून शेतकऱ्यांची पाण्याअभावी होणारी गैरसोय लक्षात घेता विंधन विहिरींची खोलीची मर्यादा वाढवणेबाबत अथवा शेतकऱ्यांची पाण्याची सोय करण्याकरीता शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय.

(२) महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम २००९ अंतर्गत कलम ८ नुसार अधिसुचित व अनधिसुचित क्षेत्रात खोल विंधन विहिरीवर तसेच अधिसुचित क्षेत्रात सर्व प्रकारच्या विहिरी घेण्यास प्रतिबंध घालण्यात आलेला आहे.

तथापि, राज्य भूजल प्राधिकरणाचे दिनांक ३१ जुलै २०१५ रोजीच्या आदेशान्वये पिण्याचे पाण्यासाठी ६० मीटर पेक्षा जास्त खोलीची विंधन विहिर/ कुपनलिका खोदण्याची परवानगी देण्याचे अधिकार जिल्हा प्राधिकरण म्हणून महसूल विभागाच्या प्रांताधिकारी यांना देण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ऐतवडे खुर्द (ता.वाळवा, जि.सांगली) येथील राष्ट्रीय पेयजल योजनेत झालेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(४३) * ४८३३५ श्री.शिवाजीराव नाईक (शिराळा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ऐतवडे खुर्द (ता.वाळवा, जि.सांगली) येथील राष्ट्रीय पेयजल ई-टेंडरिंग करणे राज्य शासनाच्या विद्यमान धोरणानुसार बंधनकारक असताना एकाच कंत्राटदाराच्या वेगवेगळ्या दराच्या तीन निविदा घेण्यात येऊन व त्यापैकी ९% वाढीव दराच्या निविदा स्वीकृत करुन त्या कंत्राटदारास काम देण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेचे बांधकाम ज्या जागेवर करण्यात येत आहे ती जागा ग्रामपंचायतीच्या मालकीची नसल्याने ग्रामपंचायतीने जागा मालकीशिवाय बांधकाम करु नये अशा आशयाचे पत्र गटविकास अधिकारी, वाळवा यांनी ग्रामपंचायतीस दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेचे सुरु असलेले बांधकाम करीत असताना सांगली-मांगरुळ जिल्हा मार्ग (राज्यमार्ग) याकरिता शासन नियमानुसार जागा न सोडता ५०% बांधकाम राज्य मार्गामध्येच करण्यात येत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू पेयजल योजनेच्या कामाची व त्यात झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याची मागणी ग्रामपंचायत सदस्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने पेयजल योजनेचे तत्कालीन अध्यक्ष व समितीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

शासनाच्या दि.१९.१०.२०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये ई-निविदा प्रणाली बंधनकारक करण्यात आली आहे. तथापि, सदर योजनेच्या कामाची निविदा ही दि.२५.०८.२०११ रोजी प्रसिध्द करणेत आली व त्यानुसार प्राप्त झालेल्या तीन निविदापैकी निम्नत्तर निविदेच्या कंत्राटदारास कामाचा कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे.
(२) हे खरे नाही.

सदर योजनेचे बांधकाम हे शासनाच्या मालकीच्या जागेवर करणेत येत आहे. तसेच सदर जागा ग्रामपंचायतीच्या नावावर करणेबाबत ग्रामसभेने दि.०२.१०.२०१० रोजी ठराव केला आहे. त्यानुसार गटविकास अधिकारी यांनी जिल्हाधिकारी, सांगली यांचेकडे प्रस्ताव सादर केला आहे.
(३) सदर योजनेचे बांधकाम सांगली-मांगरुळ जिल्हा मार्गाच्या मध्यापासून १२ मी. अंतरावर करणेत येत आहे.
(४) होय मागणी केली आहे.

तथापि, सदर योजनेचे काम प्रगतीपथावर असून झालेल्या कामाचे मुल्यांकनाप्रमाणे देयक अदा करणेत आले आहे.
(५) सदर प्रकरणाची चौकशी करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्ह्यातील शाहुवाडी व पन्हाळा तालुका तसेच मौजे चंदनकुड (ता. गडहिंग्लज) येथील पाणी टंचाई निवारणेबाबत

**(४४) * ४१३९७ श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पन्हाळा (जि.कोल्हापूर) तालुक्यातील पश्चिम व उत्तर भागा मध्ये अनेक ठिकाणी कुपनलिका, विहीरींच्या पाणी पातळीत घट झाली असून ऐन हिवाळ्यात पाणीटंचाईची तीव्र समस्या जाणवू लागली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच कोल्हापूर जिल्ह्यातील शाहुवाडी तालुका व मौजे चंदनकुड (ता. गडहिंग्लज) येथे माहे जानेवारी, २०१६ पासून मोठया प्रमाणात पाणी टंचाई निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील तालुक्यात कमी पावसामुळे भात उत्पादनात घट झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने पाहणी केली आहे काय, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नूसार उक्त तालुक्यातील व गावातील पाणी टंचाई दूर करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे आहे.

(२) अंशतः खरे आहे. शाहूवाडी तालुक्यामध्ये भूजल पातळीत घट झाल्याने टंचाई जाणवू लागली हे खरे आहे.

तथापि मौजे चंदनकुड (ता. गडहिंग्लज) येथे माहे जानेवारी, २०१६ पासून मोठया प्रमाणात पाणी टंचाई निर्माण झाली हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४) होय, पन्हाळा तालुक्यात सन २०१४-१५ मध्ये सरासरी तांदूळ उत्पादन २७४७.३ किलो/ हेक्टर आणि सन २०१५-१६ मध्ये सरासरी तांदूळ उत्पादन १४७७.२ किलो/हेक्टर झाले आहे. म्हणजेच मागील वर्षाच्या तुलनेत तांदूळ उत्पादनात ५३.७६% घट झाल्याचे आढळून आले आहे.

पिण्याचे पाणी टंचाई दूर करण्यासाठी पाणी आरक्षण व टंचाई कृती आराखडा करणेत आला आहे. त्यानुसार टंचाई कृती आराखड्यात २२१ गावे व ४०२ वाड्यांमध्ये रु.५४६.८१ लक्ष किंमतीच्या एकूण ६२१ उपाययोजना प्रस्तावित करण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सोलापूर शहरात महाराष्ट्र दंत परिषदेच्या मान्यतेशिवाय ११ अनधिकृत "डेंटल लॅब" चालविले जात असल्याबाबत**

**(४५) * ४००८६ श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरात महाराष्ट्र दंत परिषदेच्या मान्यतेशिवाय ११ अनधिकृत "डेंटल लॅब" चालविल्या जात असल्याने नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, उक्त प्रकरणी सोलापूर मनपा च्या आरोग्य अधिकारी यांना महाराष्ट्र डेंटल कौन्सिल यांनी निवेदन देऊनही कोणतीही कारवाई केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित "डेंटल लॅब" चालकावर व आरोग्य अधिकाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही. परंतु, सोलापूर शहरात दंत कारागिरीचा अवैध रीतीने व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींबद्दल महाराष्ट्र राज्य दंत परिषदेने दिनांक १८.०५.२०१५ रोजीच्या पत्राच्या द्वारे सोलापूर महानगरपालिकेला कळविले होते. त्या अनुसार उक्त महानगरपालिकेने उक्त व्यक्तींच्या विरुध्द योग्य ती कारवाई करणेबाबत संबंधित पोलीस ठाण्यास कळविले आहे.

(२) नाही.

(३) व (४) हे प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## संगमनेर (जि. अहमदनगर) तालुक्यातील अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली टंचाई

**(४६) * ४३३१७ श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमनेर (जि. अहमदनगर) तालुक्यातील अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई जाणवू लागली असल्याने टँकरच्या मागणीत दिवसेंदिवस वाढ होत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पाणी टंचाई दूर करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे आहे.

(२) सन २०१५-१६ वर्षासाठी ऑक्टोबर २०१५ ते जून २०१६ पर्यंत पाणी टंचाई दूर करण्यासाठी टंचाई आराखडा मंजूर करण्यात आलेला आहे.

संगमनेर तालुक्यात टंचाई कृती आराखड्यात रुपये १०१५.०५ लक्ष किंमतीच्या एकूण १९१ उपाययोजना प्रस्तावित करण्यात आल्या आहेत.

सद्यस्थितीत २८ टँकरद्वारे १८ गावे व १५० वाड्यांना पाणी पुरवठा चालू आहे. टँकर भरणेसाठी ४ उद्भव व २ गावांसाठी २ विहिरी अधिग्रहित करण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्ह्यातील उल्हास नदी दूषित झाल्याबाबत

**(४७) * ४००५३ डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील**

**(इस्लामपूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथील खेमाणीनाला आणि म्हारळ येथील डम्पिंग ग्राऊंडचे दुषित पाणी म्हारळ दरम्यान उल्हासनदीत मिसळत असून तसेच नदी पात्रात शेवाळ वाढले असून पाण्यात फ्लोराईड सारखे रासायनिक घटक असून मृत जनावरांचे अवशेष, मानवी मैला, रसायनयुक्त पाणी या नदीपात्रातून पाणी पुरवठा होत असलेल्या ठाणे, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, भिवंडी, नवी मुंबई, बदलापूर शहरांसह ५० गावांचे व मिरा-भाईंदर या महानगरपालिकेतील लाखो नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले असून पर्यावरणाचा ऱ्हास होवून नदी पात्रातील जलसंपत्तीवरही विपरीत परिणाम होत आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, म्हारळ आणि कांबा (ता.कल्याण, जि.ठाणे) गावाच्या शेजारी असलेल्या खेमानी, धोबिघाट, कातकरीवाडी, म्हारळपाडा, वरप या लोकवस्ती असलेल्या भागात दगडखाणीतून उत्खनन करतांना क्रशरमधील मोठया प्रमाणात धुळीचे कण व पावडर तसेच डांबर तयार करण्याच्या कारखान्यांमुळे हवेतील वातावरण दुषीत होऊन नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होऊन सदर गावातील शेतीही नापिक झाली असल्याची बाब येथील ग्रामस्थांनी व सरपंचानी प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण मंडळ, कल्याण यांच्याकडे निवेदनाद्वारे दिनांक २७ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आणून सदर दगडखाणी व डांबर कारखाना यांच्या मालकांवर तात्काळ कारवाई करावी अशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी अनुसंधान संस्थेने या आधी एमआयडीसीच्या अंतिम अहवालामध्ये खेमाणीनाला वळविणे तसेच लहान उद्योग धंद्यातील दुषित पाण्यावर शुध्दीकरण प्रक्रिया करुनच ते पाणी पात्रात सोडण्याचे नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच सदर नदीतून स्टेम प्राधिकरण २८५ एमएलडी, कल्याण-डोंबिवली २३४ एमएलडी, एमआयडीसी-७७० एमएलडी पाणी पिण्याकरीता घेत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रश्न भाग १ व २ बाबत प्रदूषण मंडळाने आतापर्यंत कोणती कारवाई केली आहे वा कारवाईची सद्य:स्थिती काय आहे,

(६) नसल्यास, कार्यवाही न करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) होय, हे खरे आहे. उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील अंदाजे १० एम.एल.डी. विनाप्रक्रियायुक्त सांडपाणी खेमाणी नाल्याद्वारे उल्हासनदीत मिसळते. म्हरळ येथील अनाधिकृत डंम्पींग ग्राऊंडमध्ये कचऱ्याची कुठलीही प्रक्रिया केली जात नाही. तसेच यामध्ये निर्माण होणारे दुषित पाणी विनाप्रक्रियाकरता वरील नाल्यामध्ये विसर्जित होते.
(२) व (३) होय, हे खरे आहे, ग्रामस्थ व सरपंच यांनी तक्रार दिली आहे.
(४) व (५) खेमाणी नाल्यामध्ये येणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याकरीता संयंत्रणा बसविण्याचे काम सुरु आहे. सदरील कामाचे कार्यादेश दिलेले असून त्याचे पुढील काम प्रगतिपथावर आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सर्व स्टोन क्रर्शंना हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा योग्यरित्या चालविण्याबाबत या आधीच सुचित करण्यात आलेले असून त्याची पाहणी करुन सदर ११ स्टोन क्रर्शरना नोटीस वजा पत्र पाठविले आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात सेमी इंग्रजी माध्यमाच्या शाळांसाठी पात्रताधारक शिक्षक उपलब्ध नसल्याबाबत

**(४८) * ४४८९५ श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थाच्या आणि मराठी माध्यमाच्या अनेक शाळा सेमी इंग्रजी करण्यात आल्या आहेत, मात्र त्या शाळेत किमान एक शिक्षक इंग्रजी माध्यमातून उत्तीर्ण झालेला असावा किंवा शिक्षणशास्त्र विषयाची पदवी अभ्यासक्रम इंग्रजी माध्यमातून केलेला असावा असा निकष ठरविण्यात आला असतानाही सन २०१३ मध्ये टीईटी मध्ये इंग्रजी माध्यमातील ९८ उमेदवार व सन २०१४ मध्ये १३ उमेदवार पात्र ठरले होते म्हणजेच सेमी इंग्रजी शाळांसाठी व खाजगी पूर्ण इंग्रजी माध्यमाच्या शाळांसाठी पात्रताधारक शिक्षक उपलब्ध नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पात्रताधारक शिक्षक पुरेसे उपलब्ध नसतांना शिक्षण विभागाने सेमी इंग्रजी शाळा सुरु करताना कोणत्या प्रकारचे निकष पाळले आहेत,

(३) असल्यास, शिक्षणाचा दर्जा राखण्याचा दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असल्यास, त्याचा तपशील काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थाच्या आणि मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये गणित व विज्ञान हे विषय इंग्रजी माध्यमातून शिकवण्याबाबतची परवानगी सन २०१३ पूर्वीच देण्यात आलेली आहे. टी.ई.टी .ही शिक्षक पात्रता परीक्षा सन २०१३ पासून अनिवार्य करण्यात आली आहे. तत्पूर्वी सेवेत असलेल्या इंग्रजी माध्यमातील पात्रताधारक शिक्षक सदर सेमी इंग्रजी शाळांमध्ये कार्यरत आहेत.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील तंत्रशिक्षण संचालनालयाच्या व वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अखत्यारीतील महाविद्यालयांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपुर्तीबाबत

**(४९) * ४०५७१ श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम),**

**डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अभियांत्रिकी, तंत्रशिक्षण संचालनालयाच्या व वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अखत्यारीतील महाविद्यालयांमध्ये शिकणाऱ्या सुमारे सव्वा दोन लाख मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क प्रतिपुर्ती करण्याचा निर्णय घेतल्यानंतरही त्याची अंमलबजावणी होत नसून माहे जून - जुलै २०१५ मध्ये महाविद्यालये सुरु झाल्यानंतरही सन २०१५-१६ साठी या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्क प्रतिपुर्तीसाठीचा सुमारे १३०० कोटी रुपयांचा प्रस्तावही अद्याप मंत्रीमंडळासमोर मान्यतेसाठी आला नसल्याचा माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, सदर मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्क प्रतिपुर्तीचे प्रस्ताव मंत्रीमंडळासमोर मांडण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच उक्त प्रस्ताव मंजूर करुन विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२), (३) व (४) प्रस्ताव विचाराधीन आहे.

-----------------

**शेगाव (जि.बुलढाणा) तालुक्यातील गावांमध्ये भीषण पाणी टंचाईबाबत**

**(५०) * ४१४८९ श्री.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगाव मतदार संघातील गावांसह शेगाव (जि.बुलढाणा) तालुक्यातील एकूण ६९ गावात भयंकर पाणी टंचाई निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावांतील काही ठिकाणी विहिरी अधिग्रहित करण्यात आल्या आहेत परंतु त्याठिकाणी १० गावांमध्ये विद्युत जोडणी नसल्यामुळे पाणी समस्या निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गत वर्षी एकूण २१ विहिरी अधिग्रहित करण्यात आल्या होत्या त्याच प्रमाणे यावर्षी देखील ६९ गावांमध्ये विहीर अधिग्रहण करणे, विंधन विहिरी हातपंप सह, विहीर खोलीकरण करणे, या कामासह जलस्वराज व राष्ट्रीय पेयजल योजनेचा निधी तात्काळ वितरीत करण्याचे आदेश संबंधिताना देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) खामगाव मतदार संघातील शेगाव तालुक्यात सध्या १३ गावांत तसेच खामगाव तालुक्यात १९ गावांत असे एकूण ३२ गावांत पाणी टंचाई निर्माण झाली आहे.

खामगाव मतदार संघातील एकूण १३६ गावांपैकी ११७ गावांचा समावेश सन २०१५-१६ च्या संभाव्य पाणी टंचाई कृती आराखड्यात करण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) खामगाव मतदार संघात सन २०१४-१५ मध्ये शेगाव तालुक्यात ८ विहिरी व खामगाव तालुक्यात ६ विहिरी अशा एकूण १४ विहिरी अधिग्रहित करण्यात आल्या होत्या. त्यांना नियमानुसार सर्व अदायगी करण्यात आली आहे.

सन २०१५-१६ च्या संभाव्य पाणी टंचाई कृती आराखड्यामध्ये शेगाव तालुक्यात ३९ विहीर अधिग्रहण, २४ विंधन विहिरी हातपंपासह, १ विहीर खोलीकरण व खामगांव तालुक्यात १६ विहीर अधिग्रहण, २२ विंधन विहिरी हातपंपासह करणे या उपाययोजनांचा समावेश आहे.

शेगाव तालुक्यातील ६ गावांत व खामगाव तालुक्यातील १० गावांत राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत कामे सुरु आहेत. त्या सर्व कामांना त्यांच्या प्रगतीप्रमाणे निधी प्राप्त होत आहे.

तसेच टंचाईअंतर्गत घेण्यात येणा-या उपाययोजनांसाठी मागणीप्रमाणे निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्याचे नाव उज्ज्वल केलेल्या अत्युच्च गुणवत्ताधारक अपंग खेळांडूना शासकीय सेवेत थेट नियुक्ती देण्याबाबत**

**(५१) * ३९९०२ डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक अपंग खेळाडू राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर पुरस्कारप्राप्त खेळांडूकडे शासनाचे दुर्लक्ष होत आहे, हे खरे आहे काय,

(२) इंडियन ऑलिम्पिक असोसिएशनची मान्यता व संलग्नता प्राप्त असलेल्या राष्ट्रीय अपंग फेडरेशनद्‌वारे आयोजित अधिकृत स्पर्धा तसेच महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनची मान्यता व संलग्नता प्राप्त असलेल्या महाराष्ट्र राज्य अपंग असोसिएशनद्‌वारे आयोजित स्पर्धा यामध्ये यश मिळविणाऱ्या अपंग खेळाडूंना शासकीय सेवेत थेट नियुक्ती देण्याबाबत शासनाने दिनांक १ ऑक्टोबर, २०१५ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच शासनाने २००५ मध्ये काढलेल्या अध्यादेशात केवळ “अपंग” असा उल्लेख न केल्यामुळे ६० च्या वर पुरस्कारप्राप्त अपंग खेळाडू व नागपूर शहरातील पुरस्कारप्राप्त १३ अपंग खेळाडू शासकीय नोकरीपासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने या अगोदर अशा गुणवत्ताधारक ५० खेळाडूंची यादी तयार केली होती त्यात ६ अपंग खेळांडूंची नावे अग्रक्रम प्रतिक्षा यादीवर होती, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर अपंगांना शासकीय सेवेत नियुक्ती देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) हे खरे नाही.

(५) शासन निर्णय क्र. राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक ३०.०४.२००५ नुसार फेब्रुवारी, २०१६ पर्यंत ३० खेळाडूंच्या प्रमाणपत्रांची पडताळणी करण्यात आलेली असून त्यापैकी २० खेळाडूंना पात्र ठरविण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील १०६ गावांमधील सांडपाणी शुध्दीकरणाचे**
**प्रकल्प पूर्ण करण्याबाबत**

**(५२) * ४६६९० श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.छगन भुजबळ (येवला), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १०६ गावांमध्ये सांडपाण्याचे शुध्दीकरण करण्याचे नियोजन राज्य शासनाचे असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सांडपाणी शुध्दीकरण करण्यासाठी नाबार्डने १०० कोटी रुपयांची रक्कम राज्य शासनाला प्रकल्प खर्चाकरिता देण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात मात्र आठ ठिकाणीच अशा प्रकल्पावर कामे सुरु असल्याची माहिती डी.सी.लांडगे (अधिक्षक अभियंता) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्य शासनाने आजतागायत १० कोटी रुपयांचा निधी खर्च करुन उर्वरित कामे व प्रकल्प पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) व (२) नाही. तथापि, सन २००१ च्या जनगणनेप्रमाणे राज्याच्या ग्रामीण भागातील १५,००० व त्यापेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या एकूण ९४ गावांचे सर्वेक्षण करुन सांडपाणी प्रक्रिया केंद्रासाठी पुरेशी व तांत्रिक दृष्ट्या योग्य जागा उपलब्ध असलेल्या २८ गावांची सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पासाठी निवड करण्यात आली आहे. सदर

प्रकल्पासाठी राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँकेने (नाबार्ड) ग्रामीण पायाभूत विकास निधी १९ (RIDF-XIX) अंतर्गत रु. ९७.३५ कोटी चे अर्थ सहाय्य कर्ज स्वरुपात मंजूर केले असून रु. १५.२३ कोटी एवढे शासकीय अनुदानाचे योगदान आहे.

(३) व (४) क्षेत्रिय कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार प्रकल्पातील २८ गावांपैकी ८ गावातील कामाच्या निविदा मंजूर करण्यात आल्या असून त्यांचे कार्यादेश देण्यात आले आहेत. सदर प्रकल्पासाठी आर्थिक वर्ष सन २०१५-१६ मध्ये पुरवणी मागणीद्वारे रु. २०.०० कोटीचा निधी उपलब्ध झाला असून सदर निधीचे वितरण करण्यात येत आहे. तसेच, निधीच्या उपलब्धतेनुसार उर्वरीत गावांची निविदा प्रक्रिया व पुढील आवश्यक कार्यवाही हाती घेण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तारापूर (जि. पालघर) औद्योगिक विकास महामंडळाकडून सामुदायिक सांडपाणी जलप्रवाहात सोडल्यामुळे होत असलेले प्रदूषण

**(५३) * ४१२९८ श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तारापूर (जि.पालघर) औद्योगिक विकास महामंडळाकडून सामुदायिक सांडपाणी नवापूरच्या समुद्रात सोडले जात असल्यामुळे मत्स्यसंवर्धन व उत्पत्तीवर विपरित परिणाम होत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच उपरोक्त प्रकरणाबाबत अखिल भारतीय मांगेला समाज परिषदेने एमआयडीसी व एमपीसीबी कडून माहितीच्या अधिकाराखाली मागितलेली माहिती पूर्ण देण्यात येत नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने रसायनमिश्रीत पाणी सोडणाऱ्या कारखान्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच मच्छिमार व बागायतदार शेतकऱ्यांचे होणारे नुकसान रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने प्रदान केलेल्या संमतीपत्रातील अटी व शर्तींच्या उल्लंघन प्रकरणी एप्रिल-२०१५ ते जानेवारी २०१६ पर्यंत एकूण ७७ उद्योगांना प्रस्तावित आदेश आणि ०१ उद्योगास उत्पादन बंद करण्याचे आदेश बजावण्याची कार्यवाही महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत करण्यांत आली आहे. शिवाय तारापूर-सीईटीपी या संस्थेविरुध्द ठाणे जिल्हा न्यायालयात खटला दाखल करण्यांत आला असून सदर खटला न्यायप्रविष्ट आहे. सदर सीईटीपी ची रुपये १०.०० लक्ष ची बँक हमी जप्त करण्यांत आली असून रुपये २०.०० लक्ष ची नव्याने बँक हमी देण्याबाबत आदेश पारित करण्यात आले आहेत.

(४) तारापूर औद्योगिक परिसरातील प्रदुषण व तत्सम बाबींबाबत समन्वय करण्यासाठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत उपविभागीय अधिकारी (महसूल), पालघर यांचे अध्यक्षतेखाली तसेच नवापूर मच्छिमार संघटना,उपायुक्त (मत्स्यव्यवसाय), महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे प्रतिनिधी, उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, तारापूर, तारापूर सीईटीपी चे प्रतिनिधी आणि तारापूर औद्योगिक उत्पादन संघटनेचे प्रतिनिधी यांचा समावेश असलेली समिती गठीत करण्यांत आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकोला जिल्हयातील ८४ खेडी प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेंतर्गत लोहारी झोनवरुन पुरवल्या जाणाऱ्या ९ गावांचा पाणी पुरवठा थकीत कराअभावी बंद केल्याबाबत

**(५४) * ४३३३१ श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हयातील ८४ खेडी प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेंतर्गत

तालुक्यातील लोहारी झोन वरुन पुरवल्या जाणाऱ्या ९ गावांचा पाणी पुरवठा थकीत कराअभावी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाने बंद केला असल्याचे दिनांक ४ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खार पट्यातील ही गावे गोड्या पाण्यासाठी आजूबाजूच्या ४ ते ५ कि.मी. अंतरावरुन मिळेल त्या वाहनाने पाणी आणून तहान भागवित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त थकीत कर भरण्यास सवलत देऊन ९ गावांना सुरळीत पाणी पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय, हे खरे आहे.

लोहारी झोन वरुन पुरवल्या जाणाऱ्या ९ गावांचा पाणी पुरवठा थकीत कराअभावी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाने दि.२८.१२.२०१५ पासून दि.११.०१.२०१६ पर्यंत बंद केला होता.

(२) होय, हे खरे आहे.

(३) उक्त गावांना थकीत कर भरण्यास दि.०९.१२.२०१५ रोजी नोटीस व्दारे कळविण्यात आले होते. पाणी पुरवठा बंद केल्यावर काही ग्रामपंचायतींनी अत्यल्प प्रमाणात पाणीपट्टी भरली. लोहारी झोन वरुन पुरवल्या जाणाऱ्या ९ गावांना थकित कर भरण्यास मुदतीची सवलत देऊन दि.१२.०१.२०१६ पासून पाणी पुरवठा सुरळीत करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य शासनाच्या अंतर्गत येणाऱ्या रुग्णालयातील अंग प्रत्यारोपण विभागात पुरेशा वा अत्याधुनिक सोयी-सुविधा नसल्याबाबत

**(५५) * ३९८४४ श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासकीय आरोग्य सेवा अंतर्गतच्या शासकीय रुग्णालय वा सामान्य रुग्णालयात तसेच महानगरपालिका आरोग्य सेवा अधीनस्त रुग्णालयात अंग

प्रत्यारोपण विभागात पुरेशा वा अत्याधुनिक सोयी-सुविधा नसल्यामुळे बऱ्याच रुग्णांना आर्थिक भार सोसावा लागतो यासंदर्भात वैद्यकीय क्षेत्रातील अधिकाऱ्यांनी आणि संबंधित रुग्णालयाचे अधिष्ठाता यांनी माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या सुमारास मा. वैद्यकीय शिक्षणमंत्री मंत्री, मा. वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री, महासंचालक, वैद्यकीय शिक्षण तसेच संबंधित प्रादेशिक आरोग्य वैद्यकीय शिक्षण अधिकारी यांच्या निदर्शनास सदरहू बाब आणली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील वैद्यकीय संस्थांचे प्रमुख, लोकप्रतिनिधी यांनी सदरची बाब शासनाच्या वैद्यकीय शिक्षण विभागाकडे लेखी स्वरुपात वा वेळोवेळी झालेल्या वैद्यकीय मेळाव्यात नोंदविली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बाबतीत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील दारिद्रयरेषेखालील लाभार्थ्यांना अन्नसुरक्षा कायद्यानुसार स्वस्त दरात अन्नधान्य देण्याबाबत

**(५६) * ४२००४ श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दारिद्रयरेषेखालील सुमारे १ कोटी ७७ लाख गरीबांना अन्नसुरक्षा कायद्यानुसार स्वस्त दरात अन्नधान्य देण्याबाबत तातडीने निर्णय घ्यावा असा

आदेश दिनांक ३ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास मा.उच्च न्यायालयाने एका जनहित याचिकेच्या सुनावणीच्या वेळी राज्य शासनास दिलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, राज्यातील साडेसात कोटी नागरिकांना तीन रुपये किलो दराने तांदुळ देण्याचा निर्णय शासनाने जाहीर केला, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, औरंगाबाद शहरातील ए.पी.एल. कार्ड धारकांना केसरी कार्डावर शासनाकडून स्वस्त धान्य उपलब्ध करुन देण्याची योजना बंद करण्यात आली आहे काय, असल्यास त्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदर योजना बंद केल्यामुळे मोल मजुरी करणाऱ्या कुटुंबाना स्वस्त धान्य मिळत नसल्याने ते मिळण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक ११ जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचेकडे लेखी पत्र पाठवून मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यातील १९ जिल्ह्यांमध्ये साडेतीन कोटी लोक केसरी कार्ड धारक अन्न सुरक्षा योजनेतून धान्य मिळण्यापासून वंचित असल्याने राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम , २०१३ अंतर्गत समाविष्ट न झालेल्या ए.पी.एल. (केशरी) मधील लाभार्थ्यांना राज्य शासनाने आर्थिक भार सोसून पूर्वीच्या ए.पी.एल. दराने व परिमाणात अन्नधान्याचा पुरवठा करण्याबाबतचा शासनाच्या विचाराधीन प्रस्तावावर निर्णय घेण्यात आला आहे काय,

(६) असल्यास, त्यानुसार सदर धान्य मिळण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व यासाठी किती कालावधी लागणे अपेक्षित आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय.

(२) होय.

(३) सध्या राज्यामध्ये सुरु असलेल्या शिधापत्रिकांच्या आधार सिडींगचे काम पूर्ण झाल्यावर राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत समाविष्ट न झालेल्या लाभार्थ्यांना अन्नधान्याचा लाभ देण्याबाबतचा निर्णय घेण्याबाबत दिनांक १५ जानेवारी, २०१६ च्या शासन निर्णयान्वये निर्णय घेण्यात आला आहे.

(४) होय.

(५) होय.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पालघर (जि.पालघर) तालुक्यातील इस्कॉन तर्फे पुरविल्या जाणाऱ्या मध्यान्ह भोजन कंत्राटाचे नुतनीकरण करण्याबाबत**

**(५७) * ४५२४२ श्री.विलास तरे (बोईसर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर (जि.पालघर) तालुक्यात ५० हजार विद्यार्थ्यांना माहे नोव्हेंबर, २०१२ पासून इस्कॉन तर्फे मध्यान्ह भोजन (दुपारचे जेवण) विविध शाळांमध्ये पुरविले जात होते, हे खरे आहे काय

(२) असल्यास, इस्कॉनचे पालघरमधील कंत्राट दिनांक २३ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास संपुष्टात आले असून कंत्राटाचे नुतनीकरण न झाल्यामुळे मध्यान्ह भोजनाचा प्रश्न निर्माण झालेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाब (१) व (२) नुसार चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने ५० हजार विद्यार्थ्यांच्या भोजनाचा प्रश्न तात्काळ सोडविण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२) व (३) पालघर तालुक्यात शाळांना शालेय पोषण आहार योजनेंतर्गत आहार शिजवून देण्याचे काम इस्कॉन फुड रिलीफ फाऊंडेशन यांना देण्यात आलेले आहे. सदर कामाचा करार दि. २३/११/२०१५ रोजी संपुष्टात आल्याने सदर करारास पुढील २ महिन्यांकरिता मुदतवाढ देण्यात आली होती. यानंतर शाळा व्यवस्थापन समितीच्या ठरावानुसार पुढील कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यानुसार आहाराचा पुरवठा नियमितपणे सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सोलापूर जिल्ह्यातील उजनी जलाशयात पुणे, पिंपरी चिंचवड एमआयडीसीमधील दुषित पाणी सोडणाऱ्या कारखान्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(५८) * ४२३५९ कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील उजनी जलाशयात पुणे, पिंपरी चिंचवड

एमआयडीसीमधील दुषित पाणी सोडणाऱ्या कारखान्यांवर दंडात्मक, फौजदारी व परवाने रद्द करण्याचा निर्णय मा.पर्यावरण मंत्री यांच्या बैठकीत झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उजनी धरणात दुषित पाणी सोडणाऱ्या कारखान्यांवर कारवाई करण्याबाबत झालेल्या बैठकीचा तपशील काय आहे, त्यानुषंगाने सदरील प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे आहे.

मा. पर्यावरण मंत्री यांच्या समवेत दि. ३०/०९/२०१५ रोजी मुंबई येथे उजणी धरण प्रदुषणाबाबत बैठक होऊन, प्रदुषणास जबाबदार असणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांवर तसेच उद्योगांवर कारवाई करण्याबाबत सदर बैठकीत चर्चा झालेली होती.
(२) सदर बैठकीमध्ये मुख्यत: स्थानिक स्वराज्य संस्था (आळंदी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका व पुणे महानगरपालिका) क्षेत्रातुन अनधिकृतपणे बाहेर जाणाऱ्या घरगुती सांडपाण्यावर व काही उद्योगांमधुन बाहेर जाणाऱ्या औद्योगिक सांडपाण्याबाबत चर्चा झाली होती. तसेच कारवाई करण्याचे आदेशही मा. मंत्री, पर्यावरण यांनी दिले होते.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे पुणे महानगरपालिकेवर जल (प्रतिबंध व प्रदुषण नियंत्रण) कायदा १९७४ अन्वये फौजदारी खटला (आर.सी.सी. नं. १८७/२०००) मा. मुख्य दंडाधिकारी, पुणे यांचे न्यायालयात दाखल केलेले आहेत, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेवर जल (प्रतिबंध व प्रदुषण नियंत्रण) कायदा १९७४ अन्वये फौजदारी खटला आर.पी.सी. नं. १४४/२००० व आर.पी.सी. नं. ७०९/२०१६ मा. मुख्य दंडाधिकारी, पुणे यांचे न्यायालयात दाखल केलेला आहे. तसेच आळंदी नगरपरिषदे अंतर्गत क्षेत्रातुन घरगुती सांडपाणी विना प्रक्रिया नदीमध्ये सोडण्यात येत असल्याबाबत मा. राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण, पुणे येथे प्रकरण क्र. ६२/२०१५ अन्वये दाखल आहेत. लोणावळा नगरपरिषदे अंतर्गत क्षेत्रातुन घरगुती सांडपाणी विना प्रक्रिया नदीमध्ये सोडण्यात येत असल्याबाबत मा. राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण, पुणे येथे प्रकरण क्र. ३५/२०१५ अन्वये दाखल आहे.

पिंपरी चिंचवड शहराच्या हद्दीतील लघु उद्योगामधून निर्माण होणाऱ्या औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रिया करणेसाठी सामुहिक प्रक्रिया संयंत्रणा (CETP) प्रस्तावित केलेली आहे. सद्यस्थितीत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात न्यायालयातील कामकाजाची भाषा व सर्व कायदे मराठीत करण्याबाबत

**(५९) * ४६१८० श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा व सत्र न्यायालयात मराठीत कामकाज करावे असे परिपत्रक राज्य शासनाने सन १९९७ साली काढले आहे, हे खरे आहे काय,

(२) महाराष्ट्र शासनाच्या भाषा संचालनालयाच्या अंतर्गत असलेल्या भाषा सल्लागार समितीच्या दिनांक १ सप्टेंबर, २०१५ रोजी झालेल्या बैठकीत मुंबई उच्च न्यायालयाची प्राधिकृत भाषा मराठी असावी असा ठराव, महाराष्ट्र मंत्रीमंडळाने भारतीय घटनेच्या ३४८(२) या कलमाचा आधार घेऊन करावा, अशी शिफारस करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच मराठी ही राज्याची राजभाषा असल्याने राज्यातील सर्व कायदे व केंद्रीय कायदे मराठी भाषेत उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने कायदे अनुवादाचे काम सुरु केले असून ६०० पेक्षा अधिक कायदे अनुवादित झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, न्यायालयाची कामकाजाची भाषा मराठी करण्याबाबत व सर्व कायदे मराठीत अनुवादीत करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही.

राज्यातील सर्व फौजदारी व दिवाणी न्यायालयाची भाषा मराठी असेल असे आदेश दि. २१.७.१९९८ च्या अधिसूचनेन्वये देण्यात आले आहेत.

(२) होय.

(३) राजभाषा अधिनियम १९६४ अन्वये विधानसभा विधेयक/ अधिसूचना/अधिनियम हे इंग्रजीसह मराठीतून सादर करण्यात येतात. त्यामुळे आतापर्यंतच्या सर्व राज्य अधिनियमांचा मराठी अनुवाद करण्यात आला आहे. सदर अधिनियम नागरिकांना सहज उपलब्ध व्हावेत याकरिता एकूण ५८६ राज्य अधिनियमांचा तसेच १६६ केंद्रीय अधिनियम भाषा संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

(४) कनिष्ठ न्यायालयांचे कामकाज मराठीतून करण्याबाबत पुढील उपाययोजना केल्या आहेत.

(अ) शासनाने दिलेल्या निदेशानुसार उच्च न्यायालयाच्या स्तरावर सर्व कनिष्ठ न्यायालयांना आदेश दिले असून, मराठी कामकाजाचा आढावा दर ४ महिन्यांनी घेण्यात येतो.

(आ) मराठीतून कामकाजासंबंधी कार्यशाळांचे आयोजन करण्यात येते.

(इ) मराठीतून न्यायनिर्णयासंबधीचे “न्यायनिर्णय” हे मासिक प्रसिध्द करण्यात येते.

(ई) विधानमंडळात विधेयके मांडताना इंग्रजी व मराठी भाषेत मांडण्यात येतात. त्यामुळे अधिनियम प्रसिध्द करताना मराठी अनुवादीत प्रतही प्रसिध्द करण्यात येते.

भारतीय राज्यघटनेच्या कलम ३४८ (२) नुसार मराठी ही मुंबई उच्च न्यायालयाची प्राधिकृत भाषा करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### मराठी भाषा विभागाची पुनर्रचना व मराठी विद्यापीठ स्थापणेबाबत

**(६०) * ४०८०७ श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजभाषेच्या विकासासाठी व दीर्घकालीन नियोजनासाठी मराठी भाषा

विभागाची पुनर्रचना करण्याची राज्यातील लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठी अभ्यास केंद्राने राजभाषा मराठी विभागाच्या पुनर्रचनेसाठी पाठविलेला प्रस्ताव माहे एप्रिल २०१० पासून दहा वेळा शासनास सादर करूनही अद्याप सदर प्रस्ताव प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, मराठी विद्यापीठ स्थापनेचा प्रस्ताव अनेक वर्षांपासून शासनाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मराठी भाषेचा लोकभाषा म्हणून विकास करण्यासाठी व मराठी भाषेची प्रतिष्ठा उंचावण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) नाही.

मराठी अभ्यास केंद्राच्या प्रस्तावावर शासन स्तरावर झालेल्या बैठकीमध्ये अभ्यास केंद्राच्या मागणीनुसार ६ नवीन उपविभागांसाठी अतिरिक्त मनुष्यबळ देणे सध्या शक्य नसल्याचे सुचित करण्यात आले. तथापि मराठी अभ्यास केंद्राने केलेल्या काही सूचनांचा प्रस्तावित मराठी भाषा धोरणामध्ये समावेश करण्यात आला आहे.

(३) होय.

मराठी भाषा विद्यापीठ स्थापन करणेबाबत समिती स्थापन करुन विद्यापीठाची कार्यकक्षा ठरविणेबाबत कार्यवाही सुरु आहे.

(४) राजभाषा अधिनियम १९६४ च्या अनुषंगाने शासन व्यवहारात मराठी भाषेचा प्रभावी वापर करण्याकरीता व भाषा संवर्धनासाठी मराठी भाषा विभागांतर्गत भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ व राज्य मराठी विकास संस्था यांचेद्वारे विविध उपक्रम सुरु आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुदखेड (जि. नांदेड) शहरातील मदिनानगर रेल्वेस्टेशन भागात खवा खाल्ल्यामुळे बालकांना झालेली विषबाधा

**(६१) * ४६५९०  श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण) :**  सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुदखेड (जि.नांदेड) शहरातील मदिनानगर रेल्वेस्टेशन भागात खवा खाल्ल्यामुळे वीस बालकांना विषबाधा झाल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बाधा झालेल्या वीसपैकी आठ बालकांना नांदेडच्या डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार यास जबाबदार असणा-या संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

(३) अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी चौकशी केली असता, या घटनेशी संबंधित खवा विक्रेता आढळून आला नाही. मुदखेड पोलिस स्टेशन अज्ञात खवा विक्रेत्याविरुध्द पीएनसी क्र. १७२/२०१५, भा.दं.वि. कलम २७२ नुसार गुन्हा दाखल झालेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## इगतपूरी (जि.नाशिक) येथील स्वस्त धान्य दुकानांमध्ये निकृष्ट व भेसळयुक्त धान्याचे होत असलेले वितरण व तहसिल कार्यालयामधून कोऱ्या शिधापत्रिका गहाळ झाल्याबाबत

**(६२) * ४५४६३  श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :**  सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इगतपुरी (जि.नाशिक) येथील स्वस्त धान्य दुकानांमध्ये निकृष्ट व

भेसळयुक्त धान्याचे वितरण होत असल्याने सदर प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक १२ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा सुमारास तहसिलदार, इगतपुरी यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे केली होती, हे खरे आहे काय,

(२) तसेच, उक्त तालुक्यातील तहसील कार्यालयातील पुरवठा विभागामधील अनेक कोऱ्या शिधा पत्रिका गहाळ झाल्याने नागरिकांना राजीव गांधी जीवनदायी आरोग्य विमा योजना, विविध शासकीय दाखले, नवीन गॅस कनेक्शन अशा विविध शासकीय योजनांपासून वंचित राहावे लागत असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणांची शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार शासनाने उक्त मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली तसेच दोषी आढळून आलेल्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) प्रस्तुत प्रकरणी लेखी निवेदन प्राप्त झालेले नाही. परंतु, रास्तभाव दुकानदाराने खराब गहू प्राप्त झाल्याबाबत तक्रार केली होती. त्याअनुषंगाने सदर खराब गहू शासकीय गोदामात जमा करुन, चांगल्या प्रतीचा गहू उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(२) इगतपूरी तालुक्यामध्ये कोऱ्या शिधापत्रिका गहाळ झालेल्या नाहीत.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे विभागात निर्माण झालेली पाणी टंचाई

**(६३) * ४२४६४ श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे विभागात पावसाने समाधानकारक हजेरी न लावल्यामुळे पाणी टंचाई निर्माण झाली असून सदर विभागातील ८१ गावे व ५१८ वाड्यांमध्ये सुमारे ३५ शासकीय व ६५ खाजगी टँकरने पाणी पुरवठा करण्यात येत असल्याचे

दिनांक १९ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच मौजे खालुम्ब्रे (ता.खेड, जि.पुणे) ग्रामपंचायत हद्दीत मोठया प्रमाणात औद्योगिकीकरण आणि नागरीकरण झाल्यामुळे ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली असल्याचे माहे फेब्रुवारी २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (२) बाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी अध्यक्ष, जिल्हा परिषद, पुणे यांस माहे डिसेंबर २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त पिण्याच्या पाण्याची टंचाई दूर करण्यासाठी उपाययोजना व उक्त ग्रामपंचायतीस पाणी पुरवठा करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे आहे.

दिनांक १८.०१.२०१६ च्या साप्ताहिक टँकर अहवालानुसार पुणे विभागातील एकूण ४ जिल्हयात ८१ गावे व ५१८ वाड्यांना ३५ शासकीय व ६५ खाजगी टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत होता.

(२) अंशतः खरे आहे.

औद्योगिकरण आणि नागरीकरण झाल्याने तसेच लोकसंख्येत वाढ झाल्यामुळे अस्तित्वातील पाणी पुरवठा योजनेचे पाणी कमी पडत असल्याने पाणी टंचाई जाणवत आहे.

(३) हे खरे आहे.

(४) मौजे खालुम्ब्रे (ता.खेड, जि.पुणे) या गावाचा राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम कृती आराखडा सन २०१५-१६ मध्ये समावेश करण्यात आलेला आहे.

तथापि, केंद्र शासनाने सध्या नवीन नळ पाणीपुरवठा योजनेची कामे मंजूर करु नयेत असे निदेश दिले असल्याने या योजनेस मंजूरी देण्यात आलेली नाही.

सद्यस्थितीत अस्तित्वात पाणीपुरवठा योजनेतून या गावास दरडोई दररोज २० लिटर याप्रमाणे पाणी पुरवठा होत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्हयातील जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा योजना प्रलंबित असल्याबाबत

**(६४) * ४५२१२ श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्याचे सरासरी पर्जन्यमान एक हजार १४२ मिमी आहे, मात्र या वर्षी एक हजार मिमी पाऊस कमी पडल्यामुळे उन्हाळयात १८३ गावांना पाणी टंचाईचा सामना करावा लागणार असल्याचे भूजल विकास यंत्रणेने सर्व्हेक्षणाद्वारे वर्तविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चंद्रपूर जिल्हा परिषद पाणीपुरवठा विभागाने १३४ नळयोजनांची कामे राज्य शासनाकडे प्रस्तावित केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सदर जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा विभागातर्फे राबविल्या जात असलेल्या २७ पाणीपुरवठा योजना वादात सापडल्या असून चार प्रकरणात गुन्हे दाखल झाले असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त नळयोजनांसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत व पाणीपुरवठा योजना सुरु करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच प्रश्नोक्त भाग (३) नुसार गुन्हे दाखल झालेल्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

पाणी टंचाई कृती आराखडा-२०१६ अंतर्गत १३४ गावांची निवड करण्यात आली असून, १७१ नळ योजना विशेष दुरुस्तीची कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत.

(३) होय, हे खरे आहे.

(४) होय.

एकूण २७ प्रकरणांपैकी ४ योजनांची चौकशी करण्यात आली असून, त्यात आर्थिक अफरातफर केल्याचे निदर्शनास आले आहे. उर्वरित २३ योजनांची चौकशी सुरु आहे. ६ गावांतील नळ पाणी पुरवठा योजनांचा पाणी पुरवठा सुरळीत सुरु असून, एक गावातील काम प्रगतीपथावर आहे.

(५) ४ प्रकरणात आर्थिक अफरातफर केल्याचे निदर्शनास आल्याने, १) मौ. करंजी, ता. गौडपिंपरी, २) मौ. वडकूली, ता. गोंडपिंपरी, ३) मौ. नवखडा तपाळ, ता. नागभिड, ४) मौ. परमडोली, ता. जिवती येथील समितीचे अध्यक्ष/ सचिव यांचेवर FIR दाखल करण्यात आले असून, सद्यस्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डोंबिवली (जि. ठाणे) येथील औद्योगिक वसाहतीमधील रासायनिक कपंन्यांकडे प्रदूषण नियंत्रण मंडळाचे होत असलेले दुर्लक्ष

**(६५) * ४०९१३ श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व)** : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली (जि.ठाणे) येथील औद्योगिक वसाहतीमधील रासायनिक कारखान्यांमधून वायू व जल प्रदूषणामुळे प्रदूषणाची पातळी वाढली असल्याची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३ जानेवारी २०१६ रोजी वा त्या सुमारास मा. उद्योग मंत्री यांच्याकडे करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तक्रारीमध्ये रासायनिक कंपन्यांकडे प्रदूषण नियंत्रण मंडळाचे दुर्लक्ष होत असल्याचे नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रदूषण करणाऱ्या रासायनिक कंपन्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) मा.खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्याण यांचेकडे दि. ०४.०१.२०१६ रोजी तक्रार अर्ज दिला आहे.

(२) होय.

(३) डोंबिवली औद्योगिक क्षेत्रातील कारखान्यांचे वेळोवेळी तपासणी करण्यात येते. सर्वेक्षणा दरम्यान औद्योगिक परिसरातील ५ कारखान्यांना उत्पादन तात्पुरते बंद करण्याचे निर्देश दिले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**जिल्हा क्रीडा अधिकारी, नांदेड या कार्यालयामार्फत राबविण्यात आलेल्या विविध योजनांच्या अंमलबजावणीत झालेली अनियमितता व गैरव्यवहार**

**(६६) * ४७८७२ डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा क्रीडा अधिकारी, नांदेड या कार्यालयामार्फत सन २०११ ते २०१४ या कालावधीत राबविण्यात आलेल्या क्रीडांगण विकास अनुदान योजना, व्यायाम शाळा विकास अनुदान योजना, समाजसेवा शिबीरे भरविणे व समाजकल्याण क्रीडा स्पर्धा या योजनांच्या अंमलबजावणीतील २,८०,१०,०००/- रुपयांच्या विनियोगात अनियमितता व गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे आदेश जिल्हाधिकारी नांदेड यांनी जिल्हा क्रीडा अधिकारी, नांदेड यांना दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अहवालान्वये दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) नाही. याबाबत जिल्हाधिकारी, नांदेड यांचेकडून जिल्हा क्रीडा अधिकारी, नांदेड यांना चौकशीचे आदेश प्राप्त झालेले नाहीत.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शाळकरी मुलांवरील लैंगिक अत्याचारास आळा घालण्यासाठी शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे बंधनकारक करण्याबाबत

**(६७) * ४५२०६ श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्रीमती संगीता ठोंबरे (केज), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शाळांमध्ये अल्पवयीन मुलांवरील होत असलेले लैंगिक अत्याचाराचे प्रमाण वाढले असून याची मा.उच्च न्यायालयाने गंभीर दखल घेत राज्यात शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे बंधनकारक करा अशा सूचना दिल्याचे दिनांक ११ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, अल्पवयीन मुलांवरील लैंगिक अत्याचाराला आळा घालण्यासाठी शासनाकडून मुख्याध्यापक, शिक्षकांची बैठक घेवून उपाययोजना आखण्याची आवश्यक ती कार्यवाही करण्यात आली आहे काय,

(३) मा.उच्च न्यायालयाच्या सदरहू सुचनेच्या अनुषंगाने राज्यातील सर्व शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे बंधनकारक करण्याबाबत शासनाकडून आजतागायत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) राज्यातील शाळांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याबाबत विचार करावा अशा सूचना मा.उच्च न्यायालयाने जनहित याचिकेवरील सुनावणीत दिल्या आहेत.

(२) अनुषंगिक कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) या अनुषंगाने कार्यवाही शासन स्तरावर सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## धुळे जिल्हयातील ९ पाणीपुरवठा योजना थकीत वीज बिलामुळे बंद असल्याबाबत

**(६८) * ४१५३६ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे जिल्हयातील ९ पाणीपुरवठा योजना थकीत वीज बिलामुळे बंद असून संजीवनी योजनेमुळे नव्याने चार योजना सुरु होणार असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दुष्काळी स्थितीत बंद पडलेल्या पाणीपुरवठा योजना लवकरात लवकर सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अंशत: खरे आहे. एकूण ९ योजनांपैकी ८ योजना बंद असून १ योजना सुरु आहे.
(२) बंद पडलेल्या ८ योजनांपैकी ३ प्रादेशिक योजना ह्या कायमस्वरुपी बंद असून ५ हंगामी स्वरुपाच्या प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना सुरु करण्यासाठी संबंधित शिखर समितीनी पेयजल संजीवनी योजनेचा लाभ घेण्यास नकार दिला. त्याशिवाय मुख्य उद्‌भव असलेल्या धरणामध्ये चालू वर्षी मृत साठ्यापेक्षा कमी पाणी असल्याने ३ योजना सुरु करता आलेल्या नाहीत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मिरकरवाडा (ता. जि. रत्नागिरी) बंदरामध्ये दुषित रासायनिक सांडपाणी सोडण्यात येत असल्याबाबत

**(६९) * ३९९११ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मिरकरवाडा (ता. जि.रत्नागिरी) बंदरामध्ये रत्नागिरी शहराचे सांडपाणी तसेच

औदयोगिक वसाहतीतील अनेक कारखान्यांचे दुषित रसायनिक सांडपाणी प्रक्रिया न करता सोडण्यात येत असल्याचे माहे डिसेंबर २०१५ - जानेवारी २०१६ यादरम्यान प्रदूषण नियंत्रण मंडळाने केलेल्या पाहणीत निष्पन्न झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बंदर गाळाने भरलेले असून बंदरातील तिनही जेटी गाळात रूतल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास सदर बंदरांतील गाळ काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) समुद्राच्या लाटांमुळे नैसर्गिकरित्या गाळ साठण्याची प्रक्रिया होत असल्यामुळे जेट्टी क्रमांक १ व २ च्या मधल्या भागात गाळ साठण्याचे प्रमाण जास्त असलेतरी या ठिकाणी तुलनेने कमी पाण्यात उभ्या राहू शकणाऱ्या छोटया नौका नांगरुन ठेवण्यात येत असल्याचे मत्स्य व्यवसाय अधिकारी, मिरकरवाडा, रत्नागिरी यांनी त्यांचे अहवालात नमुद केले आहे. मिरकरवाडा बंदराचे टप्पा क्रमांक २ चे बांधकामास मंजूरी मिळाली असून त्याअंतर्गत बंदरातील गाळ काढण्याचे काम करण्यांत येणार आहे. सदर बांधकाम महाराष्ट्र मेरी टाईम बोर्डामार्फत करण्यात येत असून बंदराच्या उत्तरेकडील ब्रेक वॉटर वॉलच्या प्रत्यक्ष बांधकामास सुरुवात झाली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्हयात पवना, इंद्रायणी आणि मुळा-मुठा नद्यांमध्ये झालेले प्रदूषण

**(७०) * ४०१०३ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड), श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयात मुळा-मुठा नदीच्या पात्रात जलपर्णी मोठ्या प्रमाणावर वाढली

असून, यामुळे प्रदूषणासह पाणी दूषित होत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, खरे आहे काय,

(२) तसेच सदर जिल्ह्यातील पवना, इंद्रायणी आणि मुळा-मुठा नद्यांमध्ये सर्व स्तरातून सुमारे ६० ते ७० दशलक्ष लिटर सांडपाणी रोज विनाप्रक्रिया नद्या, नाल्यांमध्ये मिसळत असल्याने नद्या, नाल्यांची अवस्था दयनीय झाली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शहरातील कत्तलखाने तसेच रुग्णालयांतून पडणाऱ्या कचऱ्यामुळे टायफॉईड, कॉलरा, अतिसार इ. साथीचे रोग शहरात सर्वत्र पसरण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुळा-मुठा नदीच्या आजूबाजूला असलेल्या अनेक गावांतील कुटुंबे नदीत मासेमारी करून त्यांचा उदरनिर्वाह करीत असतांना जलपर्णी वाढत असल्याने त्याचा परिणाम मासेमारी व्यवसायावर देखील होत असून नदीतील जलचर देखील जलपर्णीमुळे मृत पावत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त सर्व प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने नद्या प्रदुषित करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच प्रदूषण रोखण्यासाठी व उक्त नदीतील जलपर्णी काढण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी तथा वैद्यकीय संचालक, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांच्या दि. ०१/०३/२०१६ च्या पत्रान्वये शहरातील रूग्णालये व कत्तलखान्यातील निर्मित होणाऱ्या कचऱ्यामुळे टायफॉईड, कॉलरा, अतिसार इ. साथीचे रोग शहरात पसरण्याची शक्यता आहे. तसेच कॉलरा, टायफॉइड व अतिसार या रूग्णांच्या संख्येत मोठया प्रमाणात वाढ दिसून येत नसल्याचे कळविले आहे.

(४) पुणे महानगरपालिका यांनी दिनांक ०१/०३/२०१६ च्या पत्रान्वये मासेमारी व्यवसायावर परिणाम झाल्याबाबतचे खरे नसल्याचे कळविले आहे.

(५) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेस मैला शुध्दीकरण प्रक्रीया संयंत्रणा पुर्ण क्षमतेने शास्त्रोक्त पध्दतीने चालविण्याकरिता आदेशही पारित केले आहेत. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेविरुध्द फौजदारी खटला (७०९/२०१६) मा. मुख्य दंडाधिकारी यांच्या न्यायालयात दाखल केला आहे व तो न्यायप्रविष्ठ आहे.

पुणे महानगरपालिका मनपा विरुध्द फौजदारी खटला मा. मुख्य दंडाधिकारी यांच्या न्यायालयात (१८७/२०००) दाखल केला आहे व तो न्याय प्रविष्ठ आहे.

लोणावळा नगरपरिषद व तळेगाव नगरपरिषदेला महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्रस्तावित निर्देश दिले आहेत. तसेच आळंदी नगरपरिषद, आळंदी यांच्यावर न्यायालयात फौजदारी खटला दाखल करण्यात आला आहे व तो न्यायप्रविष्ट आहे

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अंबरनाथ (जि.ठाणे) येथे शिधावाटप दुकानातील तांदूळाची खुल्या बाजारात विक्री करण्यासाठी नेत असलेला ट्रक पकडल्याबाबत**

**(७१) * ४२५६१ श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) येथे शिधावाटप दुकानातील तांदूळाची खुल्या बाजारात विक्री करण्यासाठी नेत असलेला ट्रक कोहजगांव परिसरात ३२३ तांदूळाच्या पोत्यांसह शिधावाटप अधिकाऱ्यांनी पकडला असून तीन जणांवर अंबरनाथ पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर शिधावाटप दुकानात शिधापत्रिकाधारकांना अनुदानित किंमतीत तांदूळ मिळत नसल्याबाबतच्या अनेक तक्रारी पिडित शिधापत्रिकाधारकांकडून विभागाकडे करण्यात आल्या होत्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त दोन्ही प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार काळ्या बाजारात धान्य विक्री करणा-या शिधावाटप दुकानांवर व संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१), (२), (३) व (४) अंबरनाथ (जि.ठाणे) येथे शिधावाटप दुकानातील तांदुळाची खुल्या बाजारात विक्री करण्यासाठी नेत असलेला ट्रक कोहजगांव परिसरात ३२३ तांदुळाच्या पोत्यांसह शिधावाटप अधिका-यांनी पकडला असून, ट्रक चालक श्री. नाना महादेव कळगांवकर व त्याचे सहकारी श्री.दिपक हरीभाऊ जाधव व श्री. बाबुराव सुर्वे यांच्या विरुध्द अंबरनाथ पोलिस ठाणे अंबरनाथ जि. ठाणे येथे गुन्हा नोंद क्र.II /०१ दिनांक ६/१/२०१६ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे

-----------------

## जळगांव जिल्हयातील बहुतांश गावांमध्ये निर्माण झालेली पाणीटंचाई

**(७२) * ३९७७३ श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव जिल्हयात अत्यल्प पाऊस झाल्यामुळे बहुतांश ११२ गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची भीषण टंचाई सदृश्य स्थितीनुसार व पाहणीनुसार पाणी टंचाई निवारणार्थ एकूण १५२ उपाययोजना पाणी टंचाई असलेल्या गावांत घेण्यात आल्या आहेत. हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदय:स्थितीमध्ये ११ गावांमध्ये टँकरद्वारे पाणी पुरवठा केला जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, सदर जिल्हयात पाणी टंचाई निर्माण होऊ नये यासाठी शासनाने मंजूर केलेल्या पाणी पुरवठा योजनेतंर्गत सुरु असलेली कामे अत्यंत संथगतीने सुरु असल्याचे माहे जानेवारी,२०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असल्याने उक्त योजनेतंर्गत प्रलंबित कामे तात्काळ मार्गी लावण्याचे आदेश जिल्हा परिषद अध्यक्षा यांनी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर जिल्हयातील ग्रामपंचायतीतर्फे टंचाई निवारणाच्या संदर्भात अनेक गावांचे प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आले असतानाही अदयापी प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर जिल्हयातील पाणी टंचाई तात्काळ दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) अंशत: खरे आहे.

टंचाई अंतर्गत उपाययोजनेमध्ये प्रस्ताव विलंबाने प्राप्त होत होते. तथापि जिल्हा परिषद स्तरावरुन सूचना दिल्यानंतर टंचाई उपाययोजना मंजूरीचे प्रस्ताव शिघ्र गतीने जिल्हास्तरावर मंजूरीसाठी सादर करण्यात येत आहेत.
(४) हे खरे नाही.
(५) सद्यस्थितीत पाणी टंचाई निवारणार्थ जळगांव जिल्ह्यात दि. २२.०२.२०१६ रोजी १७ गावांना ११ टँकरने पाणी पुरवठा करण्यात येत आहे. तसेच १०७ विहीर अधिग्रहण व २५४ विंधन विहिरी, ७ तात्पुरत्या नळ पाणी पुरवठा योजना इ. उपाययोजना घेण्यात आलेल्या आहेत.

पाणी टंचाई निवारणार्थ सन २०१५-१६ च्या संभाव्य पाणी टंचाई कृती आराखड्याअंतर्गत ऑक्टोबर २०१५ ते जून २०१६ या कालावधीसाठी ८६७ गावांसाठी १४८१ उपाययोजना घेणेसाठी रु.१९९३.७४ लक्ष किंमतीचा आराखडा तयार करण्यात आला आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थांना नापास न करण्याच्या धोरणात बदल करण्याबाबत

**(७३) * ४१८२४ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.सुनिल**

**राऊत (विक्रोळी), श्री.किशोर पाटील (पाचोरा), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षण हक्क कायद्यानुसार पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थांना नापास न करण्याच्या धोरणात बदल करण्यासाठी मा.शालेय शिक्षण मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली समितीने माहे डिसेंबर, २०१५ मध्ये आपला अहवाल केंद्र शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू अहवालातील शिफारशींचे स्वरूप काय आहेत,

(३) सदर अहवालाबाबत केंद्र शासनाने आपले अभिप्राय राज्य शासनास कळविले आहेत काय,

(४) असल्यास, पहिली ते आठवी पर्यंत विद्यार्थ्यांना नापास न करणाच्या धोरणामुळे विद्यार्थ्यांमध्ये परिक्षेची धास्ती कमी होऊन विद्यार्थ्यांचेच नुकसान होत असल्याने सदर प्रकरणी लवकरात लवकर निर्णय घेऊन त्यांची अंमलबजावणी करण्यासंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही. तथापि, केंद्र शासनाने शिक्षण मंत्री, राजस्थान यांच्या अध्यक्षतेखाली याबाबतची समिती स्थापन केलेली असून अद्याप अहवाल सादर करण्यात आलेला नाही.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

**सांगली शहरातील वसंत मार्केट यार्डात व निघोज (ता. पारनेर, जि.अहमदनगर) येथे कोट्यवधी रुपयांचा गुटखा व सुगंधी तंबाखूचा साठा सापडल्याबाबत**

**(७४) * ४१५८९ श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली शहरातील वसंत मार्केट यार्डामधील चार गोडाऊनमध्ये कोट्यवधी रुपयांचा गुटखा व सुगंधी तंबाखू सापडल्याची घटना माहे डिसेंबर २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच निघोज (ता. पारनेर, जि.अहमदनगर) येथे अन्न व औषध प्रशासन आणि पोलिसांच्या संयुक्त पथकाने एका गोदामावर टाकलेल्या छाप्यात सुमारे १६ लाख रुपये किंमतीचा गुटखा व सुगंधी तंबाखू जप्त केल्याची घटना दिनांक २४ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधीत प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय, हे खरे आहे.

दिनांक १२ डिसेंबर, २०१५ रोजी वसंत मार्केट यार्ड, सांगली येथील गोडाऊनमध्ये प्रतिबंधित गुटखा व पानमसाल्याचे छुप्या पध्दतीने विक्री होत असल्याची माहिती मिळाल्यावरुन सदर ठिकाणी पोलिस पथकासह धाड टाकून दोन गोडाऊन व तेथे असलेल्या वाहनातून रु. ६८,११,४९६/- किंमतीचा प्रतिबंधित अन्न पदार्थाचा साठा जप्त करण्यात आला आहे.

(२) होय, दिनांक २३ डिसेंबर, २०१५ रोजी मे. प्रदीप ताराचंद गांधी, मु.पो.निघेज, ता. पारनेर, जि. अहमदनगर येथे प्रतिबंधित गुटखा, पानमसाला इत्यादीचा रु. १५,७४,२००/- किंमतीचा साठा जप्त करण्यात आला.

(३) वरील दोन्ही प्रकरणी संबंधितांविरुध्द पोलीस स्टेशनमध्ये प्रथम खबरी अहवाल नोंदविण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील एमआयडीसी क्षेत्रातील रासायनिक सांडपाण्यामुळे नद्यांचे पाणी प्रदुषित होत असल्याबाबत

**(७५) * ४०९७७ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील पाताळगंगा, (ता.पनवेल) व रोहा तालुक्यातील एम.आय.डी.सी.क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रासायनिक कंपन्यांना पर्यावरण

विभागामार्फत ना-हरकत देवून परवानगी देण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पर्यावरण विभागाने विशिष्ट अटींच्या अधीन राहून रासायनिक कंपन्यांना परवानगी देण्यात आल्या असताना दुषित रासायनयुक्त सांडपाणी नदीत सोडले जाते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रदुषित रासायनिक सांडपाण्यामुळे नदीतील मासे मृत झाल्याने किनाऱ्यावरील छोट्या मच्छिमारांच्या उपजिविकेचा मार्ग बंद पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे, तसेच नदी परिसरातील भातशेती व बागायतींचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच सुधागड (जि. रायगड) तालुक्याजवळून वाहत असलेल्या अंबानदीच्या पाण्यावर रसायनमिश्रित तपकिरी रंगाचे तवंग आल्याने गेल्या महिन्यापासून अंबानदीचे पाणी प्रदूषित झाल्याने येथील लोकांचे आरोग्य धोक्यात आले आहे व अंबानदीच्या पाण्याच्या नमुन्याचे निरीक्षण व्हावे अशी मागणी नागरिकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, वरील सर्व प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने प्रदुषित सांडपाणी नदीत सोडणाऱ्या रासायनीक कंपन्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. रामदास कदम :** (१) पाताळगंगा, ता. पनवेल व रोहा येथील कार्यरत उद्योगांना महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत सशर्त संमतीपत्र प्रदान करण्यांत आले आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही
(४) उपविभागीय अधिकारी, रोहा यांनी भ्रमणध्वनीद्वारे अंबा नदीत लालसर तवंग असल्याबाबत तक्रार प्राप्त झाल्याचे सांगितल्यावरुन महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत संबंधित ग्रामसेवका समवेत पाहणी करण्यांत आली होती. सदर पाहणीअंती नदीच्या पाण्यात मासे मर्तुक झाल्याचे दिसून आले नाही तसेच पाण्यावर कोणतेही केमिकल अथवा तेल आढळून आले नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कशेळे, कोठींबे (ता.कर्जत,जि.रायगड) येथील नळपाणी योजना प्रलंबित असल्याबाबत

**(७६) * ४४६११ श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कशेळे, कोठींबे (ता.कर्जत,जि.रायगड) या गावाची नळपाणी योजना सुमारे सहा वर्षापासून प्रलंबित असल्याने तेथील आदिवासी महिलांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण फिरावे लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नळपाणी योजना ६ वर्षे प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत तेथील नागरिकांनी तसेच तालुक्यातील लोकप्रतिनिधींनी शासनाकडे तसेच स्थानिक प्रशासन पाणीपुरवठा विभाग यांच्याकडे वारंवार तक्रारी करुनही कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर योजना केव्हा सुरु करणार व त्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) सदर योजनेचे काम ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती कशेळे, ता.कर्जत, जि. रायगड यांचेमार्फत केले जात असून समितीने दिनांक ११/१२/२००७ रोजी ठेकेदार मे.सेफ वॉटर इंडिया, मुंबई यांना कार्यादेश दिले असून कामाची मुदत १८ महिने होती. परंतु या योजनेच्या ठेकेदाराने काम पूर्ण करणेस टाळाटाळ केल्याने योजनेचे काम प्रलंबित आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

तथापि, सदर योजनेतून तात्पुरत्या स्वरुपाचा पाणी पुरवठा सुरु केला आहे.

(४) या योजनेतील शिल्लक कामे त्वरीत पूर्ण करुन घेणेत येत आहेत,

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## विदर्भातील अकोला, अमरावती, यवतमाळ जिल्हयातील शासकीय गोदामे बंद केल्याबाबत

**(७७) * ४८०५९ अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील अकोला, अमरावती, यवतमाळ, जिल्हयातील शासकीय गोदामे बंद करुन भारतीय खाद्य निगमचे अन्न सुरक्षेचे धान्य खाजगी गोदामात ठेवण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय धान्य खाजगी गोदामात ठेवण्यात येत असल्याने सदर धान्यांचा काळाबाजार होत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार विदर्भात शासकीय गोदामे उपलब्ध करण्याबाबत तसेच अन्न सुरक्षेचे धान्य काळाबाजार करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवी मुंबईतील कोपरखैराणे ते ऐरोली-दिघा हे खाडी किनारे प्रदुषित झाल्याबाबत

**(७८) * ४०३७६ श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील कोपरखैराणे ते ऐरोली-दिघा या खाडी किनाऱ्यावर मोठ्या प्रमाणात रसायनमिश्रित पाणी सोडले जात असल्यामुळे खाडी किनारे प्रदुषित झाल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच  नवी मुंबईच्या एमआयडीसी भागातील काही रासायनिक कंपन्याकडून रात्री मालाचे उत्पादन करताना मोठ्या प्रमाणात घातक रसायन हवेत सोडले जात असल्याचे दिनांक  २ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, एमआयडीसी परिसराभोवतीच्या कातकरी पाडा, भीमनगर, आंबेडकर नगर, रबाळे, घणसोली येथील नागरिक, लहान मुले, महिला केमिकलच्या उग्रदर्पामुळे हैराण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नवी मुंबई येथील खाडीतील रसायन मिश्रीत पाण्यामुळे मस्त्य उत्पादनावर परिणाम होत असल्याचे मस्त्यशेती प्रकल्प संस्थामार्फत निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर खाडीत रसायन मिश्रीत पाणी न सोडता पालिकेच्या जल शुध्दीकरण केंद्रात सोडण्याची मागणी मस्त्यशेती प्रकल्प संस्थेमार्फत करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने शासनाने जल व वायू प्रदूषण रोखण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची  कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे नाही.

राष्ट्रीय समुद्र विज्ञान संस्थेच्या शिफारशीनुसार उद्योगांचे सामाईक सांडपाणी प्रक्रिया केंद्रातील प्रक्रियाकृत सांडपाणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या ७ कि.मी. च्या बंद पाईपलाईनद्वारे वाशी खाडीत सोडण्यांत येते.

(२) प्रस्तुत प्रकरणी, जयेश इंडस्ट्रीज लि. एम. आय. डी.सी. या उद्योगामार्फत हवा प्रदुषण होत असल्याचे दिनांक ०२.०२.२०१६  रोजी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत केलेल्या पाहणीत निदर्शनास आले होते. त्यामुळे सदर उद्योगास अंतरिम आदेश बजावण्यांत आले असून सदर उद्योगाकडून रुपये ५० हजार इतक्या रकमेची बँक हमी घेण्यांत आली आहे.

(३) याबाबतची तक्रार/निवेदन महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास प्राप्त झालेली नाही.

(४) अशा प्रकारची बाब निदर्शनास आली असल्याचे मत्स्यशेती प्रकल्प संस्थामार्फत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास अवगत करण्यांत आलेले नाही.
(५) अशा प्रकारची मागणी मत्स्यशेती प्रकल्प संस्थेमार्फत प्राप्त झालेली नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वर्धा येथील शाळकरी मुलीने आत्महत्या केल्याबाबत**

**(७९) * ४६८३४ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वर्धा (जि.वर्धा) येथील केसरीमल कन्या शाळेत दहावीच्या वर्गात शिकत असलेल्या कुमारी निकिता अंडसकर या विद्यार्थीनीवर मैत्रिणीचा मोबाईल चोरल्याचा आळ आणल्यामुळे आणि वर्ग शिक्षिकेनी तिची बाजू ऐकून घेतलेली नसल्यामुळे सदर विद्यार्थीनीने वर्गशिक्षिकेच्या नावासह चिठठी लिहून दिनांक ३० जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास स्वत:च्या घरी गळफास लावून आत्महत्या केल्याचे दिनांक ३१ जानेवारी २०१६ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय
(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय. हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी पोलीस स्टेशन रामनगर, वर्धा येथे अप क्र. २६/१६ कलम ३०६, ३०५ भादंवि. अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून सध्या जामिनावर आहे. गुन्हयाचा तपास सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सांगली जिल्हयातील पिण्याच्या पाणी पुरवठा योजनेच्या आराखड्यासंदर्भात**

**(८०) * ४८५४८ श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्हयातील १०४ गावे व ३३४ वाड्या-वस्त्यांसाठी पिण्याच्या पाणी

पुरवठा योजना करण्यासाठी २९६ कोटी ८२ लाख रुपयांचा आराखडा सांगली जिल्हा परिषद व जीवन प्राधिकरण यांनी शासनाकडे माहे नोव्हेंबर-डिसेंबर, २०१५ मध्ये वा दरम्यान  मंजूरीसाठी पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आराखड्याच्या संदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय.

(२) आणि (३) सदर आराखडा हा मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम या प्रस्तावित योजनेअंतर्गत आहे. सदर योजनेस शासनाची मान्यता घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**गोंडवाना विद्यापीठाला युजीसीचे मान्यता मिळण्याबाबत व रिक्त पदे भरण्याबाबत**

**(८१) * ४२९३५ श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंडवाना या विद्यापीठांतर्गत चंद्रपूर-गडचिरोली जिल्हयातील मिळून २३७ महाविद्यालये संलग्न आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू गोंडवाना विद्यापीठांतर्गत असलेल्या २३७ महाविद्यालयांपैकी १७० महाविद्यालये कायम विनाअनुदान तत्त्वावर तर ६७ महाविद्यालये अनुदानीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर विद्यापीठांतर्गत असलेल्या महाविद्यालयात ३ हजार ५८ अधिव्याख्यात्यांची पदे मंजूर असून त्यापैकी आजमितीस २ हजार ११ पदे रिक्त आहेत, तसेच गत ४ वर्षापासून युजीसीची मान्यता मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू विद्यापीठाला युजीसीची मान्यता न मिळण्याची सर्वसाधारण कारणे काय असून सदरहू विद्यापीठाला युजीसीची मान्यता

मिळण्याच्या दृष्टीने तसेच महाविद्यालयातील रिक्त असलेली पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२) व (३) होय. हे खरे आहे.
(४) विद्यापीठाला विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम, १९५६ मधील कलम १२(बी) अंतर्गत मान्यता मिळण्यासाठीचा प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोगास सादर करण्यात आलेला असून त्यावर विद्यापीठ अनुदान आयोगाने काढलेल्या त्रुटींची/बाबींची पूर्तता करण्याची कार्यवाही विद्यापीठाकडून सुरु आहे. विद्यापीठाने संलग्नित महाविद्यालयांना पदभरतीबाबत वारंवार कळविले असून सक्तीचे आदेश निर्गमित केले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत  नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्हा परिषदेच्या शाळेतील पोषण आहाराच्या तांदुळ वाटपात झालेला अपहार

**(८२) * ४७४९५ श्री.मदन येरावार (यवतमाळ) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्हापरिषद कळंब पंचायत समिती अंतर्गत शाळांना वाटप करण्यात येत असलेल्या पोषण आहाराचा तांदुळ गत दोन महिन्यांपासून ग्रामीण भागातील शाळांना पोहचला नसल्याने सदर पोषण आहारात मोठया प्रमाणात अपहार झाल्याचे स्थानिक पालक वर्गातुन होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कळंब पंचायत समितीचा शिक्षण विभागाचा कारभार गत सहा महिन्यांपासून प्रभारी गटशिक्षणाधिकारी यांच्याकडे असल्याने जिल्हा परिषदेच्या शाळांना गत दोन महिन्यांपासून पोषण आहाराचा तांदूळ मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गटशिक्षणाधिका-यांच्या दुर्लक्षपणामुळे शाळांना तांदुळ वाटप होत नसल्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दखल घेवून पोषण आहाराची चौकशी करण्याबाबतची मागणी स्थानिक पालक वर्गाने निवेदनाव्दारे केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वसई (जि.पालघर) येथील तत्कालीन तहसिलदार यांनी पुरवठा विभागात केलेला गैरव्यवहार**

**(८३) * ४७३०१ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) येथील तत्कालीन तहसिलदार श्री.सुनिल कोळी यांनी पुरवठा विभागात केलेला मोठ्या प्रमाणावरील गैरव्यवहार, रेशनवरील पुरवठयासाठी शासनाने उपलब्ध केलेल्या रॉकेलचा व अन्नधान्याचा केलेला अपहार याबाबत विभागीय आयुक्त कोकण विभाग यांनी दिनांक १५ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास श्री.कोळी यांचेवर कारणे दाखवा नोटीस बजावली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.कोळी यांनी केलेला गैरव्यवहार व गैरप्रकार याची गांभीर्यपूर्वक दखल घेऊन त्यांना निलंबित करण्यासाठी विभागीय आयुक्त कोकण विभाग यांनी कार्यवाही सुरु केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निलंबन टाळण्यासाठी श्री.कोळी यांनी स्वत:ची बदली अन्यत्र करवून घेतली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी लाखो रुपयांचा गैरव्यवहार झाल्यामुळे त्याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने श्री.कोळी व संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) नाही

(२) श्री.सुनिल कोळी, तत्कालीन तहसिलदार वसई, जिल्हा पालघर यांनी पुरवठा व महसुली कामामध्ये केलेल्या अनियमितता व पर्यवेक्षीय शैथिल्याबाबत त्यांचे विरूध्द योग्य ती कारवाई करणेसाठी जिल्हाधिकारी पालघर यांचेकडून प्राप्त प्रस्तावावर विभागीय आयुक्त, कोकण यांचेकडे छाननी सुरू आहे.

(३) श्री. सुनिल कोळी यांची बदली करण्याबाबत विभागीय आयुक्त यांनी प्रस्तावित केले होते.

(४) श्री.कोळी, तत्कालीन तहसिलदार वसई, जिल्हा पालघर यांच्या विरूध्द विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### राज्यात डाळीची दरवाढ कमी करण्याबाबत करावयाची उपाययोजना

**(८४) * ३९६८५ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने कधी १०० रुपये तर कधी १२० रुपये प्रति किलोने तुरडाळ विकण्याची घोषणा करुन प्रत्यक्षात आजही तूरडाळ २०० रुपये किलोने विकली जात असून इतर कडधान्यांचे भाव वाढल्याने सर्वसामान्य नागरीकांवर मोठा आर्थिक बोजा पडत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तुरडाळीच्या दरात झालेली प्रचंड भाववाढ एक सुनियोजित कारस्थान असून या डाळ भाववाढीमध्ये गैरव्यवहार झाला असून सदर गैरव्यवहारातील शासकीय दस्तावेज जाहीर केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच गत दीडवर्ष केंद्र शासनाच्या विविध उपाय योजनामुळे भाज्या तसेच इतर खाद्यपदार्थांचे दर नियंत्रित झालेले आहेत, तथापि केंद्र शासनाने सूचना देवूनही त्याची राज्य शासनाने योग्य उपाययोजना न केल्याने राज्यात डाळींच्या किंमती वाढल्या असे सांगून केंद्रीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांनी राज्य शासनाला जबाबदार धरण्याची बाब दिनांक ४ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी केंद्र शासनाने राज्य शासनास दिलेल्या सूचनांचे थोडक्यात स्वरुप काय आहे व सदरच्या सूचना केंद्र शासनाने राज्य शासनास केव्हा दिल्या होत्या तसेच केंद्र शासनाने दिलेल्या सूचनांची अंमलबजावणी राज्य शासनाने न करण्याची कारणे काय आहेत,

(५) तसेच जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किंमतीवर नियंत्रण ठेवता यावे यासाठी डाळींचा समावेश करुन दर नियंत्रण कायदा तयार करण्याचा राज्य शासनाच्या विचाराधीन असलेल्या बाबींवर निर्णय घेण्यात आला आहे काय,

(६) असल्यास, सन २०१६-१७ मध्ये डाळीच्या किंमती वाढण्याची शक्यता लक्षात घेवून केंद्र शासनाने कोणकोणत्या सूचना या वर्षासाठी केलेल्या आहेत, सदर सूचनांची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने व राज्याने बफर स्टॉक करावा तसेच डाळींचे उत्पादन वाढविण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) तसेच प्रश्न भाग (२) मधील तुरडाळ गैरव्यवहाराची चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) केंद्र शासनाच्या अनुक्रमे दिनांक २८.०९.२०१५ व दिनांक १८.१०.२०१५ च्या अधिसूचनेस अनुसरुन, राज्य शासनाने दिनांक १९.१०.२०१५ च्या पत्रान्वये डाळी, खाद्यतेल व खाद्यतेलबिया या जीवनावश्यक वस्तूंवर दिनांक ३०.०९.२०१६ पर्यंत साठा निर्बंध लागू केले आहेत. त्यास अनुसरुन क्षेत्रिय कार्यालयांकडून कार्यवाही करण्यात आली आहे.

राज्य शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार सदर कार्यवाही दरम्यान जप्त करण्यात आलेला तूर / तूरडाळीचा साठा संबंधित व्यापाऱ्याकडून Indemnity Bond घेऊन, त्याला परत करण्यात यावा. सदर मुक्त केलेली तूरडाळ व मुक्त केलेल्या तूरीच्या भरडाईनंतर तयार झालेली तूरडाळ महाराष्ट्र राज्यातच रु.१००/- प्रतिकिलो या दराने तुरडाळ विकली जाईल, याबाबत कार्यवाही करण्याचे निर्देश

सर्व क्षेत्रिय कार्यालयांना दिनांक २४.११.२०१५ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आले आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) केंद्र शासनाच्या सूचनेस अनुसरुन राज्य शासनाने वेळोवेळी कार्यवाही केलेली आहे.

(४) केंद्र शासनाने राज्यात डाळींवर साठा निर्बंध लागू करण्याबाबत निर्देश दिले होते. तसेच दिनांक २८.०९.२०१५ व दिनांक १८.१०.२०१५ च्या अधिसूचनेन्वये डाळी, खाद्यतेल व खाद्यतेल बिया या जीवनावश्यक वस्तूंवरील साठा निर्बंधास दिनांक ३०.०९.२०१६ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. त्यास अनुसरुन राज्य शासनाने दिनांक १९.१०.२०१५ च्या पत्रान्वये डाळी, खाद्यतेल व खाद्यतेलबिया या जीवनावश्यक वस्तूंवर दिनांक ३०.०९.२०१६ पर्यंत साठा निर्बंध लागू केले आहेत.

भविष्यात तूर / तूरडाळ, खाद्यतेल, खाद्यतेल बीया व इतर कडधान्य यांच्या वाढीव किंमती नियंत्रित करण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांबाबतचा कृती आराखडा (Action Plan) तयार करण्यासाठी, दर नियंत्रक समिती (Price Monitoring Committee) गठित करण्यात आली आहे.

(५) डाळींचे दर नियंत्रित ठेवण्याकरीता नियंत्रण कायदा तयार करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन आहे.

(६) भविष्यात तूर / तूरडाळ, खाद्यतेल, खाद्यतेल बीया व इतर कडधान्य यांच्या वाढीव किंमती नियंत्रित करण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांबाबतचा कृती आराखडा (Action Plan) तयार करण्यासाठी, दर नियंत्रक समिती (Price Monitoring Committee) गठित करण्यात आली आहे.

त्याअनुषंगाने राज्यात डाळी, खाद्यतेल व खाद्यतेल बीया यांचे दर स्थिर ठेवण्याच्या दृष्टीकोनातून आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुणे शहरात रेशन दुकानांचे परवाने भाड्याने देऊन**
**तेथे रेशनचा होत असलेला काळाबाजार**

**(८५) * ४४४२१ श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहर अन्नधान्य वितरण अधिकारी निलिमा धायगुडे यांनी बालाजी

नगर येथील एम एल नवघणे व जनता वसाहत येथील श्री.गुप्ता या दोघांची रेशन दुकाने चालवायला दिलेली व्यक्ती खिमसिंग राजपुरोहित याने १६७ क्विंटल गहू, ७९ क्विंटल तांदूळ व १००० लिटर रॉकेलचा काळाबाजार केल्याचे निदर्शनास आल्याचे दिनांक १९ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास सांगितले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रेशनदुकाने दुस-याला चालवायला दिलेल्या त्या मूळ मालकांचे परवाने तातडीने रद्द का करण्यात आले नाहीत,

(३) असल्यास, खिमसिंग राजपुरोहित यांचेविरुध्द रेशन धान्य व रॉकेल काळ्याबाजारात विकल्याबद्दल कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच पुणे शहरात ज्या रेशन दुकानदारांनी रेशन दुकानांचे परवाने भाड्याने दिलेले आहेत अशा सर्व दुकानदारांचे परवाने शासनाने रद्द करुन, जी व्यक्ती भाड्याने दुकान चालवत आहे त्या व्यक्तीच्या नावावर सदर परवाने करणार आहेत काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१), (२), (३), (४) व (५) सदर प्रकरणी श्रीमती सुनीता गुप्ता यांच्या स्वस्तधान्य दुकान क्र. ह/१८० चालवायला दिलेले व्यक्ती श्री. मुकेश खिंमसिंग राजपुरोहित, श्री. सोहम खिंमसिंग राजपुरोहित यांच्या विरुध्द जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ चे कलम ३ व ७ अन्वये दिनांक १८/१२/२०१५ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

श्री. मोहन नवघणे यांच्या स्वस्तधान्य दुकान क्र. ह/१४० चालवायला दिलेले व्यक्ती श्री.खिंमसिंग राजपुरोहित यांच्या विरुध्द जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ चे कलम ३ व ७ अन्वये दिनांक १९/१२/२०१५ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

वरील प्रमाणे त्यांच्या दुकानाचे परवाने दिनांक २४/२/२०१६ रोजी निलंबित करण्यात आले आहे.

-----------------

## अकोला जिल्ह्यातील सर्वशिक्षा अभियान योजनेकरिता असलेला निधी खर्च न झाल्याबाबत

**(८६) * ४९११८ श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील शाळांचे शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्याच्या दृष्टीने सर्वशिक्षा अभियान योजनेकरिता शासनाकडून २० कोटी रुपयांचा निधी देण्यात आला असून सदर निधीपैकी ९ महिन्यात केवळ ४ कोटी रुपये खर्च करण्यात आले , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अधिकाऱ्यांची उदासिनता व योग्य नियोजनाअभावी सर्वशिक्षा अभियान योजना राबविण्यास अपयशी ठरली असून निधी उपलब्ध असूनही शाळांमध्ये अद्यापपर्यंत पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) अधिकाऱ्यांची रिक्त पदे तसेच प्रशासकीय कारणास्तव शाळांमध्ये मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यात विलंब झाला असला तरी मार्च २०१६ अखेरपर्यंत शाळांना पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## वसई (जि.पालघर) तालुक्यातील पुरवठा विभाग अधिकारी परवाना वितरणामध्ये करीत असलेले गैरव्यवहार

**(८७) * ४८९२३ श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) तालुक्यात रास्त भाव धान्य दुकानाचे परवाने पुरवठा विभागाचे अधिकारी यांनी एका कुटुंबाचे अनेक नावाने परवाने वितरण करुन एकाच कुटुंबाकडे मक्तेदारी दिल्याने धान्य व रॉकेलची काळ्या बाजारात विक्री

होत असून शासनाने दिलेल्या सबसिडीचा फायदा लाभार्थ्यांना न होता परवानाधारकांना होत असल्याचे दिनांक २९ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषी अधिकारी, कर्मचारी व परवानाधारकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१), (२) व (३) संपूर्ण तालुक्यात एकाच कुटुंबातील व्यक्तींच्या नावे एकापेक्षा जास्त परवाने असलेली फक्त दोन कुटूंब आढळून आली असून त्यांच्याकडे एकूण १७ परवाने आढळलेले आहेत. त्यापैकी गैरप्रकार करणाऱ्या दोन परवानाधारकांविरूध्द जीवनावश्यक वस्तु अधिनियम १९५५ मधील तरतुदींचा भंग केल्याने गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांचे दुकानांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत.

-----------------

## कोल्हापुर येथील शिवाजी विद्यापीठांतर्गत महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांची नियमबाह्य केलेली नियुक्ती

**(८८) * ४००५६ श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापुर येथील शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विविध अनुदानित महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन ऑनलाईन करण्यासाठी कोल्हापूर विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक कार्यालयाने त्यांची विविध माहिती संकलन करीत असताना ४०८ प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांची नियुक्ती पदभरतीची जाहीरात प्रसिध्द न करता, बिंदु नियमावली पालन न करता, तसेच निवड समितीच्या अहवालाविनाच नियुक्ती प्रक्रिया राबविल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापुर विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक कार्यालयाने संबंधितांच्या नियुक्तीबाबत आक्षेप घेतला असून संबंधीत कर्मचाऱ्यांना गेल्या २० ते ३० वर्षांपासून शासनाकडून वेतन अदा होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय निष्पन्न झाले, तद्अनुषंगाने सदर नियमबाह्य नियुक्ती झालेल्या कर्मचाऱ्यांकडून वेतनाची वसुली करण्यात येणार आहे काय तसेच सदर नियुक्तीस जबाबदार असणाऱ्या संस्था चालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) याबाबत एचटीई-सेवार्थ या वेतन संगणक प्रणालीच्या अनुषंगाने प्राथमिक तपासणीत निदर्शनास आली आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) व (४) नाही.

एचटीई-सेवार्थ अंतर्गत मान्यता देण्याच्या कार्यवाहीमध्ये प्राथमिक छाननीमध्ये सदर प्रकरणी त्रूटी असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर त्रूटींची पूर्तता करण्यासाठी संबंधीत महाविद्यालयाकडून विभागीय कार्यालयास कागदपत्रे प्राप्त होत असून सदर कागदपत्रांची तपासणी करण्याची कार्यवाही अद्याप सुरु आहे.

-----------------

**कासेगाव, खर्डी, भाळवणी (ता.पंढरपूर,जि.सोलापूर) येथील जीवन प्राधिकरणाच्या योजना सुरु करण्याबाबत**

**(८९) * ४२५०५ श्री.सिध्दराम म्हेत्रे (अक्कलकोट), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कासेगाव, खर्डी, भाळवणी (ता.पंढरपूर,जि.सोलापूर) येथील जीवन प्राधिकरणाच्या योजना सुरु करण्याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असून मागील दोन महिन्यांपूर्वी विजेची थकबाकी भरुनही योजना सुरु होत नसल्याने सदर योजनांचे पाणी घेणाऱ्या २६ गावांतून तीव्र संताप व्यक्त होत असल्याचे दिनांक २९ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच  कासेगाव (ता.पंढरपूर,जि.सोलापूर) १२ गावांसाठी पाणीपुरवठा योजना राबविण्यात आली परंतु अद्यापपर्यंत काही ठिकाणी वीज जोडणीच केली नसल्याने तसेच दोनपैकी एक विद्युतपंप जागेवरच नसल्याने वारंवार पाणी पुरवठा योजना अडचणीत येत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये  वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी विजेची थकबाकी भरुनही अद्यापपर्यंत जीवन प्राधिकरण योजना सुरु न करणा-या संबंधितांची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने दोषी आढळून येणा-या संबंधितावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच सदरील योजना त्वरीत सुरु  करण्याबाबत कोणती  कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,  विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) कासेगाव, खर्डी व भाळवणी प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनांचे थकित वीज देयक जिल्हा परिषद, सोलापूर यांचेमार्फ़त महावितरणकडे अदा करण्यात आले आहे. सदर योजनांपैकी कासेगाव व भाळवणी नळ पाणीपुरवठा योजनांची दुरुस्ती करुन पाणीपुरवठा सुरु करण्यात येत आहे. तर खर्डी प्रादेशिक योजनेचा उद्भव कोरडा असल्याने सदर योजनेची दुरुस्ती करता येत नाही.

(२) हे खरे नाही.

कासेगांव व १२ गांवे प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेची वीज जोडणी दोन्ही ठिकाणी कायमस्वरुपी बंद करणेत आली होती. सदर ठिकाणी दि.१८.०१.२०१६ रोजी पुनश्च: वीज जोडणी प्राप्त करुन घेतली आहे. त्यानुसार आवश्यक ती पंप दुरुस्ती करुन दि.२३.०१.२०१६ रोजी योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. एक मोटार नादुरुस्त असून ती लवकरात लवकर  चालू करण्यात येत आहे.

(३) व (४) कासेगांव व १२ गांवे प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेची वीज जोडणी करुन सद्य:स्थितीत योजनेतील ५ गावांना पाणीपुरवठा सुरु करण्यात आलेला आहे. उर्वरित ७ गावांना मार्च, २०१६ अखेर पाणीपुरवठा सुरु करण्याचे नियोजन आहे.

भाळवणी व ३ गांवे प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेची आवश्यक ती दुरुस्ती करुन योजनेतील समाविष्ट गावांना दि.०७.०२.२०१६ पासून पाणीपुरवठा सुरु करणेत आला आहे.

खर्डी व १० गांवे प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेची वीज थकबाकी महावितरणकडे अदा केली आहे. तथापि, सोनके तलावात (उद्भवास) पाणी नसलेने वीज जोडणी घेतलेली नाही. उद्भवास पाणी उपलब्ध झाल्यास दुरुस्ती कामे करुन पाणीपुरवठा करणे शक्य आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खालापुर (जि.रायगड) तालुक्यातील होनाडे विद्यालयातील विद्यार्थ्यांना ज्योती स्टीलच्या ध्वनीप्रदुषणामुळे होत असलेला त्रास

**(९०) * ४४६०२ श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खालापुर (जि.रायगड) तालुक्यातील होनाडे शाळेच्या शेजारी असलेल्या ज्योती स्टील या कारखान्यातील कानठळया बसवणाऱ्या ध्वनीप्रदुषणामुळे होनाडे शाळेतील विद्यार्थी व शिक्षक बहिरे होण्याच्या भीतीने त्रस्त झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्योती स्टीलच्या ध्वनीप्रदुषणामुळे होनाडे विद्यालयातील विद्यार्थ्यांना होत असलेल्या त्रासाबाबत यापूर्वी कारखान्याला अनेक वेळा नोटीसा बजावण्यात आल्या होत्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात संबंधितांना शाळा व्यवस्थापकाने पत्रव्यवहार करुनही अद्याप कंपनीविरोधात कोणतीच कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार शासनस्तरावर कंपनीविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) सदर प्रश्नांच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे सदर कारखान्यांच्या ध्वनीप्रदुषणाचे मोजमाप केले असून सदर परिसरामध्ये ध्वनीप्रदुषणाची पातळी विहित मर्यादेपेक्षा (८ डेसिबल) जास्त असल्याचे आढळून आल्यामुळे सदर कारखान्यास कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**जालना (जि.जालना) शहरासह तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानदारांना धान्य वितरीत झाले नसल्याबाबत**

**(९१) * ४७५५४ श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना (जि.जालना) शहरासह तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानदारांना जालना जिल्हा पुरवठा विभाग व तहसिल कार्यालयाने माहे जानेवारी महिन्याचे धान्य अद्याप वितरीत केले नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिधापत्रिकांचे आधार फिडींग करण्यास विलंब होत असल्याने साखरेसह शेकडो क्विंटल धान्य पुरवठा विभागाच्या नुतन वसाहत मधील शासकीय गोदामामध्ये पडून आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार यास जबाबदार असणाऱ्या व्यक्तींवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.

(२) जालना (जि.जालना) शहरास तालुक्याचे आधार सिडींगचे काम ७२ % पूर्ण झालेले असून सर्व लाभार्थ्यांना माहे जानेवारी, २०१६ चे अन्नधान्याचे वाटप करण्यात आले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अलिबाग, मुरुड (जि.रायगड) तालुक्यातील सीआरझेड कायद्याचे उल्लंघन करून बांधण्यात आलेल्या बांधकामांवर कारवाई करण्याबाबत

**(९२) * ४२६८७ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सागरी नियमन क्षेत्र (सीआरझेड) कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश मा.पर्यावरण मंत्री यांनी दिल्यानुसार केलेल्या सर्व्हेक्षणानुसार रायगड जिल्ह्यातील अलिबागमधील १४५, मुरुड मधील १४१ बांधकामापैकी १५६ बांधकामांविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणांची कारवाई काही महिन्यांपासून विलंबाने होत आहे, हे ही खरे आहे काय, त्यामागील सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त कारवाई त्वरीत सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

अलिबाग तालुक्यातील १४५ पैकी ०६ व मुरुड तालुक्यातील १४१ पैकी ०६ बांधकामे निष्कासित करण्यांत आली आहेत. अलिबाग व मुरुड तालुक्यातील एकूण १२२ प्रकरणांमध्ये मा. जिल्हा न्यायालयाने तात्पुरते स्थगिती आदेश दिल्याने कारवाई करण्यांस विलंब होत आहे.

(३) मा. जिल्हा न्यायालयाकडील उपरोक्त नमुद १२२ बांधकाम प्रकरणी स्थगिती आदेश संपुष्टात येताच बांधकामे निष्कासीत करण्याची कारवाई करण्यांत येईल. तसेच सद्य:स्थितीत अलिबाग तालुक्यातील १४ व मुरुड तालुक्यातील १२ प्रकरणांमध्ये बांधकामे निष्कासीत करण्याची कारवाई चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील रास्तभाव धान्य दुकानदारांना वितरण कमी केल्यामुळे आदिवासी कुटुंबांना धान्यापासून वंचित राहावे लागल्याबाबत

**(९३) * ४४६९१ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील भारतीय खाद्य निगमने (एफसीआय) रास्तभाव धान्य दुकानदारांना माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये धान्य शिल्लक राहिले नसल्याचे कारणे देऊन वितरण कमी केल्यामुळे परिसरातील आदिवासी कुटुंबांना धान्यापासून वंचित राहावे लागल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच तेथील रेशन दुकानदारांनी गोदामातून माल कमी आल्याचे कारण देऊन प्रती मागणी ६०० कि.ग्रॅ. धान्याचे वाटप केले याबाबत पुरवठा अधिकारी, शहापूर यांनी रेशन दुकानदारांवर कोणतीही कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार रेशन दुकानदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व सदरहू प्रकरणाबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. गिरीश बापट :** (१), (२), (३) व (४) भारतीय अन्न महामंडळाकडे अन्नधान्याचा पुरेसा साठा नसल्याने माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये अन्नधान्याची उचल कमी झाली आहे. याची चौकशी करण्यात येत आहे.

-----------------

## कोल्हापूर जिल्ह्यातील नळपाणीपुरवठा योजनांची देयके प्रलंबित असल्याबाबत

**(९४) * ४६७६३ श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांअंतर्गत ग्रामीण

पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद कोल्हापूर यांचेकडून जिल्हयातील नळपाणीपुरवठा योजनांचे जवळ जवळ रु. ५०/- कोटी इतक्या रक्कमेची देयके प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधीअभावी उक्त जिल्हयातील बऱ्याच नळ पाणीपुरवठा योजनांची कामे प्रलंबित असल्याने ऐन उन्हाळयामध्ये सदर गावामधील तीव्र पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संभाव्य पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता गृहीत धरुन स्थानिक लोकप्रतिनिधी, करवीर यांनी कोल्हापूर जिल्हा परिषदेकडे तात्काळ रु. ५०/- कोटींचा निधी वर्ग करण्याबाबत मा. पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री यांना दिनांक २० जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास , ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद, कोल्हापूरला निधी वर्ग करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय.

(२) नाही.

(३) होय.

(४) सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम अंतर्गत कोल्हापूर जिल्हा परिषदेस आतापर्यंत रु. ४०.९१ कोटी एवढे अनुदान वितरीत करण्यात आलेले आहे. या पुढील कालावधीत निधीच्या उपलब्धतेनुसार निधीचे वितरण करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्हयातील ज्ञान प्रबोधिनी संस्थेने गत २६ वर्षापासून अंध शाळेसाठी मागणी केलेल्या जागेबाबत

**(९५) * ४१०१३ श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरामध्ये मिरजकर तिकटी येथे ज्ञान प्रबोधिनी संचालित

अंधशाळा गत २६ वर्षापासून सुरु असून सदर ठिकाणी ५४ मुले शिक्षण व वास्तव्यास आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अंधशाळेची इमारत जुनी आणि वातावरण कोंदट असल्यामुळे मुलांना प्रसन्न वातावरण मिळत नाही तसेच इमारत रस्त्यालगत असून वाहनांची होणाऱ्या वर्दळीमुळे अंधांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर होत असल्याने कोल्हापूर येथील आय. टी. पार्क परीसरामध्ये अंधशाळेकरिता दीड एकर जागेची मागणी सदर संस्था गत २६ वर्षापासून शासनाकडे करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

(२) नाही. सदर संस्थेने अंध शाळेकरिता जागा मागणीचा प्रस्ताव दिनांक २१.९.२००२ रोजी जिल्हा समाज कल्याण अधिकारी, गट-अ, जिल्हा परिषद कोल्हापूर यांना सादर केला असून सदरचा प्रस्ताव समाजकल्याण अधिकारी, कोल्हापूर यांचेकडून दिनांक २४.९.२००२ रोजी जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडे पाठविण्यात आला असून जिल्हाधिकारी यांनी दिनांक २१.११.२००२ च्या पत्रान्वये महसूल व वन विभागाकडे सादर केला आहे.

(३) शैक्षणिक संस्थांना शासकीय जमीन देणे ही बाब महसूल व वन विभागाच्या अखत्यारीतील असून, जिल्हाधिकारी कोल्हापूर यांनी सदरहू शाळेसाठीच्या जमीन मागणीचा प्रस्ताव दिनांक २१.११.२००२ अन्वये शासनास सादर केला होता. शासनस्तरावरील नस्ती मंत्रालयातील आगीत नष्ट झाल्याने महसूल व वन विभागाने दिनांक २९.१२.२०१२ च्या पत्रान्वये मागणी संदर्भातील स्वयंस्पष्ट प्रस्ताव आवश्यक त्या कागदपत्रांसह सादर करणेबाबत जिल्हाधिकारी यांना कळविण्यात आले आहे. त्याप्रमाणे जिल्हाधिकारी यांनी दिनांक २९.०७.२०१५ अन्वये आवश्यक त्या कागदपत्रांसह फेर प्रस्ताव सादर करणेबाबत संस्थेस कळविले आहे.

(४) मंत्रालय आगीत नस्ती नष्ट झाल्यामुळे फेर प्रस्तावाची मागणी करुन नस्तीच्या पुनर्बांधणीची कार्यवाही महसूल व वन विभागामार्फत सुरु आहे.

-----------------

## अहमदनगर जिल्हयातील निर्माण झालेली भीषण पाणी टंचाई

**(९६) * ४०५३६ श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयातील अहमदनगर तालुक्यात गत चार वर्षापासून पाऊस नसल्यामुळे तेथील विहिरी तलाव व कुपनलिका आटल्या असून पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टँकरने पाणीपुरवठा करण्याबाबत संबंधित गावांच्या सरपंचानी पंचायत समितीमध्ये प्रस्ताव दाखल केले असताना सुध्दा अद्यापही सदर गावांना टँकरने पाणीपुरवठा करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याची कारणे काय आहेत तसेच टंचाईग्रस्त गावांना टँकरने पाणीपुरवठा करण्याबाबत शासनाने तातडीची कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अंशत: खरे आहे. सततच्या कमी पर्जन्यमानामुळे ऑक्टोबर, २०१५ मध्ये सरासरी भूजलपातळीत -१.४४ मीटरपर्यंत घट झाली असून तालुक्यात टंचाई सदृश्य परिस्थिती निर्माण झालेली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) अहमदनगर जिल्हयात सन २०१५ मध्ये उशिरा म्हणजे सप्टेंबर-ऑक्टोबर मध्ये पाऊस झाल्याने शासनाने चालू असलेल्या उपाय योजनांना मुदतवाढ दिली होती. त्यानुसार चालू असलेल्या उपाययोजनांद्वारे पाणी टंचाई दूर करण्याचे प्रयत्न प्रशासनामार्फत करण्यात आले.

अहमदनगर तालुक्यातील पाणी टंचाई निवारणार्थ ऑक्टोबर, २०१५ ते जून, २०१६ या कालावधी करिता रु.६२१.४९ लक्ष निधीचा टंचाई कृती आराखडा मंजूर करण्यात आला आहे. त्याअनुषंगाने आवश्यक त्या टंचाई निवारणार्थ उपाययोजना घेण्यात येत आहेत.

सद्यस्थितीत अहमदनगर तालुक्यात पाणी टंचाई असलेल्या १३ गावे ८० वाड्यांसाठी २० टँकरद्वारे पाणी पुरवठा चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लातूर व कोल्हापूर जिल्ह्यामध्ये घरगुती रॉकेलमध्ये होणाऱ्या गैरव्यवहाराबाबत

**(९७) * ४१४९७ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर (जि.लातूर) शहरासह जिल्ह्यातील नागरिकांसाठी येणाऱ्या सरासरी १४ लाख १६ हजार लिटर निळ्या रॉकेलचा काळा बाजार होत असल्याचे निदर्शनास आले असून सर्वसामान्यांना लिटरभर रॉकेल मिळणे दुरापास्त झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच कोल्हापूर जिल्ह्यामध्ये रॉकेल वाटप करताना शिधापत्रिकेतील व्यक्तींच्या संख्येनुसार रॉकेल वितरण करण्यात येत नसल्याच्या तक्रारी वाढत असल्याचे दिनांक २० जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निळ्या रॉकेलची वाढीव दराने विक्री सुरु असून या निळ्या रॉकेलच्या काळ्या बाजारावर संबंधित पुरवठा विभागाची मेहेरनजर असल्यामुळे हा सर्व कारभार बिनधास्तपणे सुरु असल्याने सामान्य नागरिकांमध्ये तीव्र संताप होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त ठिकाणी रॉकेल वितरणाची पध्दत योग्य रितीने होण्यासाठी व रॉकेलचा काळाबाजार रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) केरोसिनचा काळा बाजार होऊ नये, या करिता केरोसिन परवानाधारकांच्या नियमित तपासण्या करण्यात येतात व तपासण्यांमध्ये दोषी आढळून आलेल्या परवानाधारकांवर नियमानुसार कारवाई करण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सांगली जिल्हा परिषदेच्या आस्थापनेवरील नळ पाणी पुरवठा योजनेतंर्गत व बोअर दुरुस्ती यांत्रिक युनिटमध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांचे थकित वेतन व भत्ते अदा करण्याबाबत

**(९८) * ४८३३७ श्री.शिवाजीराव नाईक (शिराळा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हा परिषदेच्या आस्थापनेवर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून हस्तांतरित झालेले व कासेगाव, जुनेखेड-नवेखेड, नांद्रे-वसगडे, तुंग-बागणी, कुंडल व वाघोली अशा एकूण ६ नळ पाणी पुरवठा योजनेवर कार्यरत असलेले ५६ कर्मचारी आणि बोअर दुरुस्ती यांत्रिक युनिटकडे कार्यरत असलेले १२ कर्मचारी अशा एकूण ६८ कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते मागील बऱ्याच कालावधीपासून अदा करण्यात आलेले नाहीत त्यामुळे संबंधितांमध्ये प्रचंड उद्रेक पसरला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कर्मचाऱ्यांपैकी बरेच कर्मचारी मागासवर्गीय असताना व मागासवर्गीय अधिकारी/कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी त्रैमासिक/सहामाही आढावा बैठका घेण्याबाबत शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाचे दिनांक ३ मे, २०११ रोजीचे परिपत्रक असताना शासनाकडून याबाबतीत अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतीत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.ग्रामविकास व जलसंधारण मंत्री महोदयांना दिनांक २ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही. सदर कर्मचाऱ्यांना माहे जानेवारी, २०१६ अखेर वेतन भत्ते अदा करण्यात आलेले आहे.

(२) नाही. सा.प्र.वि. च्या दिनांक ३ मे, २०११ च्या परिपत्रकानुसार कार्यवाही करण्याबाबत या विभागाने दिनांक ११ एप्रिल, २०११ च्या शासन परिपत्रकान्वये सर्व जिल्हा परिषदांना सूचना दिलेल्या आहेत.

(३), (४) व (५) जिल्हा परिषदांकडे हस्तांतरीत झालेल्या पाणी पुरवठा योजनांवरील कर्मचारी हे पुर्णत: जिल्हा परिषदेचे असल्याने त्यांचे वेतन जिल्हा परिषदेच्या स्व:निधीतून अदा करण्यात येते. त्यांच्या वेतनविषयक लाभासंदर्भात जिल्हा परिषदेने सत्वर कार्यवाही करण्याबाबत सर्व जिल्हा परिषदांना शासन परिपत्रक दिनांक ४ जून, २०१२ च्या परिपत्रकान्वये सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार जि.प. कडून कार्यवाही करण्यात येते.

-----------------

**अहमदनगर जिल्ह्यातील अनेक लाभार्थ्यांना वैयक्तिक शौचालय उभारणीसाठी अनुदान मिळण्याबाबत**

**(९९) * ४८३९४ श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ग्रामीण भागातील नागरिकांनी वैयक्तिक शौचालयांची उभारणी करुन त्यांचा वापर करावा यासाठी जिल्हा परिषदेच्या स्वच्छता विभागामार्फत उपक्रम राबविला जात असून लाभार्थींना बांधकामासाठी बारा हजार रुपयांचे अनुदान दिले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अहमदनगर जिल्ह्यात चार हजार आठशे लाभार्थी अनुदानाच्या प्रतीक्षेत असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली काय,चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार उक्त जिल्ह्यातील लाभार्थींना अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे येथील ग्राहक तक्रार निवारण मंचाकडील न्यायालयात प्रलंबित असलेल्या दाव्यांबाबत

**(१००) * ४०१६९ डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील ग्राहक तक्रार निवारण मंचाकडे दरमहा १०० हून अधिक तक्रारी दाखल होत असल्याने येथील न्यायालयात ३५०० दावे प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्मचाऱ्यांची कमतरता असल्यामुळे ग्राहकांना न्याय देण्यामध्ये अडथळे निर्माण होत असल्याने तसेच, रेकॉर्ड रूमची व्यवस्था नसल्याने कार्यालयाला गोडाऊनचे स्वरूप आल्याने फाईल्स ठेवण्यास जागा नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कार्यालयाकरिता जागा व पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध करण्याकरिता वरिष्ठ अधिकाऱ्यांनी वारंवार प्रशासनाकडे मागणी केली असून सात वर्षांपासून पाठपुरावा करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय. दि.३१.१.२०१६ पर्यंत जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, ठाणे कार्यालयात प्रलंबित असलेल्या तक्रारी/दरखास्ती /किरकोळ अर्ज अशा प्रकरणांची एकूण संख्या ३५७१ आहे.

(२) होय, मंचाच्या कामाकाजाच्या भाराच्या मानाने उपलब्ध कार्यालयीन जागा अपुरी आहे. सद्य:स्थितीत कार्यालयातील सहायक अधिक्षक व शिरस्तेदार ही पदे रिक्त आहेत.

(३) व (४) ठाणे जिल्हा मंचासाठी शासकीय इमारतीमध्ये जागा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य आयोग, ठाणे जिल्हा मंच तसेच शासनाकडून जिल्हाधिकारी, ठाणे आणि महसूल व वन विभाग यांचेकडे पाठपुरावा करण्यात आला आहे. याबाबत जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे मार्फत जिल्हा ग्राहक मंच, ठाणे कार्यालयासाठी जागा उपलब्ध नाही, मात्र भविष्यात जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या अखत्यारितील इमारतीमध्ये जागा उपलब्ध झाल्यास ठाणे मंच कार्यालयासाठी

जागा उपलब्ध करून देण्यात येईल असे एप्रिल,२०१५ मध्ये जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच यांना कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नागपूर जिल्हयातील राष्ट्रीय पेयजल योजना**
**निधीअभावी प्रलंबित असल्याबाबत**

**(१०१) * ४०१७५ डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्हयात राष्ट्रीय पेयजल योजनेला गत ६ महिन्यापासून निधी न मिळाल्याने १०२ गावातील पाणी पुरवठा योजना प्रलंबित असून जवळपास ६०० पाणीपुरवठा योजनांचे काम बंद पडले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूर जिल्हा परिषदेने निधी मिळणेकरीता शासनाकडे मागणी केली आहे, परंतू अद्यापपर्यंत निधी देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय.
(३) असल्यास, सदर जिल्हयातील उन्हाळा व पाणीसाठा लक्षात घेता शासनाने तात्काळ निधी वाटपाकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही. सन २०१५-१६ या वर्षामध्ये राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम अंतर्गत असलेल्या १०२ पाणी पुरवठा योजनांच्या उद्दीष्टापैकी २१ योजनांचा पाणी पुरवठा सुरु करण्यात आला असून ६४ गावातील पाणी पुरवठा योजनांची कामे प्रगती पथावर आहेत.
(२) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम अंतर्गत जि.प. नागपूर यांना रु. ७.५७ कोटी एवढा निधी जिल्हा नियोजन समितीमार्फत वितरीत करण्यात आलेला आहे.
(३) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत निधीच्या उपलब्धतेनुसार निधीचे वाटप करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राधानगरी (जि.कोल्हापूर) येथील तालुका पुरवठा अधिकारी शासकिय गोदामातील धान्याची विक्री करून करीत असलेला गैरव्यवहार

**(१०२) * ४६७०३ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राधानगरी (जि.कोल्हापूर) येथील तालुका पुरवठा अधिकारी हे चुकीच्या पध्दतीने कारभार करुन शासकिय गोदामातील गहू व तांदूळ परस्पर त्रयस्थ व्यक्तीला विकत असल्याच्या तक्रारी दिनांक २० जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी तहसिलदार राधानगरी व तालुका पुरवठा अधिकारी यांचे आर्थिक व्यवहार असून शासनाच्या लाखो रुपयांचा गैरव्यवहार करत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## पालघर जिल्हयातील शिक्षकांना सेवानिवृत्ती वेतन देण्याबाबत

**(१०३) * ४१६३७ श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयातील सेवानिवृत्त शिक्षकांना सन २००३ पासून निवृत्ती वेतन अद्यापपर्यन्त मिळालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यातील अनेक शिक्षकांचे मृत्यु होऊनही नव्याने निर्माण झालेल्या पालघर जिल्हापरिषदेच्या शिक्षण विभागानेही निवृत्ती वेतन देण्याकडे दुर्लक्ष केलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### राज्यातील महाविद्यालयामध्ये रॅगिंगविरोधी समित्या स्थापन करण्याबाबत

**(१०४) * ४६१८३ श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात गत ७ वर्षात रॅगिंगची १७९ प्रकरणे घडली असून या प्रकरणात सर्वाधिक प्रकरणे मुंबईतील (४५), पुणे (३४) व नागपूर परिसरातील (२९) रॅगिंगची प्रकरणे युजीसीच्या आकडेवारीत स्पष्ट होत असल्याचे दिनांक २२ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रॅगिंगच्या सर्व तक्रारी अभियांत्रिकी व वैद्यकीय महाविद्यालयातीलच असून राज्यातील महाविद्यालयामध्ये होणारे रँगिगचे प्रकार टाळण्यासाठी रॅगिंगविरोधी समित्या स्थापन करण्याचे शासनाने आदेश दिले असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रॅगिंगविरोधी समित्या स्थापन झाल्या आहेत काय, त्या कार्यान्वित आहेत काय, तसेच रॅगिंगचे प्रकार रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व याबाबत शासनाची भूमिका काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे अंशत: आहे.
(२) रॅगिंगचे प्रकार टाळण्यासाठी सर्व अकृषी विद्यापीठांना वारंवार निर्देश देण्यात आलेले आहेत. शासनाने परिपत्रक क्रमांक - याचिका २०१०/प्र.क्र.३२८/विशि-३, दिनांक ०४/०६/२०१५ अन्वये कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठ, महाविद्यालये व

इतर सर्व संबंधितांना काटेकोर अशा सूचना देऊन रॅगिंगला प्रतिबंध होण्याच्या दृष्टीने समित्या व पथके स्थापन करण्याचे आदेश दिले आहे.

(३) विद्यापीठांनी संलग्नित महाविद्यालयांना रॅगिंगविरोधी समित्या स्थापन करण्याबाबत आदेश दिलेले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पुणे येथील सावित्रीबाई फुले विद्यापीठाच्या नाशिक कॅम्पसचे काम सुरु करण्याबाबत**

**(१०५) * ४०८०९ श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नाशिक कॅम्पस मान्यतेच्या विलंबामुळे या कॅम्पससाठी हस्तांतरित केलेली ६३ एकर जागेवर अतिक्रमण झाले असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २४ जून, २०१३ रोजी शासनाने तत्वतः मंजुरी देवूनही सदर कॅम्पसबाबत शासनाने अधिसूचना न काढल्याने सदर कॅम्पसचे काम सुरु झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

जिल्हा प्रशासनाने मौजे शिवनई ता.दिंडोरी, जि. नाशिक येथे एकूण ६३ एकर जागा वाटप केली आहे. त्यापैकी एकूण ४३.२५ एकर क्षेत्र प्रत्यक्ष ताब्यात मिळाले असून २०.२७ एकर जागेत पूर्वीपासूनच स्थानिक शेतक-यांचे अतिक्रमण आहे.

(२) तत्वत:मंजूरी झाली असली तरी अंतिम मंजूरी झालेली नाही.

(३) उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या शासन निर्णय दिनांक २८.०४.२०१५ नुसार राज्यातील अकृषी विद्यापीठांतर्गत होणा-या उपकेंद्राच्या निर्मितीसाठी समान धोरण निश्चित करण्याकरिता माजी प्र.कुलगुरु डॉ.योगानंद काळे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या समितीने

नुकताच आपला अहवाल शासनास सादर केला असून अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने शासन मान्यता प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

**औरंगाबाद येथे येणाऱ्या दुधाच्या टँकरमध्ये युरिया रसायनाची भेसळ होत असल्याबाबत**

**(१०६) * ४६९८६ श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण), श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबादमध्ये पश्चिम महाराष्ट्रातून येणा-या दुधाच्या टँकरमध्ये शहरालगतच्या व्यावसायिकांकडून युरिया रसायनांची भेसळ होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार आतापर्यंत किती जणांना अटक केली आहे तसेच त्यांचेवर कोणत्या कलमान्वये कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पारनाका (ता.कल्याण, जि.ठाणे) येथे स्काय ऑन्याटिकल प्रयोग शाळेमधून रसायन मिश्रित पाणी गटारात सोडले जात असल्याबाबत**

**(१०७) * ४०९४३ श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पारनाका (ता.कल्याण, जि.ठाणे) येथे स्काय ऑन्याटिकल प्रयोग शाळेमधून रसायन मिश्रित सांडपाणी मलउदंचन केंद्रामध्ये न सोडता थेट पालिकेच्या गटारामध्ये सोडले जात असल्याचे दिनांक २३ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याच संस्थेकडून महानगरपालिका प्रशासन पर्यावरण अहवाल तयार करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रसायन मिश्रित सांडपाणी गटारांमध्ये सोडणाऱ्या सदर संस्थेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) होय, तथापि, नारंगी संवर्गातील ही प्रयोग शाळा गृहनिर्माण संस्थेच्या सदनिकेत कार्यरत असून प्रयोगशाळेचे सांडपाणी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने दि. १९/०९/२०१३ अन्वये दिलेल्या जोडणी अनुमतीनूसार सोडण्यात येते.
(२) होय, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने सन २०१४-१५ या वर्षाकरिताचा पर्यावरण अहवाल या संस्थेकडून तयार केलेला आहे.
(३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर संस्थेस संमतीपत्र घेण्यासाठी सुचविले/निर्देशित केले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बी.व्ही.जी. इंडिया प्रा.लि. कंपनीने अंतरवासीता पूर्ण न केलेले डॉक्टर (ई.एम.एस.ओ) नेमल्याबाबत**

**(१०८) * ४७८७३ डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात माहे मार्च २०१४ पासून सुरु करण्यात आलेल्या १०८ रुग्णवाहिका सेवा पुरविणाऱ्या बी.व्ही.जी. इंडिया प्रा. लि. कंपनीने डॉ. संदीपान कुरमे-नांदेड, डॉ.प्रियांका होळकर-सांगवी, जि.पुणे, डॉ. उमेश शेट्टे -चाकण, जि.पुणे, डॉ.देवेंद्र, यादव-वाई, जि.सातारा असे अंतरवासीता पूर्ण न केलेले डॉक्टर (ई-एम-एस-ओ) नेमले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात अशा प्रकारे अंतरवासीता पूर्ण न केलेले अथवा सुरु असलेले कितीतरी विद्यार्थी सदर कंपनीवर डॉक्टर (ई.एस.एम.ओ) म्हणून काम करीत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, तद्नुसार किती विद्यार्थी अंतरवासीता पूर्ण न केलेले आढळून आले आहेत,
(४) असल्यास, अशा प्रकारे अंतरवासीता पूर्ण न केलेल्या विद्यार्थ्यांना सेवेत सामावून घेण्याचा अधिकार बी.व्ही.जी. इंडीया प्रा.लि. कंपनीस आहे काय, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशतः खरे आहे.

डॉ. संदीप कुरमे, नांदेड व डॉ.देवेंद्र यादव यांनी मे.बीव्हीजी इंडिया लि. येथे व रुग्णवाहिकेवर काम केलेले नाही. तथापि डॉ. प्रियंका होळकर-सांगली, जि.पुणे, डॉ.उमेश शेट्टे-चाकंण, जि.पुणे अंतरवासीयता पूर्ण केलेली नाही असे निदर्शनास आल्यानंतर त्यांना तात्काळ कार्यमुक्त केलेले आहे.
(२) हे खरे नाही.

तथापि सद्यस्थितीमध्ये अंतरवासीयता पूर्ण न केलेले डॉक्टर काम करत नाहीत.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील पाच हजारांहून अधिक शाळांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी अल्पवेतनावर काम करीत असल्याबाबत

**(१०९) * ४५९७३ श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.बाळासाहेब सानप (नाशिक पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील पाच हजारांहून अधिक शाळांमधील सुमारे १ लाख शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी अल्पवेतनावर काम करीत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विनाअनुदानित शाळांमधील विद्यार्थ्यांच्या फी मधून संस्थाचालकांना प्रचंड नफा मिळत असताना त्या शाळेत शिकविणाऱ्या शिक्षकांना मात्र अल्प वेतनावर वेठबिगारासारखे राबविले जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार सदरहू संस्था चालक व शाळांना शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना वेतन आयोगाप्रमाणे वेतन देण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) दिनांक २१.५.२०१० च्या शासन निर्णयान्वये विनाअनुदानित शाळांतील शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना ६ व्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन देण्याचे आदेश देण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूरमधील सूरज फायर वर्क्स हा कारखाना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या परवानगी विना सुरु असल्याबाबत

**(११०) * ४०२४६ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूरमधील सूरज फायर वर्क्स हा कारखाना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे "ना हरकत प्रमाणपत्र" आणि आवश्यक परवानगी न घेता सुरू केला असल्याचे माहे जानेवारी २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कारखान्यातील फटाक्याच्या आवाजाने काळवीट, मोर, हरीण, कोल्हे, असे वन्यजीव रस्त्यावर धावत असल्याने परिणामी अपघातात जवळपास १५ ते २० वन्यप्राण्यांना जीव गमवावा लागला आहे व परिसरातील गावकऱ्यांचे मोठ्याप्रमाणात नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) होय.
(२) व (३) सदरील कारखाना फटाक्यांचे उत्पादन करतो. तेथे फटाके उडवत नाहीत. त्यामुळे फटाक्याच्या आवाजाने वन्य प्राणी मृत झाले नाहीत. तथापि, मौजा तांदूळवाडी, ता.बार्शी येथील वनसदृश क्षेत्र गट नं १४ च्या दोन्ही बाजूस बार्शी ते उस्मानाबाद रस्ता आहे. सदर वनक्षेत्रातून १५ ते २० वन्य प्राणी वन क्षेत्राबाहेर रस्त्यावर येऊन अज्ञात वाहनाच्या धडकेने मृत झाले आहेत.
मा. राष्ट्रीय हरित लवाद, पुणे (पवि) यांच्या दि. ०५.०१.२०१६ च्या आदेशास अनुसरून महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने दि. १८.०२.२०१६ च्या पत्रान्वये या कारखान्यास उत्पादन बंदीचे आदेश दिले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## साक्री (जि.धुळे) तालुक्यातील पाणी पुरवठा योजना सुरु करण्याबाबत

**(१११) * ४५५११ श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) साक्री (जि.धुळे) तालुक्यात जैताणे, निजामपूर व इतर गावासाठी कोटयवधी रुपये खर्च करुन ग्रामीण रिजनल पाणी पुरवठा योजना सुरु करण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रिजनल पाणी पुरवठा योजनेमार्फत गत दोन ते तीन वर्षापासून जैताणे खेरीज इतर गावांना पाणीपुरवठा केला जात नाही, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच टेंभे प्रभामेर (ता.साक्री,जि.धुळे) या गावांची पाणी पुरवठा योजना पूर्ण करुन सुरळीत पाणी पुरवठा करावा अशी गावक-यांची सततची मागणी असूनसुध्दा सदर पाणी पुरवठा योजना पूर्ण केली जात नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सन २०१५-२०१६ मध्ये या परिसरात कमी पाऊस पडल्यामुळे वरील पाणीपुरवठा योजना अंतर्गत येणा-या गावांना पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई असूनही शासन याकडे लक्ष देत नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत  नाही.
(३) हे खरे नाही.
(४) हे खरे नाही.
(५) टेंभे प्र. भामेर पाणी पुरवठा योजनेचे काम प्रगतीपथावर असून मार्च, २०१६ अखेर पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

-----------------

## राज्यात खाद्यतेल व तुरडाळीच्या साठ्यासंदर्भात टाकलेल्या धाडीबाबत

**(११२) * ३९७८१ श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.लक्ष्मण पवार (गेवराई), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), ॲड.यशोमती ठाकूर**

**(तिवसा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात खाद्यतेल व तुरडाळीचे भाव आटोक्यात आणण्यासाठी ७ प्रादेशिक विभागात तीन महिन्यात ५,५९२ ठिकाणी धाडी घालून डाळ, तेल, तेलबीयाणे इ. ५३९ कोटी ५० लाख १५ हजार ७४५ रुपयांच्या जीवनावश्यक वस्तू ताब्यात घेतल्या असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर टाकण्यात आलेल्या धाडीमध्ये केवळ ५० जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले असून नागपूर प्रादेशिक विभागात एकही गुन्हा नोंद करण्यात आला नसल्याचे तसेच कोकण आणि औरंगाबाद येथे फक्त एकाच गुन्हयाची नोंद असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जप्त केलेल्या डाळ व तेलांपैकी ७०% माल साठेबाजांना परत केल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय, जप्त केलेली डाळ व्यापाऱ्यांना परत देण्याची कारणे काय आहेत,

(४) तसेच शेतक-यांची तूर घरात येण्यापूर्वीच शासन शेतक-यांना अडचणीत आणण्याचा प्रयत्न करीत असल्याबाबतचे निवेदन जळगांव बाजार समिती मधील सर्वसामान्य शेतकरी पॅनलच्या संचालकांनी दिले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त सर्व प्रकरणांची चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने जप्त केलेल्या मालाची रास्त भावाने विक्री करण्यासाठी किंवा सदर माल रेशन दुकानातून अन्न सुरक्षा योजनेच्या लाभार्थ्यांना वितरण करण्यासाठी तसेच भविष्यात साठेबाजांवर नियंत्रण ठेवण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) तसेच सदर प्रकरणी काळाबाजार व अवैधरित्या साठेबाजी करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

(३) जप्त करण्यात आलेल्या तूरीची तूरडाळ करुन ती बाजारात विक्रीसाठी तात्काळ येणे आवश्यक असल्याच्या कारणास्तव दिनांक २४.११.२०१५ रोजीच्या

शासन निर्णयान्वये जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ अन्वये जप्त केलेल्या कडधान्याच्या साठ्याची विल्हेवाट लावण्याबाबत अटी व शर्ती निश्चित करण्यात आल्या.

(४) हे खरे नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील विविध ठिकाणी बोगस पॅथलॅब चालविल्या जात असल्याबाबत**

**(११३) * ४१८५६ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्री.संजय शिरसाट (औरंगाबाद पश्चिम), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध ठिकाणी नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या हजारो बोगस पॅथॉलॉजी लॅब चालविल्या जात असून मेडीकल कौन्सिलकडून कारवाई केली जात नसल्याप्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी, सामाजिक संघटनांनी दिनांक १९ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास तसेच यापूर्वी वारंवार मा. सार्वजनिक आरोग्यमंत्री यांचेकडे तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात मोठया प्रमाणावर बोगस पॅथॉलॉजी लॅब अस्तित्वात असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बोगस पॅथॉलॉजी लॅबवर कारवाई करण्याचे अधिकार कायद्यानुसार महानगरपालिकांना नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार बोगस पॅथॉलॉजी लॅबवर

महानगरपालिकांना कारवाई करता यावी याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच सदर प्रकरणी आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला त्यानूसार बोगस पॅथलॅब चालविण्याऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) विकृतिचिकित्सा प्रयोगशाळांमध्ये अवैध रीतीने चालणाऱ्या वैद्यक व्यवसायाबद्दल शासनास तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. अशा रीतीने अवैध वैद्यक व्यवसाय करणे हे महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ (१९६१ चा महा. अधि. क्र.२८) च्या कलम ३३ अनुसार अपराध आहे. परंतु, अशा प्रकरणांमध्ये कारवाई करण्याचे अधिकार महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेला नाहीत.

(२) नाही.

(३), (४), (५) व (६) हे प्रश्न उद्‌भवत नाहीत.

-----------------

**राज्यात बोगस डॉक्टरांचे वाढते प्रमाण**

**(११४) * ४१५९१ श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली), अॅड.संजय धोटे (राजूरा), श्री.बसवराज पाटील (औसा), डॉ.तुषार राठोड (मुखेड), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: सांगली जिल्हयामध्ये बोगस डॉक्टरांचे प्रमाण प्रचंड प्रमाणात वाढले असून सदर डॉक्टरांकडून रुग्णांना स्टेरॉईडसारख्या चुकीच्या औषधांचा वापर केल्याने रुग्णांचे अवयव निकामी होण्याचे प्रमाण वाढले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच लातूर जिल्हयातील ग्रामीण भागात वैद्यकिय अभ्यासक्रमांची प्रमाणीत पदवी व पदविका नसलेले अनेक डॉक्टर बंगाल, बिहार आदी राज्यातून आलेले डॉक्टर्स वैद्यकिय व्यवसाय करित असल्याच्या अनेक तक्रारी आरोग्य विभागाकडे गत ३ वर्षापासून प्राप्त झालेल्या आहेत, त्यानुषंगाने आरोग्य विभागाने संशयित १९२ बोगस डॉक्टरांची सविस्तर माहिती घेवून एक यादी तयार केली असून दीड वर्षापूर्वी बोगस डॉक्टरांच्या शोध समितीने ५४ डॉक्टरांवर त्या त्या पोलीस ठाण्यात गुन्हेही नोंदविलेले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू गुन्हे नोंदविल्यानंतर काही बोगस डॉक्टरांनी लातूर जिल्हयातून पलायन केल्यानंतर गत दोन-अडीच महिन्यांपासून बोगस डॉक्टरांचे प्रमाण ग्रामीण भागात वाढलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) चंद्रपूर जिल्ह्यातील चुनाळा (ता.राजुरा) येथे बोगस डॉक्टरांनी दवाखाने सुरु करुन रुग्णांवर उपचार करीत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(५) तसेच नांदेड जिल्ह्यात अनधिकृत वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या बोगस डॉक्टरांची यादी माहे डिसेंबर, २०१५ मध्ये प्रशासनाने प्रसिद्ध केली, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त सर्व प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने राज्यातील व उक्त सर्व जिल्हयांतील बोगस डॉक्टरांच्या व्यवसायाला परिणामकारकरित्या प्रतिबंध घालण्याच्या दृष्टीने बोगस डॉक्टरांवर कारवाई करण्याबाबत तसेच ग्रामीण भागातील गोरगरिब रुग्णांना चांगली आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही. तथापि, सांगली जिल्हयातील ग्रामीण भागांमध्ये एकूण ६६ व्यक्ती अवैध रीतीने वैद्यक व्यवसाय करीत असल्याचे जानेवारी-२०१५ मध्ये निदर्शनास आले. तथापि, त्यांनी “स्टेरॉईडस्” चा वापर केल्याचे दिसून आले नाही.

(२) होय जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी, लातूर, यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुसार लातूर जिल्हयात सन २०१५-१६ मध्ये एकूण १९२ संशयीत अवैध वैद्यक व्यवसायींची यादी तयार करण्यात आली असून त्यांच्या विरुध्द उचित कारवाई करण्यात येत आहे. तसेच, एकूण ५५ प्रकरणांमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

(३) जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी, लातूर, यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुसार एकूण ३२ अवैध वैद्यक व्यवसायींनी स्थलांतर केले व एकूण ४२ व्यक्तींनी अवैध वैद्यक व्यवसाय बंद केला. परंतु गेल्या दोन ते अडीच वर्षांत लातूर जिल्हयातील ग्रामीण भागांमध्ये अवैध वैद्यक व्यवसायींची संख्या किंवा प्रमाण वाढल्याचे उपलब्ध माहितीवरुन दिसून येत नाही.

(४) नाही.

(५) पोलीस अधीक्षक, नांदेड, यांनी अशी कोणतीही यादी प्रसिध्द केलेली नाही.
(६) ज्या प्रकरणांमध्ये गुन्हे दाखल झाले आहेत, त्या प्रकरणांमध्ये संबंधित यंत्रणेकडून योग्य कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच अवैध वैद्यक व्यवसायाला प्रभावीपणे प्रतिषेध करण्यासाठी प्रशासनाच्या तालुका, जिल्हा, नगर परिषद व महानगरपालिका या स्तरांवर आढावा समित्या घटीत करण्यात आल्या आहेत.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्य शासनाने शिक्षकांवर लादलेल्या जाचक अटीबाबत**

**(११५) * ४४६१८ श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने शिक्षकांवर लादलेल्या जाचक अटी, पटपडताळणीचे नवे संकल्प इत्यादी अशैक्षणिक धोरणाच्या विरोधात माध्यमिक शाळेतील शिक्षकांनी माहे डिसेंबर, २०१५ मध्ये दोन दिवसाचा संप पुकारला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणतीही दखल न घेतल्यास बेमुदत शाळा बंद ठेवण्यात येईल असा इशारा शिक्षक संघटनेच्या कृती समितीने शासनाला दिला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :**
(१) होय.
(२) व (३) शिक्षक संघटनांनी संपाच्या वेळी ऑनलाईन संच मान्यतेतील सर्व त्रुटी दुर करणे, वाढीव पदांना वेतन सुरु करणे या व अन्य मागण्यांबाबतचे निवेदन दिलेले आहे.

सदर मागण्या तपासून उचित कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राळेगांव तालुक्यातील (जि.यवतमाळ) जिल्हापरिषद शाळेच्या चाईल्ड रिलीफ फंडच्या निधीत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(११६) * ४७७४९ श्री.मदन येरावार (यवतमाळ) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राळेगांव (जि.यवतमाळ) तालुक्यातील जिल्हापरिषद शाळेला सुंदर व आकर्षक दिसण्यासाठी तसेच खाजगी शाळेसोबत स्पर्धेत टिकून राहण्याकरीता प्रत्येक शाळेला १५ ते २० हजार रुपयांचा चाईल्ड रिलीफ फंड देण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधीतून विद्यार्थ्यांकरीता बेंचेस, कचराकुंडी आदी साहित्य खरेदी करण्याकरीता निधी देण्यात आला होता परंतू सदर निधीचा वापर कोणत्याच शाळेत दिसत नसल्याबाबत पालक वर्गामधुन मोठया प्रमाणात शिक्षणाधिका-याकडे तक्रारी करण्यात आल्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी यांनी साहित्य घेण्याबाबत शाळेतील मुख्याध्यापकांना सांगितले होते, परंतू स्थानिक मुख्याध्यापकांनी साहित्य न घेता निधीचा गैरवापर केला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे :** (१) सर्व शिक्षा अभियानांतर्गत वर्गखोल्या बांधकामे मंजूर करण्यात आलेल्या शाळांनाच चाईल्ड फ्रेन्डली एलिमेंट अंतर्गत निधी मंजूर करण्यात आलेला आहे. चाईल्ड रिलीफ फंड या नावाचा कोणताही निधी शालेय शिक्षण विभागामार्फत देण्यात आलेला नाही.

(२), (३) व (४) हे खरे नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## अमरावती येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी केलेल्या गैरकारभाराबाबत

**(११७) * ३९६८७ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्राचार्याच्या गैरकारभाराची चौकशी करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या चौकशी समितीने माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान सादर केलेल्या अहवालात १९ निष्कर्ष काढून अपहार केल्याचे सिध्द झाले असताना प्राचार्यांवर कारवाई न करता त्यांना त्याच पदावर कायमस्वरुपी ठेवण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी केलेल्या चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुसार संबंधित प्राचार्यावर कारवाई करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही.

(२) श्री. गंधारे, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद येथे प्राचार्य या पदावर कार्यरत असताना त्यांच्या विरुध्द प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने नियुक्त केलेल्या प्राथमिक चौकशी समितीने आर्थिक अनियमितता झाल्याचे नमूद केले आहे. त्यानुसार शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती येथील तत्कालीन प्राचार्य श्री.गंधारे, यांची याप्रकरणी विभागीय चौकशी सुरु करुन त्यांना दि. १४/१०/२०१५ च्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले होते. तद्नंतर श्री.गंधारे यांना दि.१९/०१/२०१६ च्या आदेशान्वये सेवेत पुन:स्थापित करण्यात आले होते. श्री.गंधारे हे नियत वयोमानानुसार दि. ३१/०१/२०१६ रोजी सेवानिवृत्त झाले असून त्यांच्या विरुध्द शिस्तभंग विषयक कार्यवाही प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य शिक्षण परिषदेने केलेली खरेदी बेकायदा असल्याबाबत

**(११८) * ४४४३१ श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य शिक्षण परिषदेने केलेली कोटयवधी रुपयांची खरेदी बेकायदा असल्याने त्यासाठी केंद्राकडून पैसे देता येणार नाही असे केंद्र शासनाच्या मनुष्यबळ विकास विभागाच्या शालेय शिक्षण विभागाच्या अतिरिक्त सचिव रिना रे यांनी दिनांक ४ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव, नंदकुमार यांना पाठविलेल्या पत्रामध्ये स्पष्टपणे नमूद केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत खरेदी करण्याबाबतची मार्गदर्शक तत्त्वे व पध्दती केंद्र शासनाने दिनांक ९ जून, २०१४ रोजी सर्व राज्यांना कळविली असून, शिक्षण परिषदेने सन २०१४-१५ च्या वार्षिक आराखडयामध्ये १ कोटी २५ लाख २५ हजार ४४७ पुस्तके खरेदी करण्याचे निर्धारित केले होते, ही खरेदी नियमबाहय असून अखर्चिक निधी खर्च करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्यामुळे या दोन्ही नियमबाहय खरेदीसाठी निधी देता येणार नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने महाराष्ट्र राज्य शिक्षण परिषदेने बेकायदेशीर केलेली खरेदी त्याकरिता केंद्र शासनाचा निधी वापरता येत नसल्याबाबतची माहिती असूनही सदर खरेदी करणाऱ्या अधिकाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) व (४) सदर खरेदी नियमानुसारच करण्यात आलेली असून, नियमबाह्य पध्दतीने खर्च करण्यात आलेला नाही.

-----------------

## राज्यात शिक्षक भरतीसाठी बंधनकारक असलेल्या शिक्षक पात्रता (टी.ई.टी.) परिक्षेची प्रश्न पत्रिका फुटल्याबाबत

**(११९) * ३९७४७ श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.संजय पोतनीस (कलिना), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), डॉ.तुषार राठोड (मुखेड), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शिक्षक भरतीसाठी बंधनकारक असलेल्या शिक्षक पात्रता (टी.ई. टी.) परिक्षेची दिनांक.१६ जानेवारी, २०१६ ची प्रश्न पत्रिका (शिक्षक पात्रता भाग एकचा पेपर) फुटल्याची बाब राज्यात अनेक ठिकाणी निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बीड, पुणे, कोल्हापुर व इतर जिल्ह्यात परिक्षेपुर्वीच प्रश्नपत्रिकेची प्रत व्हॉट्स ॲप, फेसबुक सारख्या सोशल मिडीयातून व्हायरल करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू परीक्षा संपूर्ण राज्यात पुन्हा घेण्यात येणार आहे काय,

(४) राज्यात टी ई टी पेपर फुटी प्रकरण राज्य परीक्षा परिषदेने मा. मंत्र्याच्या सूचनेनुसार ४८ तासांच्या आत शालेय शिक्षण विभागाला सादर केला मात्र टी ई टीच्या पेपर फुटीसंदर्भात अद्याप निर्णय झालेला नाही, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय व चौकशी अहवालानुसार पेपर चोरी करणाऱ्या दोषी व्यक्तींवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

सदर पेपर फुटीची घटना बीड येथे उघडकीस आली.

(२) होय.

(३) पेपर १ ची परीक्षा संपूर्ण राज्यात पुन्हा घेण्यात येणार आहे .

(४) व (५) सदर प्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आलेले असून चौकशीसाठी प्रकरण राज्य गुन्हे अन्वेषन विभागाकडे सोपविण्यात आले आहे. चौकशीनंतर दोषीं व्यक्तींवर योग्य ती कारवाई करण्यात येईल.

(६) प्रश्न उद्‌भवत  नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्हयातील सीपीआर रुग्णालयातील ट्रामाकेअर सेंटरच्या प्रलंबित प्रस्तावाबाबत

**(१२०) * ४१०१४ श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापुर येथील छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालयातील ट्रामा केअर सेंटर उभारणीसाठी  केंद्र शासनाने आपल्या विशेष सहाय्यता निधी अंतर्गत रूपये ५ कोटी २२ लाखाचे अनुदान  मंजूर करुन सदर अनुदानाचा धनादेश दिनांक २२ फेब्रुवारी, २०१२ रोजी कोल्हापुर येथील राजर्षी शाहू वैद्यकीय महाविद्यालयाच्या खात्यावर जमा करण्यात आला असून सन २०१३ - २०१४ मध्ये ट्रामा केअर सेंटर उभारणीचे काम सुरु होणे अपेक्षित असतानाही अद्याप हाती घेण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर रुग्णालयामधील  प्रशासनाच्या निष्क्रीयतेमुळे सिटी स्कॅन मशीनची खरेदी प्रक्रीया दोन वर्षापासून रखडलेली असून एन्डोस्कोपी मशीन पाच वर्षापासून तर ४ सीपी मशीन गेल्या तीन वर्षापासून बंद आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच आर्थोपेडीक विभागातील सुमारे १० लाख ५० हजार रुपयांची मशीन गत तीन वर्षे बंद असून ज्या कंपनीकडून सदर मशीन खरेदी केली त्या मशीनचे दहा लाख रुपये अदा केले नसल्यामुळे सदर मशीन दुरुस्ती केली जाणार नसल्याचे स्पष्टीकरण कंपनीने दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने ट्रामा केअर सेंटर सुरु करण्याबाबत व सिटी स्कॅन खरेदी प्रक्रियेतील विलंबाबाबत तसेच आर्थोपेडीक विभागातील बंद पडलेली मशीन, एन्डोस्कोपी मशीन व सीपी मशीन त्वरीत दुरुस्ती करण्याबाबत कोणती उपाययोजना केली तसेच याप्रकरणी दोषी असलेल्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही, हे खरे नाही.

ट्रामा केअर सेंटरचे बांधकाम पूर्ण झाले असून इमारत संस्थेच्या ताब्यात आहे.

(२) हे खरे नाही.

सीटी स्कॅन खरेदीचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.  सी-आर्म व एन्डोस्कोपी मशीन काही काळ बंद असून दुरुस्ती/ पर्यायी व्यवस्था करण्यात येत आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत  नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत  नाही.

-----------------

## अहमदनगर जिल्हयातील श्रीगोंदे कारखाना येथे जोशीवस्तीतील पाणीपुरवठा योजना बंद असल्याबाबत

**(१२१) * ४०५३७ श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयातील श्रीगोंदे कारखाना येथे जोशीवस्तीतील पाणीपुरवठा योजना गत आठ वर्षांपासून बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेचा जलकुंभ सुमारे ५५ लाख रुपये खर्च करुन उभारण्यात आला असून जलवाहिन्या व विहिरीला पाणी असून सुध्दा सदर योजना बंद असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर योजना त्वरीत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) नळ पाणी पुरवठा योजनेचे काम पुर्ण झाले असून विद्युत पुरवठा उपलब्ध नसल्याने योजनेद्वारे पाणी पुरवठा सुरु करण्यात आलेला नाही.

(३) महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीकडून दि. १५.१२.२०१५ रोजी विद्युत जोडणी करणेकामी प्राप्त कोटेशनप्रमाणे रक्कम रु. ८६००/- ग्रामपंचायतीने भरणा केली असून विद्युत जोडणी होताच योजनेचा पाणी पुरवठा सुरु करता येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उल्हासनगर, अंबरनाथ (जि.ठाणे) येथील वालधुनी नदीत अवैधरित्या विषारी रसायने सोडत असल्याबाबत

**(१२२) * ४०४०४ डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर, अंबरनाथ (जि. ठाणे) येथील वालधुनी नदीत परिसरातून वाहणाऱ्या नाल्यात काही कंपन्या आणि बाहेरुन अवैधरित्या येणाऱ्या टँकरमधून

विषारी रसायने सोडल्यामुळे वालधुनी नदी दुषित झाली असल्याची बाब दिनांक २९ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंबरनाथ व उल्हासनगर येथील एकूण ३८० नागरीकांना झोपेत असतांना उलट्या होणे, तोंडातून फेस येणे, चक्कर येणे अशी लक्षणे दिनांक २९ नोव्हेंबर, २०१४ रोजी दिसली असल्याने यासंदर्भात केलेल्या कारवाईचा आढावा दिनांक ०१ डिसेंबर, २०१४ रोजी अपर मुख्य सचिव (पर्यावरण) तसेच दिनांक १ जानेवारी, २०१५ रोजी मा.मंत्री, पर्यावरण यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला, सदर बैठकीमध्ये महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, उल्हासनगर महानगरपालिका व पोलीस यंत्रणा इत्यादींना अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी तसेच संबंधीतांस शासन होण्यासाठी देण्यात आलेल्या निर्देशाची अद्यापपर्यंत अंमलबजावणी झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत कोणावरच कारवाई न होण्याची कारणे काय आहेत व विलंबाची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत वालधुनी नदी पुनर्जिविता करीता सन २०११ मध्ये रूपये ६५० कोटींचा प्रस्तावही तयार करण्यात आला होता, प्रस्तावाबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. रामदास कदम :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) वरील घटनेच्या संदर्भात संबधीत यंत्रणा जसे की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्याण - डोंबिवली महानगरपालिका, उल्हासनगर महानगरपालिका व पोलीस यंत्रणा इत्यादींनी केलेल्या कारवाईचा आढावा ०१/१२/२०१४ रोजी अपर मुख्य सचिव, (पर्यावरण) तसेच ०१/०१/२०१५ रोजी मा. मंत्री, (पर्यावरण) यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला. सदर बैठकीमध्ये संबंधीत यंत्रणांना अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी समन्वयाने काम करुन सबंधीत दोषींवर कडक शासन होण्याच्या दृष्टीने कारवाई करण्याचे निर्देश होते.

तद्नूसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून दोषी आढळलेल्या मेसर्स हार्मोनी ऑरगॅनिक्स, कुरकुंभ, जि. पुणे या कारखान्याच्या उत्पादनावर बंदीची कारवाई करण्यात आली.

सदर घटने संदर्भात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून अंबरनाथ पोलीस स्टेशन मध्ये FIR दाखल करण्यात आलेला आहे. तसेच मेसर्स हार्मोनी ऑरगॅनिक्स, कुरकुंभ, जि. पुणे यांच्यावर जिल्हा सत्र न्यायालय, जि. पुणे येथे खटला दाखल करण्यात आला आहे.

घटनेमध्ये सामील संशयीत टँकर चालक/मालक इत्यादिंना अटक करण्यात येऊन, अंबरनाथ पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(४) वालधुनी नदीच्या विकासाकरीता जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या अध्यक्षतेखाली २००८ मध्ये शासन निर्णयानुसार वालधुनी विकास समिती स्थापन केली असून, कल्याण डोंबिवली महानगरपालिका नोडल एजन्सी म्हणून काम करीत आहे. तसेच मे. कन्सल्टींग इंजिनिअरींग सर्व्हिस प्रा. लि., मुंबई यांना काम सुरू करण्याचे कार्यादेश दिलेले आहेत.

-----------------

**लातूर (जि. लातूर) एमआयडीसी परिसरातील किसान वेअर गोडाऊनमध्ये साठवून ठेवलेली तूरडाळ गोदाम मालकाने परस्पर विकल्याबाबत**

**(१२३) * ४०९३१ श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर (जि. लातूर) एमआयडीसी परिसरातील किसान वेअर हाऊसच्या गोदामामध्ये साठवून ठेवलेली २ कोटी १० लाख रुपयांची तूरडाळ गोदाम मालकाने परस्पर विकल्याची घटना माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर गोदाम मालकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) अंशत: खरे आहे,

किसान वेअर हाऊस, एम.आय.डी.सी. लातूर येथिल खाजगी गोदामात सन २०१२ मध्ये श्री. अतिश सुग्रिव जाधव, जि.लातूर यांनी २,१०,७६,५००/- इतक्या रकमेची तूरडाळ ठेवली होती. सदरहू तूरडाळीचा अपहार करुन फसवणूक केल्या प्रकरणी गोदाम मालकाविरुद्ध पोलीस स्टेशन, एम.आय.डी.सी., लातूर येथे श्री.जाधव यांनी तक्रार अर्ज दाखल केला आहे.

(२) व (३) होय.

सदर घटनेची पोलीस निरीक्षक एम.आय.डी.सी., लातूर यांनी चौकशी केली असून, हे प्रकरण दिवाणी स्वरुपाचे असल्याच्या कारणास्तव, या प्रकरणी मा.न्यायालयात दाद मागण्याबाबत श्री.जाधव यांना पोलीस उप निरीक्षक, एम.आय.डी.सी., लातूर यांनी दिनांक ०५.०१.२०१६ अन्वये कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**जालना (जि.जालना) शहरात पोलिस प्रशिक्षणार्थींना अन्नातून झालेली विषबाधा**

**(१२४) * ४७००८ श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना (जि.जालना) शहरातील विविध उपहारगृहे, हॉटेल, आदिमध्ये अन्न पदार्थ, दूध, खवा तसेच इतर पदार्थामध्ये मोठया प्रमाणात भेसळीचे प्रमाण वाढत असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच जालना शहरात १३० पोलिस प्रशिक्षणार्थींना अन्नातून विषबाधा झाल्याचे दिनांक १९ डिसेंबर,२०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार संबधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच सदर विषबाधितांना कोणती तातडीने वैद्यकिय मदत दिली वा देण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, अन्न विषबाधेची माहिती प्राप्त होताच प्रशासनाकडून अन्न सुरक्षा अधिकारी यांनी घटनास्थळी जावून ६ अन्न पदार्थाचे अनौपचारीक नमुने घेतले होते. तर अन्न विश्लेषक यांनी दोन्ही पिण्याच्या पाण्यामध्ये जीवणु आढळून आल्याचे तथापि त्यांची मात्रा तात्काळ विषबाधा होईल एवढी नसल्याचेही अहवालात नमूद केले आहे. विश्लेषणासाठी घेण्यात आलेले सर्व अन्न पदार्थांचे नमुने प्रमाणित घोषित झाले आहेत.

रुग्णालयातील रुग्णांच्या उलटीचा नमुना पोलिसांनी फॉरेन्सिक प्रयोगशाळा, औरंगाबाद येथे पाठविला आहे. त्यावरील अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही.

बाधित १४४ जणांना निगराणीसाठी दवाखान्यात दाखल केले होते त्या सर्वांना उपचार करुन दुसऱ्या दिवशी डिसचार्ज देण्यात आला.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील दुष्काळी भागातील विद्यार्थी शुल्कमाफीपासून वंचित राहिल्याबाबत**

**(१२५) * ४००९९ श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.सतीश**

**(अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासनाने दुष्काळी भागातील विद्यार्थ्यांसाठी परिक्षा फी माफीची घोषणा केली असून देखील राज्यातील विद्यापीठाकडून संबंधित विद्यार्थ्यांना सदर फी माफी नाकारण्यात येत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उच्च शिक्षण संचालनालयाकडून दिनांक १ डिसेंबर, २०१५ रोजी काढण्यात आलेल्या पत्रकामुळे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठा अंतर्गत पदवी, पदव्युत्तर शिक्षण घेत असलेले विद्यार्थी शुल्क माफीपासून वंचित राहिले आहेत तसेच सदर परिपत्रकात पुणे, नाशिक, अहमदनगर या तीन जिल्हयातील पैसेवारी ५० टक्केपेक्षा कमी असलेल्या दुष्काळग्रस्त गावातील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करणे तसेच शुल्क भरले असल्यास परतावा देण्याचे आदेश देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच लातूर जिल्हयासह संपूर्ण मराठवाडयातील दुष्काळगस्त विद्यार्थ्यांची शैक्षणिक फी माफ करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, लातूर यांच्याकडे वारंवार मागणी करण्यात येऊनही अद्यापही याबाबत कोणताही निर्णय घेण्यात आला नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बोरगावमंजू (जि.अकोला)येथील शासनमान्य कायम विनाअनुदानित श्रीमती लीलाबाई केशवराव नाईक विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयात शेतकऱ्यांच्या मुलांकडून शैक्षणिक फी वसूल केली जात आहे व ज्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक फी भरली नाही अशा ५० विद्यार्थ्यांना परिक्षेला बसू देण्यात आलेले नसल्याचे दिनांक २० जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर निर्णयाच्या अनुषंगाने अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना लाभ मिळणार आहे काय तसेच अद्यापपर्यन्त सन २०१४-१५ या कालावधीचे शुल्क शासनाकडून परत देण्यात आलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त सर्व प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, ज्या संस्थांनी विद्यार्थ्यांना परिक्षेपासून वंचित ठेवण्यात आले त्या संस्थाचालकांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच

राज्यातील दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना परिक्षा शुल्क माफ करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही. संचालनालयाने दि. ०३/११/२०१५ व दि. ०८/१२/२०१५ च्या परिपत्रकान्वये सर्व विभागीय सहसंचालक तसेच कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे यांना शासनाने राज्यात टंचाईग्रस्त घोषित केलेल्या १५७४७ गावातील महाविद्यालयीन शिक्षण घेणारा पात्र विद्यार्थी महाराष्ट्रातील कोणत्याही महाविद्यालयात शिकत असला तरी त्याला शुल्क माफी देण्याबाबत कळविले आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) शैक्षणिक फी नाही तर परिक्षा फी माफ करण्याचा निर्णय झालेला आहे.
(४) परिक्षा शुल्क भरले नाही म्हणून कोणत्याही विद्यार्थ्याला परिक्षेपासून वंचित ठेवण्यात आलेले नाही.
(५) होय. सन २०१४-१५ चे शुल्काची रक्कम विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयांना वितरित करण्यात येत असून सदर रक्कम संबंधित महाविद्यालयास वितरित करण्यात येईल.
(६) हे खरे नाही. याबाबत कोणतीही तक्रार या संचालनालयाकडे प्राप्त झालेली नाही. परिक्षाशुल्क माफीसंदर्भात संचालनालय स्तरावरुन कार्यवाही करण्यात येत आहे.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**खांडस (ता.कर्जत,जि.रायगड) गावासाठी राष्ट्रीय पेयजल योजना सुरु करण्याबाबत**

**(१२६) * ४४६२१ श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खांडस (ता.कर्जत,जि.रायगड) गावासाठी राष्ट्रीय पेयजल योजनेंतर्गत सन २०१४ मध्ये वा त्या दरम्यान ४५ लाख रुपये निधी मंजूर होऊन सुध्दा कामास अद्याप सुरुवात झाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे महिलांना, गुरांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकंती करावी लागते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे आहे. तथापि, योजनेची किंमत रु.४९.०४ लक्ष इतकी आहे.
(२) हे खरे नाही.
(३) सदर योजनेस प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती खांडस यांचेकडून वेळीच निविदा प्रक्रिया राबविण्यात आली नाही. दरम्यान केंद्र शासनाने त्यांच्या दि.२९.०६.२०१५ च्या आदेशान्वये राज्यातील अपूर्ण योजनांची संख्या मोठ्या प्रमाणावर असल्याने नवीन योजना घेणे, त्यांची निविदा प्रक्रिया राबविणे तसेच कार्यादेश देण्यास मनाई केली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.